**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२६
निर्णय दिनांक १५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. वसंतराव पंडितराव देशमुख, रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष बाबर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी नियमबाहय फी आकारली, चलनाद्वारे फी घेऊन सुध्दा त्यांना नक्कल न मिळता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व खोटी माहिती प्राप्त झाली. या अपील अर्जावर अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, असे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) अहवाल दि.१३.०८.०७ : ७/१२ सन ०६-०७ ऊस १=२१ व फुले ०.२२ आर वहीती लावण्याचे आदेश असताना प्रत्यक्ष आपण ७/१२ मध्ये ऊस २.४३ व फुले ४४ आर ज्यास्तीची वहीती लावली याबाबद लेखी खुलासा मिळावा.

२) शेतमालकाने कोणतेही करारपत्र बाँडवर करुन दिले नाही. आपण सुभाष बाबर या नावाने वहीती लावली त्यात जमीन मालकाचा वहीतीमध्ये हिस्याचे प्रमाण कीती व कोणत्या अधारे त्याची सत्यप्रत मिळणे."

अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.३०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, हे देखील आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे, तसेच सुनावणीस उपस्थित असलेल्या संबंधित जन माहिती अधिकारी हे देखील या प्रकरणी स्पष्ट खुलासा करु न शकल्यामुळे आयोगास समजू शकत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे, त्या विषयाशी संबंधित मूळ प्रकरणात नायब तहसीलदार (महसूल) पैठण यांनी दि. २९.०६.२००७ रोजी निर्णय देऊन त्रयस्थ पक्ष श्री. सुभाष बाबर यांचा अर्ज मंजूर केला व त्यांच्या दि.२९.०६.२००७ रोजीच्या आदेशान्वये, मौ. इंदेगाव तालुका पैठण येथील ग.क्र.७८ च्या जमिनीवर अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्याबाबतची नोंद घेण्यात आली आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली किंवा कसे याचा खुलासा मात्र जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून लेखी खुलाशाची मागणी केली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे अथवा खुलासे देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मुद्दा क्र.२ द्वारे- "शेतमालकाने कोणतेही करारपत्र बॉण्डवर करुन दिले नसताना आपण सुभाष बाबर या नावाने वहिती लावली,त्यात जमीन मालकाचा वहीतीमध्ये हिश्श्याचे प्रमाण कीती व कोणत्या आधारे याची सत्यप्रत" ही माहिती मागविली आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या श्री. बाबर यांच्या नावाची वहिती ही नायब तहसीलदार (महसूल),तहसील,पैठण यांनी दि. २९.०६.२००७ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे केल्याचे स्पष्ट होत आहे. मात्र नायब तहसीलदार यांचे हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झाले नसावेत, असे आयोगास वाटत आहे. अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली देय माहिती

त्यांना त्वरित प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती (नायब तहसीलदार (महसूल),पैठण यांचे दि.२९.०६.२००७ रोजीच्या निर्णयाची प्रत) त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, तसेच अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली असताना देखील अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात येऊन घेऊन जाण्याचे, माहिती देण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर सूचवून अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती (नायब तहसीलदार (महसूल),पैठण यांचे दि.२९.०६.२००७ रोजीच्या निर्णयाची प्रत) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) विभागीय आयुक्त (महसूल) औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंतराव पंडितराव देशमुख, घ.नं.के.१४ अरिहंतनगर,आकाशवाणीमागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२७
निर्णय दिनांक १५-०६-२००९

१. श्री. वसंतराव पंडितराव देशमुख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली, प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणित करुन दिली नाही व त्यांची दिशाभूल करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९७-१९९८ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) निवड केलेल्या आदर्श ग्रामसेवकाबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी आदर्श ग्रामसेवक निवड समितीचा कार्यवृत्तांत व यादी प्राप्त गुणांसहीत छायांकित सत्य प्रत.

२) पंचायत समिती, औरंगाबाद यांनी आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी शिफारस करुन पाठविलेली यादी गुणांसहीत छायांकित सत्यप्रत."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, सन १९९७-९८ या वर्षामध्ये 'आदर्श ग्रामसेवक' ही योजना लागू नव्हती. ही योजना १९९८-९९ या कालावधीत हाती घेण्यात आली, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.०१.२००८ रोजी पारित केले. तथापि हे आदेश जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून दि. २२.०१.२००८ रोजी प्रत्यक्षात पारित केले गेले. या अपील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना दि.१७.०१.२००८ रोजीपर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले गेले होते. यानंतर दि.२५.०२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सन १९९८-९९ या वर्षाच्या 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराबाबत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली ही माहिती अपिलार्थीस समाधानकारक न वाटल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे 'आदर्श ग्रामसेवक'पुरस्काराबाबत सन १९९७-

९८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. तथापि या कालावधीमध्ये 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्कार अशाप्रकारची कोणतीही योजना ग्राम विकास विभागातर्फे हाती घेण्यात आली नव्हती. ही योजना प्रथमतः सन १९९८-९९ मध्ये घेण्यात आली, त्यावेळी 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराबाबत जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी ज्या उमेदवारांचा विचार केला होता, त्या उमेदवाराच्या निवडयादीची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, सन १९९८-९९ या वर्षाकरिता 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्काराच्यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्याकडे निवड समितीच्या बैठकीकरिता वेळ मागितला होता, तथापि यानंतर ही बैठक झाली किंवा कसे याबाबतची कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडील नस्तीवर उपलब्ध नाहीत. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या कार्यालयात अनौपचारिक चौकशी केली असता, अशाप्रकारची बैठक झाली नसल्याचे त्यांना तत्कालीन कर्मचाऱ्यांकडून अवगत करुन दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

वरील घटनाक्रम,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्कार १९९७-९८ या कालावधीशी संबंधित माहिती असे नमूद केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. अर्थात्, यानंतर अपिलार्थीस अधिक माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १९९८-९९ च्या कालावधीशी संबंधित या योजनेची माहिती दिली आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, 'आदर्श ग्रामसेवक' निवड समितीपुढे अपिलार्थी यांचेही नाव समाविष्ट होते. या विषयाच्या निवडीसंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये वरीलप्रमाणे वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर केलेल्या अपील अर्जावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्यप्रत असे साक्षांकन केलेल्या प्रतीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती

मागितली होती. मात्र अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अशाप्रकारे साक्षांकित करुन दिलेली नाही. परंतु येथे असाही मुद्दा उपस्थित होत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे १९९७-९८ सालची/या वर्षाची माहिती मागितली असल्याने आणि या वर्षी 'आदर्श ग्रामसेवक' पुरस्कार कोणासही देण्याचे प्रस्ताव नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेला प्रथम प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थीस या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी बरोबर/योग्यप्रकारे करता आली नाही, यासाठी अपिलार्थी हेच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंतराव पंडितराव देशमुख, घ.नं.के.१४ अरिहंतनगर,आकाशवाणीमागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२८
निर्णय दिनांक १५-०६-२००९

१. श्री. सौदागर महंमद वसीम एकबाल, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
अंध विद्यालय,देगलूर,
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
सुगंध शिक्षण प्रसारक मंडळ,देगलूर मार्फत अंध
विद्यालय,देगलूर,ता.देगलूर,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०८.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सुगंध शिक्षण प्रसारक मंडळ,देगलूर मार्फत अंध विद्यालय, देगलूर,जि.नांदेड यांच्याकडे दि.०५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीचा अपील अर्ज स्वीकारण्यास त्यांनी नकार दिल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अंध विद्यालयातील कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नावाची यादी,त्यांची नेमणूक दिनांक,कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायम नियुक्तीसाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहीरातीबाबत व्यापक व्याप्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे विद्यालय स्थापन झाल्यापासून अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या दिनांकापर्यंतच्या कालावधी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. या नंतर अपिलार्थीने त्यांना माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.०५.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकारण्यास नकार दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी मूळात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविल्याच्या संदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर केला नाही. त्यामुळे योग्य त्या पुराव्याच्या व सर्व संबंधितांच्या उपस्थितीअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम एकबाल,रा.समिराबाग,खडकपुराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,अंध विद्यालय,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,सुगंध शिक्षण प्रसारक मंडळ,देगलूर मार्फत अंध विद्यालय,देगलूर,ता.देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२९
निर्णय दिनांक   १५-०६-२००९

१. श्री. सौदागर महंमद वसीम एकबाल, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, नांदेड
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, नांदेड
जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने दि. १०.०८.२००७ रोजी तालुका कृषि अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनी देखील अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम अपिलाची सुनावणी न घेऊन प्रकरण प्रलंबित ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००५ ते दि. २०.०६.२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील ठिंबक सिंचन योजनेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०२.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती, परंतु ही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १०.०८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीने त्यांचा हा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केल्याच्या पुरावा म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रथम लिपीकाची सही असलेले दि. १०.०८.२००७ रोजीच्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीचा दि. १०.०८.२००७ रोजीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले असल्याचे सिध्द होत आहे. मात्र या अर्जावर पुढे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेतला, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. कारण आज रोजी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.०३.०६.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे कळवूनही, आज रोजी सुनावणीस ते स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कुणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या दि. १०.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तालुका कृषि अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१०.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम एकबाल,रा. समीराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,नांदेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३०
निर्णय दिनांक १५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>हदगाव,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>हदगाव,जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०१.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. ३०.०४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी प्रथम अर्ज दाखल केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३०.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत पिंपळगाव तालुका हदगाव येथील ७-२-१/बी/२ एलबीएस व ७-२-१/बी-५,नालाबंडिग रोहयो अंतर्गत घेतल्या गेलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये मजूरांचे मस्टर्स, मोजमापपुस्तिका यांच्या सत्यप्रती व पुढे सन २००५-२००६ व २००६-२००७ या आर्थिक वर्षात हदगाव तालुक्यातील मंडळनिहाय पूरग्रस्त शेतकऱ्यांना वाटप केलेल्या अनुदानाची शेतकऱ्यांच्या नावासह व त्यांनी घेतलेल्या चेक क्रमांकासहीत व शेतकऱ्यांना चेक वाटप करतेवेळेस शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या व त्यांना जामीन व ओळख देणाऱ्या जामीनदारांच्या स्वाक्षऱ्यांच्या सत्यप्रती व मंडळनिहाय किती रकमेचे वाटप करण्यात आले इ.माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००३-०४, २००५-०७ व २००६-०७ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने, त्यांनी त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे, त्यावरुन अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे,मात्र या अर्जावर पुढे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेतला, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. कारण आज रोजी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.०१.०६.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे कळवूनही, आज रोजी सुनावणीस ते स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कुणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या टप्प्यावर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हादगाव जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ,मुख्य संपादक,सा.सत्यवृत्त,मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड, नांदेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हदगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३१
निर्णय दिनांक १५-०६-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,पोस्ट बेसिक आदिवासी आश्रम शाळा, मौ. साळवाडी, पो.भोकर,जि.नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत गाडगे बाबा,प्रतिष्ठाण नांदेड मार्फत पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा, मौ.साळवाडी,पो.भोकर,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाद्वारे दि. २४.११.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०१.२००८ रोजी दिलेल्या पत्रानुसार त्यांच्याकडून शाळेची संपूर्ण माहिती मागितली असता, दोन शाळांची माहिती देऊन जाणीवपूर्वक जास्तीचे शुल्क आकारुन जन अपिलीय अधिकारी यांची दिशाभूल केली त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत गाडगे बाबा प्रतिष्ठाण नांदेड, (मार्फत पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा,मौ.साळवाडी,पो.भोकर,जि.नांदेड.) यांच्याकडे दि.

०९.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी सदर अपीलाचे रजिस्टर्ड पाकीट स्वीकारण्याचे नाकारल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा, मौ.साळवाडी,पो.भोकर,जि.नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित शैक्षणिक वर्ष १९९५-२००७ या बारा वर्षाच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी संस्थेच्या सचिवांकडे प्रथम अपिलीय प्राधिकरण म्हणून दि. ०९.०१.२००८ रोजी प्रथम अपील सादर केले, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, परंतु या अर्जाची प्रत आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट केलेली नाही. केवळ संबंधित सचिवांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

मूळात या प्रकरणी अपिलार्थीने सचिव, संत गाडगे बाबा,प्रतिष्ठाण नांदेड मार्फत पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा, मौ.साळवाडी,पो.भोकर,जि.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केल्याबाबत नोंद असलेले कोणतेही कागदपत्र पुरावा म्हणून आयोगास उपलब्ध करुन दिलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीचे त्यांनी दि.०९.०१.२००८ रोजी संबंधित संस्थेच्या सचिवांकडे प्रथम अपील केले होते, या त्यांच्या विधानाबाबत आयोग साशंक आहे. मूळात आदिवासी आश्रम शाळेकरिता प्रत्येक जिल्हयामध्ये विभागीय समाजकल्याण अधिकारी यांची प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून समाजकल्याण विभागातर्फे नेमणूक केली गेली आहे, बहुधा अपिलार्थीस हे ज्ञात नसल्याने त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे त्यांचे प्रथम अपील सादर केले आहे.आता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील

अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेल्या सर्व जोडपत्रासह दाखल करावे, म्हणजे अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय प्राप्त करुन घेता येईल.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस सूचना देऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ,रा.मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,पोस्ट बेसिक आदिवासी आश्रम शाळा, मौ. साळवाडी, पो.भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, संत गाडगे बाबा,प्रतिष्ठाण नांदेड मार्फत पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळा, मौ.साळवाडी,पो.भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ६३२/०८,६३३/०८,६३४/०८,६३५/०८ व ६३६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३२,६३३,६३४,६३५ व ६३६
निर्णय दिनांक १५-०६-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव (रेणुकाई),ता.भोकरदन,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.११.२००८ रोजी नोंदविलेली चार (अपील क्र.६३२/०८,६३३/०८,६३४/०८,६३५/०८) व दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले एक (अपील क्र.६३६/०८) अशी एकूण पाच स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी पाचही प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या पाचही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सुनावणी होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस

पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपीले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे नमूद केले असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या पाचही प्रकरणांपैकी अपिलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या एका,दि. १४.०८.२००८ रोजीच्या तीन व दि. १८.०९.२००८ रोजीच्या एका स्वतंत्र मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विविध कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या जालना आणि परभणी उपविभागासंदर्भात रोजगार हमी योजनेमध्ये केल्या गेलेल्या कामासंबंधी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील विविध पाझर तलावाच्या संदर्भात असून त्या माहितीमध्ये अंदाजपत्रकाची मूळ रक्कम, शासकीय अधिकाऱ्याचे नाव, मजूरांना मजूरी कोणत्या ग्रामपंचायत कार्यालयात वाटप केली होती, सरपंच,ग्रामसेवक,तलाठी,पोलीस पाटील यांचे प्रमाणपत्राची झेरॉक्स, मोजमाप पुस्तिकेची झेरॉक्स प्रत - या माहितीचा समावेश होता. अपिलार्थीच्या या पाचही मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०९.२००८(अपील क्र.६३२/०८ व ६३३/०८च्या संदर्भात), दि. १९.०९.२००८ (अपील क्र. ६३४/०८ व ६३५/०८ च्या संदर्भात) व दि. १६.१०.२००८ (अपील क्र.६३६/०८ च्या संदर्भात) रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीच्या या पाचही प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे

पाच स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत. या साधर्म्यामुळे विचाराधीन पाचही अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या पाचही अपील अर्जासंदर्भात आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देणे अपेक्षित होते, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य योग्य त्या पध्दतीने पार पाडलेले नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना भाग होते. अपिलार्थीचे माहितीसाठीचे मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये वेळेवर प्राप्त झाल्याचे आढळून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आजतागायत म्हणजेच नऊ महिन्यांचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही माहिती प्राप्त न होणे हे संबंधित विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या अकार्यक्षमतेचे द्योतक तर आहेच, परंतु जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीची त्यांना पर्वा नसल्याचे देखिल सिध्द केल्याचे दिसून येत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या वर्तनाने ते अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची एक संधी देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती

अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा असे आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस अपेक्षित माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे, आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा.पिंपळगाव (रेणुकाई),ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२५
निर्णय दिनांक १५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संतोष रामप्रसाद कासट,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजीचे दि.२५.०३.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ११.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर केल्यानंतर त्यांनी तीस दिवसांच्या आत माहिती न मिळाल्याने, दि. २४.०१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु या अपिलाच्या सुनावणीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमध्ये त्यांचे प्रथम अपिलाचा निकाल लागला. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही तसेच मुदतीनंतर मिळालेली माहिती देखील उशिरा व दिशाभूल करणारी आहे. त्यांना प्राप्त झालेल्या अशा माहितीमुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.याच अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना परिपूर्ण माहिती

प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील संगणकाद्वारे निविदा टायपिंग,प्रिंटींग व बायंडिग इत्यादी प्रकारच्या कामाबद्दलची दि. ०१.०१.१९९८ ते दि. ११.१२.२००६ पर्यंतची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.९४/- इतके शासकीय कोषागारात भरुन त्यापृष्ठयर्थ शासकीय कोषागारातून प्राप्त होणाऱ्या चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याच्या सूचना अपिलार्थीस दिल्या. त्याप्रमाणे दि. १२.०१.२००७ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या रकमेचा भरणा केला. तथापि मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. २४.०१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीचा निर्णय त्यांनी दि.०२.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिला. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीस त्यांना प्राप्त झालेली माहिती त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परिपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व जी माहिती प्राप्त झाली आहे, ती देखील चुकीची व दिशाभूल करणारी वाटत असल्यामुळे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे. मात्र ही माहिती अपिलार्थीस निश्चितपणे कधी प्राप्त झाली, कोणती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही व प्राप्त माहितीने अपिलार्थीची कशी दिशाभूल झाली अथवा प्राप्त माहिती चुकीची कशी आहे,हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या लेखी युक्तिवादाचे समर्थन आयोगाकडे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष रामप्रसाद कासट,द्वारा सिध्दी कॉम्प्युटर्स,ए-२१ सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स,सहयोगनगर,बीड,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३००

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. पंडित सुहास वाल्मिक, : अपिलार्थी
" सुरेख भवन, " प्लॉट नं. ३२, गणेशनगर, नूतन कॉलेजच्या
पाठीमागे, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दिनांक १८-१२-२००७ रोजी अपिलाची सुनावणी व्यवस्थित करण्यात आली नाही व त्यांना अद्याप माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. शेषराव रामभाऊ लिपने, मु. सिध्दनाथ बोरगांव, तालुका सेलू जिल्हा परभणी यांच्या शेतामध्ये जन माहिती अधिकारी यांनी स्मशानभूमी कोणत्या नियमाने केली यासंदर्भात विविध मुद्दयांव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राअभावी कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सुनावणी व्यवस्थित झाली नसल्याचा उल्लेख केल्याचे आढळून येत आहे. नैसर्गिक न्यायतत्वाने अपिलार्थीस त्यांचे म्हणणे पूर्णतः मांडण्याच्या दृष्टीने, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे इष्ट राहिल असे आयोगाचे मत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंडित सुहास वाल्मिक, " सुरेख भवन, " प्लॉट नं. ३२, गणेशनगर, नूतन कॉलेजच्या पाठीमागे, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९३

निर्णय दिनांक १६-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. हनुमंत रावसाहेब कुलकर्णी,<br>ग्रामपंचायत सदस्य, जवळा बाजार, तालुका औंढा (ना.),<br>जिल्हा हिंगोली | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.),<br>तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, औंढा (ना.), तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १२-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०९-१०-२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांच्याकडे अर्ज केल्यानंतर सदर माहिती ग्रामसेवकाकडून मिळेल असे त्यांना पंचायत समिती येथून सांगण्यात आले. त्यांनी अपील केल्यानंतरही संबंधितांनी त्यांना अर्धवट, अपुरी व संभ्रम करणारी माहिती दिली. जवळा बाजार ग्रामपंचायतकडून गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

औंढा (ना.) मार्फत तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी बारावा वित्त आयोग २००५ ते २००६ निधी व खर्चाचा तपशील दिला नाही, एस. जी. आर. वाय. चा पदभार दिला नाही व बांधकामाबाबत निधी खर्चाबाबतचा पदभार जमा व खर्च दिला नाही. या अपील अर्जामध्ये त्यांनी ग्रामविकास अधिकारी यांना अंतीमत: पदभार न देण्याची कारणे काय असतील, अपूर्ण पदभार देणे घेणे कितपत योग्य आहे याबाबत पूर्ण चौकशी आयोगाकडून अपेक्षित करुन माहिती अधिकार अधिनियमान्वये संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व तसेच अपिलार्थीस सुनावणीसाठी नोटीस देऊन हजर करणे कितपत योग्य आहे यासंदर्भात आयोगाचे मत अपेक्षिले होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत जवळा बाजार संदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बारावा वित्त आयोग सन २००५ - ०६ किती निधी प्राप्त झाला व किती खर्च, सर्व बांधकामासाठी किती निधी प्राप्त झाला व खर्च, एस. जी. आर. वाय. २००५ - ०६ - ०७ प्राप्त निधी व खर्च, पूर्ण व अपूर्ण कामाची संख्या, ग्रामपंचायत उत्पन्न व खर्च बाबनिहाय विवरण देणे व २००५-०६ मध्ये किती घरकुले मंजूर केली, किती पूर्ण व किती अपूर्ण असण्याची कारणे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने हा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा ना. यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बिनातारखेच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती संबंधित ग्रामसेवकाकडून घेण्याचे सूचित केले आहे व त्याची प्रत ग्रामसेवकास अग्रेषित करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. यावर संबंधित ग्रामसेवकाने त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांना एकूण २ मुद्दयाशी संबंधित माहिती, बारावा वित्त आयोग व एस. जी. आर. वाय. शी संबंधित माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय घेतला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाप्रमाणे आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना बारावा वित्त आयोग व एस. जी. आर. वाय. आणि बांधकामाबाबत निधी या मुद्दयासंदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील " अपूर्ण असण्याची कारणे काय " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण अपिलार्थीने विचारलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे हे पाहता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो न दिली गेलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांनी विना तारखेचे व अपूर्ण क्रमांकाचे पत्र पाठवून आणि अपिलार्थीस संपूर्ण माहिती विहीत मुदतीत न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी

यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब संबंधित ग्रामसेवक जवळा (बाजार )यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.) यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनुमंत रावसाहेब कुलकर्णी, ग्रामपंचायत सदस्य, जवळा बाजार, तालुका औंढा

(ना.), जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा (ना.), तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औंढा (ना.), तालुका औंढा (ना.), जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९४

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. केंद्रे यशवंत परशुराम, : अपिलार्थी

व्दारा, श्रीमती केंद्रे व्ही. एम.,

साने गुरुजी प्रा. वि. मंदिर, स्टेशन रोड, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापिका, रुक्मीणीमाता माध्यमिक कन्या

विद्यालय, हंडरगुळी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, विठ्ठल रुखमाई शिक्षण प्रसारक मंडळ,

हंडरगुळी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : १. श्री. चिल्लमपांडे आर. एम.

२. श्रीमती केंद्रे प्रेमला परशुराम

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जन माहिती

अधिकारी व जन अपिलीय अधिकारी तथा संस्थाचालक यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे लेखी स्वरुपात माहिती देण्याचे नाकारले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती त्यांना मुख्याध्यापक व संस्थाचालक यांनी संगनमताने सेवेतून कमी केले असल्याने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून चार मुद्दयांवर खालीलप्रमाणे माहिती अपेक्षिली होती.

" १. शाळेतील कर्मचा-यांच्या वेतनवाढी नियमित आहेत का ? वेतनवाढी किती कर्मचा-यांच्या एक ते तीन वर्षापर्यंत रोखण्यात आल्या आहेत.

२. सेवीका केंद्रे पी. पी. यांच्या वेतनवाढी तीन वर्षापासून कोणत्या कारणास्तव रोकल्या आहेत. जून ०४, जुलै ०४, चा पगार काढला आहे काय ? मे ०२, ०३, ०४ चा पगार एकदम २००७ मध्ये कपात करण्याचे कारण.

३. सेवापूस्तीका अद्यावत आहेत का ?

४. आर. डी. खाते क्रमांक ४४२२७०८ ची ७०० रु. पगारातून कपात रक्कम कुठे जमा आहे. इत्यादी माहिती ऑफिस शी संबंधीत विचारली होती. "

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित त्यांच्या सेवेसंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्रयस्थ पक्षांनी असहमती दर्शविल्यामुळे व श्रीमती केंद्रे यांनी काहीही न कळविल्यामुळे माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

दिनांक ०६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदरचे अपील संबंधीत संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने दिनांक १०-१०-२००७ रोजी संबंधित संस्थेच्या सचिवाकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीचे म्हणणे नाकारल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, संस्थेच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा समावेश आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस आता ज्या चार मुद्दयावर माहिती अपेक्षित आहे त्यातील बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबतची कारणे विचारणारी व त्यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणारी या अशा स्वरुपाची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने शाळेतील कर्मचा-यांच्या वेतनवाढी नियमितपणे आहे काय, एक ते तीन वर्षापर्यंत वेतनवाढी रोखण्यात आलेल्या कर्मचा-यांची संख्या, ही माहिती विचारली आहे. यातील वेतनवाढी देय आहेत काय, या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही, कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अन्वये अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अथवा स्पष्टीकरण विचारणे

अनुज्ञेय नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या शाळेतील श्रीमती केंद्रे यांच्या वेतनवाढी कोणत्या कारणास्तव रोखल्या आहेत, जून २००४ चा पगार काढला आहे काय, मुद्दा क्रमांक २, ३, ४ चा पगार एकदम २००७ मध्ये कपात करण्याची कारणे काय ही माहिती विचारली होती. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, सेविका श्रीमती प्रेमला परशुराम केंद्रे यांची वेतनवाढ रोखण्याचा निर्णय त्यांनी ज्या आदेशाव्दारे अथवा त्यांच्याकडील ज्या अभिलेखावर, ज्या टिपणीआधारे घेतला होता त्या टिपणीची व आदेशाची प्रत त्यांना अपिलार्थीस या मुद्दयांसंदर्भात माहिती देतांना द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ संदर्भात सेवापूस्तीका अद्यावत आहेत का ? एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. मात्र सेवापुस्तकाच्या इतर कोणत्याही संदर्भात त्यांनी या मुद्दयामध्ये माहिती विचारली नाही. तसेच या मुद्याव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षिले आहे. अपिलार्थीच्या या मुद्दयाचे अवलोकन केल्यास अपिलार्थीने ही माहिती मोघम स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपात विचारली आहे. जे अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीने त्यांनाआवश्यक असलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ मध्ये आर. डी. खाते क्रमांक ४४२२७०८ ची ७०० रुपये पगारातून जमा कपात रक्कम कुठे जमा आहे ही माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या मुद्दयासंदर्भात असे अवगत केले की, ही रक्कम त्यांनी श्री. काळे प्रदीप धोंडीराम यांच्या खात्यावर जमा केली आहे. ही व्यक्ती शाळेची कर्मचारी नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे केलेल्या स्पष्टीकरणावरुन असे आढळून येते की, श्रीमती केंद्रे यांच्या वाट्याची शासनाकडून आलेली ७०० रुपये इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शाळेशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसलेल्या दुस-या व्यक्तीच्या खात्यामध्ये जमा केली आहे. आयोगाच्या मते ही शासकीय निधीची सरळ सरळ अफरातफर असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

लातूर यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणाची त्यांनी त्यांच्या स्तरावर सखोल चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने शासनाची रक्कम अनोळखी व्यक्तीच्या खात्यात जमा केलेल्या गैरव्यवहाराची त्यांनी चौकशी करुन त्यांना आवश्यक वाटल्यास संबंधित संस्थेवर, संबंधित मुख्याध्यापिकेवर योग्य ती कारवाई करावी. तसेच शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान जर संबंधीत व्यक्ती स्वीकारत नसेल तर ते अनुदान शासनाच्या खात्यावर जमा करण्याची कारवाई त्वरित करावी.

अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे वरील प्रमाणे केलेले पृथःकरण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या आयोगाकडील अर्जातील मुद्दा क्रमांक १ अंशतः, मुद्दा क्रमांक २ व मुद्दा क्रमांक ४ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित मुख्याध्यापिकेने संबंधिताच्या खात्यावर जमा केलेल्या ७०० रुपय रकमेच्या संदर्भात त्यांच्या स्तरावर आवश्यक ती चौकशी करुन संबंधितांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक १ अंशतः, मुद्दा क्रमांक २ व मुद्दा क्रमांक ४ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने केलेल्या ७०० रुपये इतक्या रक्कमेच्या अफरातफरीची त्यांच्या स्तरावर चौकशी करुन संबंधितावर आवश्यकतेप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. केंद्रे यशवंत परशुराम, व्दारा, श्रीमती केंद्रे व्ही. एम., साने गुरुजी प्रा. वि. मंदिर, स्टेशन रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, रुक्मीणीमाता माध्यमिक कन्या विद्यालय, हंडरगुळी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, विठ्ठल रुखमाई शिक्षण प्रसारक मंडळ, हंडरगुळी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९५

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
एन-११, नवजीवन कॉलनी, के-४०/४०, हडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २१-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी सुनावणी घेतली नाही व जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः माहिती मागविली असता त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढून माहिती अधिकार अधिनियम २००५ चा अवमान केला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने केलेल्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी, दिनांक ०१-०१-२००६ ते १९-१२-२००७ या कालावधीशी संबंधित माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपेक्षित माहिती पाठविली होती. तथापि या माहितीचा स्वीकार अपिलार्थीने केला नाही. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता यामध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, अपिलार्थीचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेला मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील यावर अपिलार्थीने स्वाक्षरी केली नाही. तसेच यासंदर्भात सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी अपिलार्थीस बोलाविण्यात आले असता अपिलार्थीस सुनावणीचे पत्र घेतले नाही. या पत्रव्यवहाराचे वैशिष्ट्ये म्हणजे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या पत्रावर त्यांचीही स्वाक्षरी नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे दिनांक १८-०८-२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अशा प्रकारच्या बाबींचे अवलोकन करता व अपिलार्थीने संबंधित शिक्षणाधिका-याच्याकडे माहिती मागविल्याचे पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे इष्ट राहील असे आयोगाचे मत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक

२१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, नवजीवन कॉलनी, के-४०/४०, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९६

निर्णय दिनांक १६-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अलताफ अहेमद सानी पिता शेख अमीर,<br>रा. घर नं. ९-६-१००६, खुसरोनगर, चुनाभट्टी,<br>देगलूर नाका, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी माहिती न देता दिनांक ०६-०२-२००८ रोजी दिशाभूल करणारी माहिती दिली त्यामुळे त्यांनी दिनांक १५-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" २० नोव्हेंबर २००७ रोजी "अल्पसंख्यांक दिवस" होता, हा दिवस नांदेडात साजरा करण्यात आला किंवा नाही. सदरील दिवस साजरा करण्याकरिता जिल्हाधिकारी साहेबांनी कोणास जबाबदारी दिली होती व त्यांनी ती जबाबदारी का पूर्ण केली नाही. दै. प्रजावाणीच्या दिनांक ११/१२/२००७ च्या अंकात पहिल्या पानावर "अल्पसंख्यांक कल्याणदिना शिक्षण विभागाला विसर" ह्या मथळ्याखाली प्रकाशीत झाली त्यात तथ्य आहे किंवा नाही ? पुर्ण माहिती तपशीलवार मिळणेबाबत. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचा खुलासा अपेक्षित करणा-या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबत अथवा त्यांच्या निर्णयाबाबत कारणे विचारणे अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये दिलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येते की, या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे एवढीच सीमित प्रक्रिया माहिती मागणे व देणे यामध्ये अभिप्रेत आहे. विचाराधीन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने दै. प्रजावाणीच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या पहिल्या पानावर अल्पसंख्यांक कल्याणदिनाचा शिक्षण विभागास विसर या मथळ्याखालील या मुद्दयावरील माहिती विचारली आहे. परंतु या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, जर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी, शिक्षण विभागाकडे काही खुलासा केला असेल तर त्यांच्या खुलाशाची एक प्रत त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी २० नोव्हेंबर २००७ रोजी अल्पसंख्यांक दिवस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात साजरा करण्यात आला होता किंवा कसे याबाबत माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. केवळ कार्यालयातील तांत्रिक तरतुदी कळवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारणे ऐवजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात, मूळ अर्जाच्या संबंधात माहिती मिळविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी दिनांक २० नोव्हेबर २००७ हा दिवस अल्पसंख्याक दिवस म्हणून साजरा केला जातो किंवा व तसेच त्यांनी दैनिक प्रजावाणीच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या अंकात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठांकडे काही खुलासा केला असल्यास ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद                                  ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९                          राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अलताफ अहेमद सानी पिता शेख अमीर, रा. घर नं. ९-६-१००६, खुसरोनगर, चुनाभट्टी, देगलूर नाका, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९७

निर्णय दिनांक १६-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख,<br>रा. मुरुम, तालुका उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>विशेष प्रकल्प विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केलेला असून या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी समाधानकारक निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मे. शिवम कन्स्ट्रक्शन कंपनी, येणेपूर टोल नाका यांनी १०० रुपयाची बोगस पावती क्रमांक ९ दिल्याबद्दल याचा सविस्तर खुलासा करण्याबाबत पावतीवर टोलनाक्याचे ठिकाण तसेच वाहतुक क्रमांक (गाडी नंबर किती आहे याचा उल्लेख ) नाही."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २१-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले व अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील टोल नाक्यावर त्यांना प्राप्त झालेल्या टोल पावतीसंदर्भात त्यांची तक्रार असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००८ रोजी व्यवस्थितपणे सुनावणी घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळतांना संबंधित अपिलार्थी हे त्यांनी जन माहिती अधिकारी

यांच्याकडे सादर केलेली पावती ही येणेगुर नाका यांची असल्याबाबत खात्री करुन घेऊ शकले नाहीत. त्यामुळे पुराव्याअभावी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळल्याचे दिसून येते. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे असे नव्हे तर अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रकाराची पुनरावृत्ती झाल्यास कशा प्रकारे कार्यवाही करावयाची याचेही मार्गदर्शन त्यांनी अपिलार्थीस केल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व सबंधितांची असलेली अनुपस्थिती व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर दिलेला सविस्तर निर्णय पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. उपरोक्त परिस्थितीत अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९८

निर्णय दिनांक १६-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेवाळे विजयकुमार मल्हारराव,<br>रा. बसवेश्वर चौक, लोहारा, तालुका लोहारा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा,<br>तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, लोहारा तालुक्यातील १४ गावातील निवडणूक प्रक्रियेत तहसीलदार व अव्वल कारकून यांनी संगनमताने उमेदवारी अर्ज विक्री व मतदार यादी विक्रीमध्ये अफरातफर केल्याने व त्यांना अपुरी व खोटी दिली असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, संबंधितांनी जाणुनबुजून योजनाबध्द पध्दतीने केलेल्या चूका असून अधिकाराचा गैरवापर करुन भ्रष्टाचार केला आहे.

आणि या भ्रष्टाचार प्रकरणी कार्यवाही होणे गरजेचे असल्याने तसेच त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज मुद्देनिहाय निकालात न काढल्याने नमूद केले आहे त्यामुळे अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करणे भाग पडले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, उमेदवारी अर्ज विनामूल्य असतांना व प्रती अर्ज रुपये वीस व मतदार याद्यांची एकूण संख्या ५४ असून विक्रीचा दर १०० रुपये प्रती यादी याप्रमाणे विक्री केली व त्याच्या पावत्या संबंधितांना दिल्या नाहीत हे योग्य आहे काय ? यासंदर्भात एकूण विक्री रक्कम १२७४० इतकी होते परंतु संबंधितांनी ८३७० इतक्याच रकमेचा भरणा चलन नंबर ०००१ ने केला आहे. चलन स्वीकारणारी व चलन भरणा करणारी एकच व्यक्ती आहे. असे असतांनाही याविषयी कोणतीही चौकशी न करता प्रकरण निकाली काढणे म्हणजेच अधिकाराचा गैरवापर व माहिती अधिकाराचा संबंधितांनी बट्याबोळ केला आहे असे म्हणावे लागेल.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोहारा तालुक्यातील एकूण १४ गावातील ग्रामपंचायत निवडणुकीकरिता विक्री केल्या गेलेल्या उमेदवारी अर्जाची व मतदार याद्यांच्या विक्रीच्या माहितीची मागणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर स्वतःचे अभिप्राय व्यक्त करुन आपल्या मूळ माहितीची व्याप्ती वाढविली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी एकूण ५७ मतदार याद्यांची विक्री केली असता त्या विक्रीपोटी जमा झालेले रुपये ४७०० व एकूण नामनिर्देशनपत्रांची विक्री होऊन प्रती पत्र रुपये १० याप्रमाणे ३६७ पत्रांचे ३६७० रुपये त्यांनी शासकीय कोषागारात एकत्रित भरले. मतदार यादीच्या बिलामध्ये त्यांनी आयोगास प्रस्तुत केलेला मतदार यादी दर हा पृष्ठांच्या संख्येवर अवलंबून असल्याने त्यांनी विक्री केलेल्या एकूण ५७ मतदारयाद्यांच्या प्रतीपैकी त्यातील ३७ मतदार याद्या १०० रुपये या दराने व ३० मतदार याद्या ५० प्रती यादी या दराने विक्री केली आहे. नामनिर्देशनपत्रा करिता त्यांच्या कार्यालयाने १० रुपये प्रमाणे आकारणी केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मतदार याद्या व नामनिर्देशपत्रांच्या विक्रीसंदर्भात एकूण १२७४० रुपये इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले असतांना देखील त्यांनी शासकीय कोषागारात फक्त ८३७० रुपयांचा भरणा केला. अपिलार्थीने केल्याप्रमाणे प्राप्त झालेल्या रक्कमपेक्षा कमी रक्कम कोषागारात भरुन संबंधितांनी आपल्या अधिका-याचा गैरवापर करुन केलेला हा भ्रष्टाचार आहे. अपिलार्थीने आपले हे अभिप्राय व्यक्त करतांना एकूण ५४ मतदार याद्यांची सरसकट विक्री १०० रुपयाप्रमाणे झाली असल्याचे म्हटले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या मते मतदार यांद्यांच्या पृष्ठाच्या

संख्येनुसार हा दर बदलत असतो. त्यांनी विक्री केलेल्या एकूण ५७ मतदार याद्यांच्या प्रतीपैकी त्यातील ३७ मतदार याद्या १०० रुपये या दराने व २० मतदार याद्या ५० रुपये प्रती यादी या दराने विक्री केली आहे. अशा प्रकारे एकूण मतदार याद्यांच्या विक्रीपोटी त्यांच्याकडे ४७०० जमा झाले व नामनिर्देशनपत्राकरिता १० रुपये प्रती नामनिर्देशनपत्राची आकारणी केली व नामनिर्देशनपत्रांची विक्रीपोटी जमा झालेली रक्कम ३६७० असे एकूण ८३७० रुपये त्यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी लोहारा येथील शासकीय उपकोषागारात भरणा केले.

(जन माहिती अधिकारी यांनी विक्री केलेल्या मतदार यादी व नामनिर्देशनपत्रांचे दर अधिकृत आहे किंवा कसे याची विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी उस्मानाबाद जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तोंडी सूचनेप्रमाणे त्यांनी ही कारवाई केली असे आयोगास अवगत केले)

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमदर्शनी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती चुकीची आहे. या माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस एकूण ५४ मतदार याद्या दिल्याचे नमूद केले आहे. परंतु आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५७ मतदार याद्यांची विक्री केल्याचे सुनावणीमध्ये निष्पन्न झाले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये संबंधित तहसीलदार व अ. का. यांनी एकूण १२७४० वजा ८३७० असे एकूण ४३७० रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगाने या मतदार याद्यांच्या दरासंदर्भात शासनाचे अथवा त्यांच्या वरिष्ठांचे कोणते लेखी आदेश आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी मतदार याद्या व नामनिर्देशनपत्रांच्या विक्री प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या तोंडी आदेशाव्दारे हे सगळे केल्याचे आयोगास अवगत केले. ग्रामपंचायतच्या निवडणूका घेत असतांना राज्य शासनाकडून संपूर्ण राज्यामध्ये निश्चित एकच धोरण अवलंबिले जात असणार यात शंका नाही. मतदार यादी व नामनिर्देशनपत्राबाबत

निश्चित कोणते नियम प्रचलीत आहेत याची संबधिांना काही माहिती नाही हे पाहता, या प्रकरणी सचिव (महसूल) यांनी चौकशी करणे आयोगास गरजेचे वाटते. तसेच या प्रकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५७ मतदार याद्यांची विक्री केल्याचे तर अपिलार्थीस ५४ मतदार याद्यांची विक्री केल्याचे त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे स्पष्ट केले आहे. संबधित जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस -- यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मतदार याद्यांच्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मतदार याद्या विक्री संदर्भातील अचूक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (श्री. व्ही. एस. पवार संबंधित तहसीलदार, सध्या तहसीलदार, बार्शी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १६-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेवाळे विजयकुमार मल्हारराव, रा. बसवेश्वर चौक, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९९

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. राजेंद्र मंजितराव क्षीरसागर, : अपिलार्थी
एन-११, नवजीवन कॉलनी, के-३३/१३, हडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, मागितलेली माहिती न देता चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देणे, अवाजवी फी आकारणी करणे, माहिती नष्ट करणे या कारणामुळे त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौजे उमरावती तालुका फुलंब्री येथील स्वस्त धान्य दुकान क्रमांक १६२ च्या संदर्भात एकूण तीन

मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. गणपत गजाबा खंबाट स्वस्त धान्य दुकान क्रमांक १६२ च्या प्राधिकारपत्राची झेरॉक्स प्रत, शासनास आजपर्यंत पैसे भरलेल्या चलनाची झेरॉक्स प्रत, शासनाच्या कोणत्या आदेशाने दुकान क्रमांक १६२ हे दुकान क्रमांक १६१ ला जोडण्यात आले - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी याना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे असणे अभिप्रेत असल्याने त्यांनी दिनांक ०५-१२-२००७ रोजी अपिलार्थीचा मूळ अर्ज तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे पाठविला. यानंतर अपिलार्थीने तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे या माहितीसाठी त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८, ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठपुरावा केला. यानंतर अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक नसलेल्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९० इतक्या रकमेचा भरणा करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस १९ पृष्ठांची माहिती देण्याकरिता प्रतिपृष्ठ रुपये दहा या प्रमाणे १९० रुपये इतक्या शुल्काची आकारणी जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने हे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०१-२००८ रोजी पावती क्रमांक ०७०५००८ व्दारे भरले व माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास पुरवावी असे सूचित केले. मात्र या आदेशानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अनावश्यक व अवाजवी शुल्क आकारुन अवाजवी माहिती दिली. यासंदर्भात त्यांनी आयेगास असे अवगत केले की, त्यांनी श्री. गणपत गजाबा खंबाट यांच्या स्वस्त धान्य दुकान क्रमांक १६२ च्या प्राधिकारपत्राची प्रत मागितली असतांना श्री. उत्तम गजाबा यांच्या प्राधिकारपत्राची प्रत दिली. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. त्यांना मूळ माहितीची आजही आवश्कता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच रुजू झाले असून त्यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी १९ पृष्ठांची माहिती देऊन त्यांच्याकडून प्रतिपृष्ठ रुपये दोन च्याऐवजी प्रतिपृष्ठ रुपये दहा या दराने आकारणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये उत्तम गजाबा यांच्या प्राधिकारपत्राची सत्यप्रत त्यांना प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे असा पुरावा सादर केला आहे की, तहसीलदार, सिल्लोड यांनी तहसीलदार, फुलंब्रीकडे दिनांक ०९-०७-१९९९ रोजी गणपत गजाबा यांच्या १६२ क्रमांकाच्या रेशन दुकानाचे सर्व अभिलेखे हस्तांतरीत केले आहेत. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे असणे अपेक्षित आहे. एवढे असूनही तहसीलदार, फुलंब्री यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती पुरविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याकरिता

जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीकडून तहसीलदार, फुलंब्री यांनी अवाजवी फी वसूल केल्याचे देखील या प्रकरणी त्यांनी निःसंशयपणे सिध्द केले होते. अपिलार्थीने शुल्क भरुनही अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली आहे, असे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना यापूर्वी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रुपये १९० इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करावी, असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

विचाराधीन प्रकरणी वरीलप्रमाणे अपिलार्थीस अनावश्यक शुल्क आकारणी करुन जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब आयुक्त, महसूल, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी त्यांना माहिती देण्यापोटीचे स्वीकारलेले शुल्क १९० रुपये याच कालावधीमध्ये अपिलार्थीस परत करावे.

४.	आयुक्त, महसूल, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१६-०६-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. राजेंद्र मंजितराव क्षीरसागर, एन-११, नवजीवन कॉलनी, के-३३/१३, हडको, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	आयुक्त, महसूल, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६००

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. गिरीष शिवानंद पुणे, : अपिलार्थी

" शिवकृपा " दुध एजन्सीज, कोर्ट रोड, अहमदपूर,

तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर,

तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपायुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

विद्यमान जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक,

नगरपरिषद कार्यालय,

अहमदपूर, जि. लातूर

त्रयस्थ पक्ष : १. श्री. गुळवे,

२. श्री. शेख निजामोद्दीन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षांची पंचवार्षिक व मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे पुरविली नाहीत, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३, ५ व ११ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने देण्याचे नाकारले, तसेच त्यांना व्यापक जनहिताच्या दृष्टीने आरक्षण क्रमांक ९ ची संचिका व अकृषी परवाना नाहरकत प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांनी पुरविले नाही, नागरिकांची सनद तयार नाही असे कळविले आहे या सर्व बाबींमुळे आयोगापुढे व्दितीय अपील केले असल्याचे नमूद करुन त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न दिल्याने त्यांच्यावर, अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे माहिती न मिळाल्याने, प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे अपिलार्थीस शास्तीची रक्कम मिळवून देण्यात यावी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील संपूर्ण माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, अहमदपूर कार्यालय स्थापन झाल्यापासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची त्यांच्या कार्यक्षेत्राच्या संदर्भातील माहिती एकूण ११ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे व ती माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे कळविले. तदनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३५१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ११-०१-२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्याने अपिलार्थीस ४४० पृष्ठांची माहिती दिनांक २१-०१-२००८ रोजी हस्तांतरीत केली व अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेतलेले जादाचे शुल्क त्यांना त्याच दिवशी परत केले. तथापि प्राप्त

माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १८-०२-२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने उपलब्ध असलेली माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती दिनांक ०६-०३-२००८ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सध्याचे जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष, श्री. शेख निजामोद्दीन हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २३-०१-२००८ रोजी व दिनांक ०६-०३-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दिली आहे.

त्रयस्थ पक्ष श्री. शेख निजामोद्दीन यांनी असा युक्तिवाद केला की, ते अहमदपूर नगर परिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाविषयी गोपनीय स्वरुपाची माहिती मागण्याची सवय असून वेळोवेळी ते अहमदपूर नगर परिषदेमधील कर्मचा-यांना माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन धमकी देत असतात. माहिती अधिकाराव्दारे माहिती मागविण्यामागे त्यांचा उद्देश फक्त संबंधित त्रयस्थांकडून मध्यस्थांमार्फत पैसे उकळणे हाच असतो. त्यांच्याविषयी अपिलार्थीने जी माहिती मागितली आहे ती अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही अडचण नाही.

त्रयस्थ पक्षाच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे त्रयस्थ पक्ष श्री. गुळवे व श्री. शेख निजामोद्दीन यांच्या मत्ता आणि दायित्व बाबतची माहिती मागितली आहे. या मुद्दयासंदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येते की, ही माहिती मूळात वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व ही माहिती उघड केल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य न होता संबंधित त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग होईल याची आयोगास खात्री असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही. सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्याबाबत ब-याच अपिलार्थीकडून अशा प्रकारे माहिती मागविण्यात येत असते. तथापि अशा प्रकारची माहिती उघड करण्यात येऊ नये अशी आयोगाने आपली भूमिका अशाप्रकरणी कायम ठेवलेली आहे. अपिलार्थीच्या या मुद्दयातील उर्वरित अपेक्षित माहिती संदर्भात असे आढळून येते की, ही माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीसंदर्भात माहिती देतांना कळविले आहे. सार्वजनिक प्राधिकरणातील नियमित कार्यपध्दतीचे अवलोकन केले असता प्राधिकरणातील कर्मचा-यांचे मत्ता व दायित्व मागण्याचे व दाखल करुन घेण्याची जबाबदारी ही मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर यांची असते. त्यामुळे ही जबाबदारी मुख्याधिकारी यांची असल्याने संबंधित मुख्याधिका-याचे नांव, कार्यालयीन पत्ता, पदनाम इत्यादी माहितीसंदर्भात अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नसावी. मात्र ही देखील माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात दिली नसल्याचे दिसून येत आहे. आता त्यांनी ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या

बाबत देखील याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा कमांक ३ च्या संदर्भातील अपिलार्थीस या मुद्दयाची अंशतः माहिती देय असून ती माहिती दिनांक ०६-०३-२००८ रोजी अपिलार्थीस दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती दिनांक ११-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. मुद्दा क्रमांक ६ च्या बाबत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात असल्याने ही माहिती अपिलार्थीस दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी गोपनीय अहवालाच्या नोंदी व्यतिरिक्त उर्वरित सर्व माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मधील संबंधित गोपनीय अहवालाच्या नोंदी व्यतिरिक्त उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस आता उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ९ ज्या जागेवर टाकण्यात आले आहे त्या जागेचा अकृषिक परवाना मिळण्यासाठी नगर परिषद कार्यालयाने नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या मुद्यावर अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ही माहिती हा 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मोजणीच्या खुणा रोवून देण्यासाठी दिनांक व वेळ कळविण्याची विनंती केली आहे. अशा प्रकारची विनंती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार 'माहिती'चा विषय होऊ शकत

नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ९ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०३-०८ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे या माहितीसंदर्भात आयोगाचे कोणतेही भाष्य नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०१-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. या मुद्दयावर देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवक जावक रजिस्टरच्या छायांकीत प्रती एवढीच माहिती देय होत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा अपेक्षित करणा-या स्वरुपात मागितली असल्याने, उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे या प्रकरणी सार्वजनिक निधीचा अपहार मूळात झाला नसल्याने कथित अपहाराबाबत जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ११ च्या संदर्भात कोणतीही माहिती देय होत नाही असे दिसून येते.

अपिलार्थीच्या अर्जातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती याचे वरील प्रमाणे केलेले पृथःकरण पाहता, आता अपिलार्थीस जी काही उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे ती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने ही विनंती आयोगास करतांना, जन माहिती

अधिकारी यांनी विहित मुदतीत संपूर्ण माहिती पुरविली नसल्याचे सिध्द झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० (१) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, अधिनियमातील कलम २० (१) चा वापर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे हेतुतः नाकारले असेल तेव्हा अथवा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती त्यांनी दृष्ट हेतुने लपविल्याचे सिध्द झाले असेल तर सर्वसाधारणपणे करण्यात येतो. या प्रकरणी मूळात अपिलार्थीची माहिती मागण्याची पार्श्वभूमी त्रयस्थ पक्षाने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहे, तो युक्तीवाद पाहता व तसेच या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतूने माहिती देणे टाळल्याचे अथवा दृष्ट हेतूने ती लपविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गिरीष शिवानंद पुणे, " शिवकृपा " दुध एजन्सीज, कोर्ट रोड, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०१

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, : अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी परिपूर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केली, दिलेली माहिती अर्धवट असून जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या कायद्याचे पालन न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नळदुर्ग नगरपरिषद हद्दीतील स्वामी समर्थ बँकेजवळून आलेला रोड व हायवे नं. नऊपर्यंतच्या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती - इत्यादी मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २९-०१-२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मोजमाप पुस्तिकांच्या प्रती पुरविल्या नाहीत, या प्रतींची त्यांना आजही आवश्यकता आहे. ते मनसेचे तालुका उपाध्यक्ष असून यासंदर्भात हे काम बोगस पध्दतीने झाले असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी मोजमाप पुस्तिकांच्या प्रती दिल्या नाहीत. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस अद्यापपावेतो मोजमाप पुस्तिकांच्या प्रती प्राप्त झाल्या नाहीत हा

त्यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या सर्व मोजमाप पुस्तिकांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थी यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही, अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ६०२/०८ व ६०३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०२ व ६०३

निर्णय दिनांक १६-०६-२००९

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, अपिलार्थी

मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

<u>अपील क्रमांक ६०२/०८</u>

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

<u>अपील क्रमांक ६०३/०८</u>

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रशासक व अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र

विकास प्राधिकरण, बीड

## निर्णय

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १६-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त दोनही अपिलांच्या सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दिनांक १६-०६-२००९ रोजीची दोन पत्रे सादर केली असून या पत्रांमध्ये अपिलार्थीने त्यांची आज रोजी विचाराधीन असलेली अपिले क्रमांक ६०२/०८ व ६०३/०८ ही ते स्वखुषीने मागे घेत असल्याने त्यांची दोनही विचाराधीन अपिले रद्द करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीच्या विनंतीवरुन अपिलार्थीची विचाराधीन अपिले क्रमांक ६०२/०८ व ६०३/०८ ही खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ६०२/२००८, दिनांक २९-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ६०३/२००८, दिनांक २९-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इटकळ, तालुका

तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक व अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०४
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. नंदकुमार भिमराज कुकलारे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. ज्ञानेश्वर कुकलारे, श्री. गणेश चंद्रभान मोरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती पुरविली व माहिती देता येणार नाही, असा या पत्रात उल्लेख केला, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन पूर्ण माहिती देता येईल, असा पत्रात/आदेशात उल्लेख न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी विचाराधीन अपील अर्जात कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्रयस्थ पक्ष "श्री. ज्ञानेश्वर कुकलारे व श्री. गणेश मोरे यांनी दि. २१.०९.२००६ रोजी दिलेल्या मौ.शिरेगाव ता.गंगापूर जि.औरंगाबाद येथील भूखंड मागणीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून काय कार्यवाही करण्यात आली, शिरेगाव येथील किती व कोणत्या क्रमांकाचे भूखंड वाटप करणे बाकी आहे व शिरेगाव येथील भूखंड मागणीच्या अर्जासंदर्भात टिपणी संबंधित लिपीकाने कोणत्या तारखेला जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यासमोर ठेवली व जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने कोणत्या तारखेला शेरा देऊन पुढे त्या अर्जाचे काय झाले", या मुद्यावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मौ. सिरेगाव येथील भूखंड वाटप आदेशाच्या माहितीपृष्ठयर्थ एकूण १७ पृष्ठांच्या माहितीकरिता प्रतिपृष्ठ रु.१०/- याप्रमाणे एकूण रु.१७०/- इतक्या रकमेचे चलन भरण्याचे सूचित केले व इतर मुद्यावरील माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अशी माहिती विचारण्याचा हक्क नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. ११.०२.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने शुल्क आकारुन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २२.०२.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे १७ पृष्ठांच्या माहितीकरिता एकूण ३४/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत केले व तसेच त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारल्याने प्रथम माहिती नाकारल्याचे आयोगासमोर कबूल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर अपिलार्थीस माहिती का दिली नाही, असे विचारले असता त्यांनी, अपिलार्थीस दि. २२.०२.२००८ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्राद्वारे रु.३४/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याच्या सूचना दिल्या होत्या, तथापि या सूचना देऊनही अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ३ मुद्यांवर माहिती मागविली आहे. यापैकी शिरेगाव येथील भूखंड मागणीचा अर्ज संबंधित लिपीकाने कोणत्या तारखेला जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यासमोर ठेवला व त्यांनी कोणत्या तारखेस त्यावर शेरा दिला व त्या अर्जाचे पुढे काय झाले, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही पूर्णतः मोघम स्वरुपाची आहे. शिरेगाव येथील भूखंड मागणीचा अर्ज कोणी केला होता, किती तारखेला केला होता, या माहितीच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील माहिती ही संदर्भहीन ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित दोनही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन

माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या श्री. ज्ञानेश्वर कुकलारे व श्री. गणेश मोरे यांच्या दि. २१.०९.२००६ रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सर्व प्राधिकरणाशी/व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखावरील टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देणे अधिनियमातील तरतुदीनुसार देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. अपिलार्थीने विचारलेल्या भूखंड वाटपासंदर्भातील माहितीबाबत असे अवगत करण्यात येते की, या मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मे २००६ ते नोव्हेंबर, २००७ या कालावधीमध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या भूखंडाची संख्या व वाटप केलेल्या भूखंडांची संख्या एवढी अपिलार्थीस कळवावी, म्हणजे अपिलार्थीस त्यांनी अर्ज केल्याच्या दिवशी किती भूखंड वाटप करणे बाकी होते, हे समजू शकेल किंवा अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध असेल तर त्यांनी ती अपिलार्थीस देण्यास हरकत नाही.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि.२२.११.२००७ रोजीच्या पत्रास जरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना दि. १८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरी या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.१०/- इतक्य शुल्काची मागणी केली. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना प्रतिपृष्ठ रु.२/- इतक्या शुल्काची आकारणी करणे त्यांना अनिवार्य असताना देखील त्यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.१०/- या अवाजवी दराने शुल्क आकारणी केली. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर आहे. तसेच या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी किती शुल्काचा, काय दराने एकूण भरणा, कोणत्या शीर्षाखाली व कोठे करावयाचा याचा तपशील, जो अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे, दिलेला नाही. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांचे दि. १८.१२.२००७ रोजीचे

पत्र अवैध ठरविण्यात येत असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशःउपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्याने अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या मुदतीत त्यांच्या दि. २२.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात याच कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत पूर्व नियोजितवेळी व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकुमार भिमराज कुकलारे,रा.साईकृपा फोटो स्टुडियो, पोलीस चौकीसमोर, मु.पो.लासूर स्टेशन,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०५
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. व्ही. के. बबिरवाल, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : समाज कल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
त्रयस्थ पक्षः श्रीमती शैला लंगोटे, श्री. दुर्गादास तोनगिरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती शैला लंगोटे व श्री. दुर्गादास तोनगिरे यांच्या आंतरजातीय विवाहाप्रित्यर्थ जिल्हा परिषदेने केलेल्या त्यांच्या सत्कार प्रसंगी अपिलार्थीने सादर केलेल्या दस्तऐवजाच्या,शपथपत्राच्या,विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती इत्यादींच्या नकलांची मागणी

केली होती.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १७ वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे व तसेच आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सत्काराचे दस्तऐवज, रेकॉर्डच्या वर्गीकरणानुसार जतन करुन ठेवण्याचा कालावधी फक्त पाच वर्षांचा असल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देणे शक्य नसल्याचे कळवून त्यांचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ०४.०२.२००८ रोजी परत समाजकल्याण विभागाकडेच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्ज प्रथम अपिलीय प्राधिकरणाकडे न पाठविता तो त्यांच्या कार्यालयात तसाच ठेवून दिला व अपिलार्थीस दि. ०३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यास असमर्थता दर्शविली. समाज कल्याण विभागाच्या या पत्राने व्यथित  होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला आहे की, त्रयस्थ पक्ष श्रीमती शैला लंगोटे व श्री. दुर्गादास तोनगिरे यांनी आंतरजातीय विवाह केल्याचे दाखवून स्वतःचा सत्कार व आर्थिक मदत औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून करुन घेतली व खोटी कागदपत्रे दाखल करुन त्यांनी शासनाची फसवणूक केल्याने या प्रकरणी ते न्यायालयामध्ये दाद मागणार आहेत व भविष्यात शासनाची अशाप्रकारे होणारी फसवणूक  टाळण्याच्या दृष्टीने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात भरपूर शोध घेऊनही यासंदर्भातील संचिका आढळून आली नाही. अपिलार्थीने ज्या विषयाची माहिती त्यांच्याकडे मागविली आहे, त्या विषयाशी संबंधित संचिका जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा पाच वर्षांचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १८ वर्षांपूर्वीची आहे. ती माहिती ही संचिका त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखांचे निंदणीकरण करताना नष्ट झाली असल्याची शक्यता देखील त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली. अपिलार्थीच्या दि. ०४.०२.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे न पाठविण्याचे कारण त्यांना विचारले असता, त्यांच्या कार्यालयाने अशाप्रकारची कृती केली नाही, असे बेजबाबदारपणाचे उत्तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दिले.

त्रयस्थ पक्षाने या प्रकरणी आपला युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीच्या बहिणीने त्रयस्थ पक्षाविरुध्द भारतीय दंड विधानाचे तरतुदीसार अंबड न्यायालयात फौजदारी प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरण खारीज झाल्यानंतर याबद्दलचे अपीलही मा. उच्च न्यायालयाने खारीज केले आहे. अपिलार्थीच्या बहिणीशी विवाह करण्यास श्री. दुर्गादास तोनगिरे यांनी नकार दिल्यामुळे अपिलार्थी व त्यांची बहिण सन १९८७ पासून वेगवेगळया ठिकाणी त्यांच्याविरुध्द तक्रारी व अर्ज करीत असतात व त्यांना त्रास देत असतात.अपिलार्थीस त्यांची वैयक्तिक माहिती मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही आणि त्यांनी मागणी केलेली माहिती वीस वर्षांपूर्वीची असल्याने अपिलार्थीचे आयोगासमोर असलेले विचाराधीन अपील फेटाळण्यात यावे, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे १८ वर्षांपूर्वीची माहिती मागितली आहे. ही माहिती

ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, ते अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी पाच वर्षांचा असल्याने ते अभिलेखे नष्ट केले गेले असण्याची शक्यता जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर विचारली आहे. जर हे अभिलेखे नष्ट केले गेले असतील तर यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी तसा पुरावा अपिलार्थीस द्यावा, म्हणजे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे नष्ट झाले असल्याची अपिलार्थीची खात्री होईल, अन्यथा जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी युक्तिवादामध्ये कबूल केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत त्यांच्या अभिलेख कक्षामध्ये कसून शोध घ्यावा. जर यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही, तर या प्रकरणी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्यास जबाबदार असलेल्या त्यांच्या संबंधित कार्यालयीन कर्मचाऱ्यावर/अधिकाऱ्यावर त्यांनी प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व तसे अपिलार्थीस कळविण्यात यावे. या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीने दि. १५.०६.२००७ रोजी माहितीची मागणी केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता दि. १६.०७.२००७ रोजी तयार करुन ठेवली तथापि कार्यालयातील संबंधित लिपीकाने हे पत्र दि. २३.०७.२००७ रोजी जावक नोंदवहीत नोंद करुन या पत्रांचा बटवडा केला. यावरुन माहिती अधिकार अधिनियमातील विहित कालावधीचे महत्त्व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांना नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीशी अर्जदारास माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या सर्व संबंधित कर्मचारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. ही तरतुद पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

त्रयस्थ पक्षाचा युक्तिवाद लक्षात घेता असे आढळून येत आहे की, त्रयस्थ पक्षास केवळ त्रास देण्याकरिता अपिलार्थी हे अशाप्रकारच्या माहितीची मागणी करीत असतात, असे त्रयस्थ पक्षाने आपल्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शासकीय व्यक्तींशी संलग्नीय असल्याने तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, उदा."विवाह नोंदणी प्रमाणपत्र" याची नोंदणी देखील सार्वजनिक स्वरुपाची असल्याने त्रयस्थ पक्षाची ही माहिती उघड करण्यास कोणताही प्रत्यवाय, विशेषतः या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता, असू शकत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करुन,त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. व्ही. के. बबिरवाल,चुनिलाल पटेलवाडा,ब्राम्हण गल्ली,बेगमपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी (गट-अ),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०६
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. पी.सी.पाटील, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद,
उच्च माध्यमिक कन्या शाळा,उस्मानाबाद

२. जन मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद,
उच्च माध्यमिक कन्या शाळा,उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी दि. ३०.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी देखील या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११/१२.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना देय असलेले ग्रंथालय मानधन, सन १९९९ मध्ये त्यांच्या बदलीनंतर अंतिम वेतन प्रमाणपत्र व माहे सप्टेंबर, २००५ च्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या पूरग्रस्त

निधीसंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. सदर माहिती सन १९९९ ते २००६ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थींच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने परत जन माहिती अधिकारी यांच्याकडेच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज मुख्याध्यापक यांना दि. ३०.०१.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ त्यांनी प्रथम अपील अर्जावर दिलेल्या पोचहीची प्रत अपिलार्थीने आयोगाकडे सादर केली आहे. मुख्याध्यापक यांनी या प्रकरणी अपिलार्थींचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर कोणताही निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.१२.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व यासंदर्भातील प्रथम अपील अर्ज मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, उच्च माध्यमिक कन्या शाळा, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे केला होता. तथापि शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः संकीर्ण/ केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व आज रोजी सुनावणीसाठी असलेल्या सर्व संबंधितांची अनुपस्थिती पाहता, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थींच्या दि. १२.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.१२.२००७ (दि.३०.१.२००८ रोजी प्राप्त) रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पी.सी.पाटील,'सारस',कल्पेश किराणा स्टोअर्स मार्ग, समतानगर, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, उच्च माध्यमिक कन्या शाळा,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना अपिलार्थीच्या दि.११.१२.२००७ व १२.१२.२००७ (दि.३०.१.२००८ रोजी प्राप्त) रोजीच्या मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्जाच्या छायाप्रतीसह, या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०७
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. शेख बाबामियॉ रसुलभाई, : अपिलार्थी
रा.भूम, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,परंडा
जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात चुकीच्या निर्णय दिल्याने केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दि. १७.१२.२००७ रोजीच्या तहसीलदार परंडा यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिलेल्या अर्जाचा संदर्भ देऊन त्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीचा दि.३०.०१.२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी म्हणजे दि. ३०.०१.२००८ रोजी प्राप्त झाला असून यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाची पोचसही अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीवर आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि.०१.०३.२००८ रोजी पारीत केले असून या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आहे. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या पुराव्यापैकी पुरावा असल्यास त्याची प्रत पुरवावी, असे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना वाढीव सेवानिवृत्ती वेतन मिळण्यासाठी त्यांच्या कार्यालयालयातील दि.२४.१२.१९७३ ते ०१.०१.१९७४ हा सेवेतील खंड नियमित सेवा म्हणून धरण्याचे जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी आदेश देऊनही त्यांच्या सेवापुस्तिकेत अशाप्रकारची नोंद तहसीलदार,परांडा यांनी घेतली नाही. त्यांच्या सेवेमध्ये हा खंड अद्यापही असल्याने त्यांना कमी दराने सेवानिवृत्तीवेतन प्राप्त होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात रुजू झाल्याचा रुजू रिपोर्ट, कार्यमुक्त केल्याचे आदेश उपलब्ध न करुन दिल्याबद्दल त्यांना अपिलार्थीच्या सलग सेवेबाबत निर्णय घेता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन

अपिलाशी संबंधित मूळ अर्जान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाची प्रत मागितली आहे. अपिलार्थीच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाच्या प्रतीचे अवलोकन करता अपिलार्थीने तहसीलदार,परांडा यांच्याकडे त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंदी घेण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या व कमी केल्याच्या आदेशाच्या तहसीलदार,परांडा यांच्याकडे मागितल्या होत्या.तथापि यासंदर्भात त्यांनी कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. विचाराधीन प्रकरणामध्ये देखील अपिलार्थीच्या दि.३०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. वास्तविक पाहता, कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे व त्यांना कायम केल्याचे आदेश यांच्या नोंदी संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तिकेत वेळच्या वेळी होणे आवश्यक आहेत. या प्रकरणी अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेमध्ये ही नोंद तहसीलदार,परांडा यांनी घेतलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीस कमी सेवानिवृत्तीवेतन प्राप्त होत आहे. कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक अशाप्रकारच्या बाबींची नोंद सेवापुस्तिकेत अद्ययावत ठेवणे हे तहसीलदार परांडा यांचे प्रथम कर्तव्य आहे. तथापि हे कर्तव्य तहसीलदार,परांडा यांनी यथायोग्यरित्या पार पाडल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडेच असणे अभिप्रेत असल्याने अपिलार्थीस त्यांच्या सेवापुस्तिकेतील नोंदीसंदर्भात मागणी केलेली माहिती तहसीलदार,परांडा यांनी तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे व या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख बाबामियॉ रसुलभाई,सेवानिवृत्त अव्वल कारकुन, शिवाजीनगर,पेठ,भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,परंडा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,भूम,जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०८
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. उध्दव रंगनाथ रासकर, : अपिलार्थी
रा.कोळगांव,ता.गेवराई,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
माध्यमिक विभाग,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शिक्षण उपनिरीक्षक,,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०८.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असता, सुनावणीमध्ये संबंधित शाळेची मान्यता काढण्यात येईल, असे जन अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास कळविले होते. अद्यापपावेतो जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीची दिशाभूल करणारे उत्तर प्राप्त झाले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी

यांच्याकडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांनी जा.क्र.६७२९/२००७, दि. ०४.०९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे नुतन कोळेश्वर विद्या मंदिर,कोळगाव,ता.गेवराई जि.बीड या शाळेच्या गैरकारभाराबाबतची चौकशी करण्याबाबत अपिलार्थीने दिलेल्या अर्जासंदर्भात वेगवेगळया प्रश्नार्थक मुद्यावर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस नुतन कोळेश्वर विद्या मंदिर,कोळगाव,ता.गेवराई जि.बीड या शाळेच्या चौकशीबाबतची सद्यस्थिती अपिलार्थीस अवगत केली. तथापि या पत्राने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.१२.२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये अपिलार्थीने तक्रार केलेल्या शाळेची मान्यता काढण्याच्या संदर्भात माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत असल्याचे शिक्षण उपसंचालक यांनी अपिलार्थीच्या निदर्शनास आणले. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या इतिवृत्ताची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निश्चित स्वरुपाचा निर्णय पारित केल्याचे आयोगास आढळून आले नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित शाळेची मान्यता काढून न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयाने कार्यवाही केली असून नुतन कोळेश्वर विद्या मंदिर,कोळगाव,ता.गेवराई

जि.बीड या अनुदानित शाळेची मान्यता शैक्षणिक वर्ष २००८-०९ (दि.३०.०४.२००९ अखेरपासून) काढून घेण्यात आली आहे. तसेच यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी माहिती पुरविली असून तसेच या प्रकरणी प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वयंस्पष्ट कारणे, खुलासे अशाप्रकारची माहिती अपेक्षित केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबाबत अथवा घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत अर्जदारास त्यांची कारणे, यासंदर्भातील त्यांची स्पष्टीकरणे देणे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात ती अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नाही, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांनी दि.३०.०४.२००९ रोजी निर्णय घेतला आहे. आणि अपिलार्थीच्या दि.१५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद योग्य असल्याचे आयोगास

आढळून येत आहे. या सर्व बाबी एकत्रित विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उध्दव रंगनाथ रासकर,मु.पो.कोळगाव,ता.गेवराई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६०९
निर्णय दिनांक १७-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विनोद मगनराव अहिरे,<br>रा.कन्नड,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>जिल्हा सेतू सुविधा केंद्र,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.११.२००६ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०८.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या माहे जुलै,२००६ रोजीच्या अर्जाची प्रत, अपिलार्थीस दिलेले पेमेंटच्या अक्वॉन्टस रोलची प्रत,सेतू सुविधा केंद्राच्या उपविधीची प्रत व नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने दि. ०१.०४.२००३ ते ३०.०६.२००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दोन मुद्यांवरील माहिती दिली व उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती देण्याकरिता आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३५/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात करुन माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता दि. ३०.०९.२००६ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाला होता. या अपील अर्जावर तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी, "माहिती द्यावी" असे पृष्ठांकन करुन पुढे यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास इष्ट वाटते. सबब अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अथवा या प्रकरणी नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.३०.०९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला आदेश पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.०९.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १७-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विनोद मगनराव अहिरे,रा.प्रगती कॉलनी,हिवरखेडा रोड,कन्नड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१०
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे, : अपिलार्थी
रा.पारगांव (घु.),ता.पाटोदा,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे सिंचन उपविभाग,पाटोदा,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करुन चलन भरुन घेण्यास टाळाटाळ केली, त्यांची दि. ०५.०९.२००७ रोजीची मनीऑर्डर न स्वीकारुन माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपिलावरील सुनावणीचे पत्र नोटीस सुनावणीनंतर दिल्यामुळे व अपिलार्थीने दि. १३.११.२००७ रोजी ते सुनावणीस हजर राहिले असता, निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.या अपील अर्जावर अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२/२५.०६.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे पारगाव (घु.) येथील मांजरा नदीवर वांजरा गावालगत असलेल्या के.टी.बंधाऱ्याच्या दुरुस्ती संदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे सन २००३ ते २००७ या संबंधी काही माहिती पोस्टाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०९.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.११.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यासंदर्भात त्यांनी कोणता निर्णय दिला, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१२.२००७ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावतीने उपअभियंता यांच्या कार्यालयातील श्री. ज्ञानेश्वर शंकरराव मुकाडे, वरिष्ठ सहायक आयोगासमोर सुनावणीसाठी हजर आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीने ज्या कामाविषयी माहिती मागितली आहे, ते कामच झाले नसल्याने त्यांनी अपिलार्थीने पाठविलेली मनीऑर्डर सोडवून घेतलेली नाही. या उपर त्यांना आयोगाच्या कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १३.१२.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २५.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये विचारलेली माहिती दि. १३.१२.२००७ रोजी पुरविली आहे. हे पाहता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे निश्चितपणे जबाबदार ठरत आहेत. सबब सचिव, जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. मकबुल हुसेन उपअभियंता, ल.पा. उपविभाग,पाटोदा,जि.बीड यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०१२.२००७ रोजी माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. सचिव, जलसंपदा यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. मकबुल हुसेन यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे,रा.पारगांव (घु.),ता.पाटोदा,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे सिंचन उपविभाग,पाटोदा,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६११
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. दिलीप मरीबा ढवळे पाथरीकर, रा.भिमनगर,ता.पाथरी, जि.परभणी : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मानवत, जि.परभणी : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, मानवत,जि.परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, मानवत, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,मानवत, जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००६-२००७ व २००७-२००८ मध्ये रो.ह.योजनेची किती रकमेची, जलसंधारण व मृदसंधारणाची एकूण किती कामे घेण्यात आली, ही कामे किती शेतकऱ्यांच्या शेतात घेण्यात आली त्यांचे सर्व्हेनंबर व हेक्टरवाईज आणि प्रत्येक कामावरील

मजूरांची नावासहीत यादी, - ही माहिती मागितली होती अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला असता, त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. अथवा यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी केला नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, कृषि विभागातर्फे ज्या शेतकऱ्यांच्या शेतात काम केले गेले आहे, असे दाखविण्यात आले आहे ते काम प्रत्यक्षात झालेले नाही. त्यांनी माहिती मागितली असता, कृषि विभागाच्या माहितीची आवश्यकता त्यांना कशाकरिता आहे,अशाप्रकारचे प्रश्न त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विचारण्यात आले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जितका खर्च केला आहे, त्याचे २५ टक्के देखील काम झालेले नाही. कृषि खात्याच्या भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी आज तयार केली असून ही माहिती अपिलार्थीस ते त्वरित व विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याचे कारण

विचारले असता,त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांचे कार्यालय सन २००४ पासून सुरु करण्यात आले असून त्यांच्या कार्यालयामध्ये काम करण्यासाठी फक्त ५० टक्के इतकाच कर्मचारीवृंद उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही स्वरुपात सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी त्यांच्यासोबत तयार करुन आणल्याचे आयोगास अवगत केले. तथापि त्यांनी कथित तयार केलेल्या माहितीचे अवलोकन करता या माहितीमध्ये अपिलार्थीने किती शेतकऱ्यांच्या शेतात काम केले, याची संख्या दिलेली नाही तसेच या माहितीमध्ये, अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे प्रत्येक कामावरील मजूरांच्या नावासहीत यादीचा समावेश नाही, याचाच अर्थ अपिलार्थीने दि.१७.०८.२००७ रोजी माहितीची मागणी करुनही आज दि. १७.०६.२००९ पर्यंत म्हणजेच दोन वर्षे दहा महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती देता येत नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कार्यपध्दती व या प्रकरणातील त्यांचे वर्तनाचे कोणत्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नाही. मात्र त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे, हे निश्चित. सबब उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. कछवे बी.एस. कृषि विकास अधिकारी सध्या हिंगोली येथे कार्यरत) व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे संबंधित सहायक यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस

माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून, ही माहिती वरील कालावधीमध्ये हस्तगत करुन घेणे त्यांना अनिवार्य असेल. ही माहिती त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस अनुज्ञेय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३०.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जर वेळीच सुनावणी घेतली असती तर, कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याचे प्रयोजन उरले नसते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अशाप्रकारे कोणताही निर्णय न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. कृषि (आयुक्त) यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.
३. जन माहिती अधिकारी (श्री. कछवे बी.एस. कृषि विकास अधिकारी सध्या हिंगोली येथे कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप मरीबा ढवळे,पाथरीकर, मु.पो.भीमनगर, ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,मानवत,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर, पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१२
निर्णय दिनांक १७-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. ओमप्रकाश मालपाणी,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद,लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दि.०९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे हस्तांतरित केले. तथापि यावरही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.लातूर यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अंतिमतः आयोगास अशी विनंती केली आहे की,त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्यात यावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केशवराज विद्यालय,लातूर व लालबहादूर विद्यालय,उदगीर येथील प्रभारी मुख्याध्यापकांच्या कार्यभारासंदर्भात सन २००४-०५ ते दि. ०५.११.२००७ पर्यंच्या कालावधीतील काही माहिती दोन मुद्यांद्वारे व अनेक उपमुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने हा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.लातूर यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून तो शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयास दि. ०७.११.२००७ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दि.३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीचा दि. ३१.१२.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दि. ०९.०१.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे हस्तांतरित केला. तथापि यावरही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केशवराज विद्यालय,लातूर व

लालबहादूर शास्त्री विद्यालय,उदगीर या विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार प्रभारी मुख्याध्यापक यांच्याकडे सोपविला आहे, त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. या माहितीमधील अपिलार्थीने, मुख्याध्यापक किती दिवसांपासून प्रभारी म्हणून कार्यरत आहेत,त्यांना किती वेळा मुदतवाढ दिली,कोणत्या नियमानुसार दिली, या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे, मात्र याच संदर्भात अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित माहिती, - "एखाद्या व्यक्तीस प्रभारी मुख्याध्यापक म्हणून किती कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येते?, त्याच व्यक्तीस पुन्हा मुदतवाढ देता येऊ शकते काय?, प्रभारी मुख्याध्यापक पदाच्या नियुक्तीस मान्यता देताना रोस्टर आणि आरक्षणाचा विचार केला जातो काय? व  या दोन विद्यालयाच्या प्रभारी मुख्यापकांना मान्यता देताना रोस्टर व आरक्षण पाहिले आहे काय?" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. जी अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अनुज्ञेय नाही. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ मधील संपूर्ण व मुद्दा क्र. २ मधील अंशतः,- संबंधित मुख्याध्यापक यांची नियुक्ती किती कालावधीसाठी देण्यात येते, ही माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद तर दिला नाहीच परंतु अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित करण्याची तसदी घेतली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या

मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची संधी देण्याच्यादृष्टीने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल व अपिलार्थीस देय माहिती न पुरविल्याबद्दल यांच्यावर रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी

हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १७-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी,पूर्णवादी बँकेच्या पाठीमागे,माजलगाव,ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,लातूर,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१३
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी, : अपिलार्थी
ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सहायक धर्मादाय न्यास नोंदणी कार्यालय,बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त,बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
सहायक धर्मादाय न्यास नोंदणी
कार्यालय,बीड

त्रयस्थ पक्षः सचिव,
भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ,अंबाजोगाई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १०.१०.२००७ रोजी जन माहिती/अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती मागविण्यासाठी अर्ज सादर केला व तो त्यांनी दि. १५.१०.२००७ रोजी मिळाला. तथापि या कायद्यातील तरतुदीप्रमाणे,जन माहिती अधिकाऱ्यांनी वर्तणूक केली नाही व नियम पाळले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर दि. १०.०१.२००८ रोजी नोटीस पाठवून सुनावणी ठेवली होती. तथापि त्यादिवशी जन अपिलीय अधिकारी रजेवर आहेत. आणि पुढील तारखा मिळण्याकरिता अर्ज दिला परंतु दि. २४.०३.२००८ पर्यंत तारीख न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अंतिमतः त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्याची व त्यांनी आपल्या कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याबद्दल त्यांच्यावर कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांच्यासोबत आणली आहे व ती अपिलार्थीस देण्यास ते तयार असल्याचे सांगितले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस एक महिन्याचे आत संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई या संस्थेबाबत एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली. या पैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दोन मुद्यांवरील माहिती उपलब्ध होत आहे. उर्वरित ८ मुद्यांच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ते ही माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. मात्र ही माहिती त्यांना संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेता येणे शक्य आहे व त्याप्रमाणे ते अपिलार्थीस ही माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो न दिली गेलेली व अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे त्यांनी हेतूपुरस्सर टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी,पूर्णवादी बँकेच्या पाठीमागे,माजलगाव,ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,सहायक धर्मादाय न्यास नोंदणी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय न्यास नोंदणी कार्यालय,बीडयांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१४
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी, : अपिलार्थी
ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ३०.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा माहितीसाठीचा अर्ज सादर केला होता, तो जन माहिती अधिकारी यांना दि.०६.११.२००७ रोजी प्राप्त झाला. तथापि त्यांनी कायद्यातील तरतुदीप्रमाणे वर्तन केले नाही व नियम पाळले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने दि. १३.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०२.२००८ रोजी सुनावणी घेतली या कारणास्तव माहिती अधिकारी दोषी असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई होणे आवश्यक आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी तसेच जन अपिलीय अधिकारी

यांना निर्णयाची प्रत देऊनही त्यांनी निर्णयाची दखल घेतली नाही, ही बाब गंभीर असल्याचे अभिप्रायही त्यांनी या अर्जामध्ये दिले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०३.२००७ ते दि.३०.१०.२००७ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे माजलगाव उपविभागात "ब" वर्गातील कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी वेळ लागत असल्याची तोंडी कल्पना अपिलार्थीस दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि.१८.०३.२००८ रोजी माहिती देवू केली असता, ती न

स्विकारल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती दि. २५.०३.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टामार्फत देऊ केली तथापि या माहितीचा अपिलार्थीने स्वीकार न केल्यामुळे दि. ०१.०४.२००८ रोजी संबंधित पोस्टमनने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने न स्वीकारलेले माहितीचे पाकीट परत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी दोन बाबी स्पष्ट होत आहे, त्यापैकी पहिली बाब म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देणे हा होय व दुसरा म्हणजे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०३.२००८ रोजी काही माहिती पाठविली आहे, तिचा स्वीकार करण्याऐवजी अपिलार्थीने याच दिवशी आयोगाकडे वरील द्वितीय अपील सादर केले आहे. आज जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे पाठविलेले पाकीट अपिलार्थी यांनी दि.०१.०४.२००८ रोजी परत पाठविले आहे. याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस राज्य माहिती आयोगास द्वितीय अपील करण्याच्या दिवशी माहिती प्राप्त झाली होती. तथापि अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार न करता ते पाकीट परत पाठविले. या प्रकरणातील अपिलार्थीच्या एकूण वर्तनावरुन अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचा उद्देश नसावा, असे अनुमान काढण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती त्यांच्या मूळ अर्जामधील मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल

त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश मालपाणी,पूर्णवादी बँकेच्या पाठीमागे,माजलगाव,ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२३
निर्णय दिनांक १७-०६-२००९

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. बाबासाहेब आर मलबा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०४.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. २२.०९.२००६ रोजी तुळजापूर शहरातील श्री गॅस एजन्सीच्या मालकाचे नातेवाईक श्री. बाबासाहेब आर.मलबा यांनी अपिलार्थीस धक्काबुक्की व शिवीगाळ केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई झाली या बाबतची माहिती नोंदणीकृत

टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या दि.०८.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.११.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी टपाल खर्च रु.२५/- अधिक माहितीचा खर्च रु.१२/- असे एकूण रु. ३७/ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या नंतर अपिलार्थीने सदरचे शुल्काच्या रकमेची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनिऑर्डर पाठविली व शुल्क प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०२.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना भरणा केलेल्या रकमेपैकी आवश्यक ती छाननी करुन देय रक्कम स्वीकारावी व संबंधित गॅस एजन्सीधारकास ग्राहकास सौदार्हपूर्ण वागण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे पालन न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे अभिप्राय त्यांनी लेखी निवेदनामध्ये दिले असून जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार यांना दिलेल्या पत्राच्या छायाप्रती दिल्याचे या पत्रामध्ये नमूद केले आहे. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, त्यांना फक्त तीन पृष्ठांची माहिती प्राप्त झाली, मात्र याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून रु.१२/- इतके शुल्क आकारले आहे. त्यांना जास्त शुल्क आकारण्यासंदर्भात ते २-३ वेळा जन माहिती अधिकारी यांना भेटावयास गेले असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना टोलवाटोलवीची उत्तरे दिली.त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी ते स्वतः हजर

नव्हते. त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी योग्य ती कारवाई करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देणे अपेक्षित होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना रु.२५,०००/-इतका दंड आकारण्यात यावा व सेवेतील हलगर्जीपणामुळे त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी त्यांनी  आयोगास विनंती केली आहे. या विनंतीबरोबरच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर एकूण ३,३००/- इतकी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. या बाबीचा तपशील देताना अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम व द्वितीय अपीलाचा खर्च रु.५००/-, सुनावणीस हजर राहण्याचा खर्च रु.८००/- व मानसिक व शारीरिक त्रासाबद्दल रु.२०००/- अशी एकूण ३,३००/- नुकसान भरपाईची रक्कम देय होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १२.१२.२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्यांच्या दि. २२.०९.२००६ रोजीच्या तक्रार अर्जावर पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तुळजापूर यांनी नियमानुसार आवश्यक ती कारवाई केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येत आहे की अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना गॅस एजन्सीच्या मालकाच्या नातेवाईकाकडून झालेल्या धक्काबुक्की प्रकरणात त्यांनी जन माहिती अधिकारी  यांच्याकडे दि. २२.०९.२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर पुढील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशाप्रकारची माहिती,  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देताना त्यांनी अर्जदाराचा प्रथम तक्रार अर्ज व तदनंतर त्यांनी संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्यांच्याकडील यासंदर्भात नोंदविलेल्या टिपणीच्या प्रती अर्जदारास त्यांनी देणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून आले नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस दि. २२.०९.२००६ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने सर्व संबंधित प्राधिकरणाशी दि. ०८.११.२००६ पर्यंतच्या केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती व या कालावधीमध्ये या प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून रु.६/- इतके जास्तीचे शुल्क घेतले असल्याचे नमूद केले आहे. ही बाब वस्तुस्थितीशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून स्वीकारलेले जास्तीचे शुल्क रु.६/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे लागतील.तथापि या मुद्यावर असेही स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने पाठविले होते. आज रोजी सुनावणीमध्ये यासंदर्भातील कोणताही तपशील अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे आयोगास दाखवू शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जास्तीच्या शुल्काची रक्कम रु.६/- परत करताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची कथित मनीऑर्डर त्यांना खरोखरीच प्राप्त झाली आहे किंवा कसे, याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व सदर मनीऑर्डर त्यांच्या कार्यालयाने स्विकृत केली असल्यास त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क परत करावे.उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळीच व योग्य माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती, अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने लपविल्याचे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून रु.३,३००/- इतक्या नुकसान भरपाई मंजूर करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची सदर विनंती आवश्यक त्या तपशीलाअभावी आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

२) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलार्थीकडून या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटी मनीऑर्डरद्वारे पाठविलेली शुल्काची रक्कम प्राप्त झाल्याची त्यांच्या अभिलेख्यावरुन खात्री करुन तद्नंतर वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे स्वीकारलेले जादा शुल्क रु.६/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचा आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, जि.उस्मानाबाद-४१३ ६०१

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१५

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे, : अपिलार्थी
लाईन गल्ली, कारंजा रोड,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड,
तालुका जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : १. स्वस्त धान्य दुकान क्रमांक ०३
२. स्वस्त धान्य दुकान क्रमांक ३४

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००७ रोजी प्रथम अर्ज दिला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत माहिती दिली नाही व त्यांनी प्रथम अपील दाखल करेपर्यंत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाचा निर्णय न दिल्याने आता अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य मिळावी. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ३ व ३४ च्या संदर्भात एकूण आठ मुद्दयावर दिनांक ०१-०५-२००७ ते ११-०९-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे अथवा अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तहसीलदार, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर आवश्यक वाटते.

सबब, तहसीलदार, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,

हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तहसीलदार, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद  
दिनांक १८-०६-२००९

( वि. बा. बोरगे )  
राज्य माहिती आयुक्त  
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे, लाईन गल्ली, कारंजा रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१६

निर्णय दिनांक १८-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. म. ईकबाल म. ईस्माईल,<br>कन्या शाळेच्या पाठीमागे, नुरानी मशिदी जवळ,<br>हिमायतनगर, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. डी. एम. जैन |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगांव यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती विचारली असता त्यांनी अपिलार्थीने विचारलेली माहिती देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनीही अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही. याकरिता त्यांनी वेळोवेळी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगांव यांना त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी अपील निकाली काढण्याचे आश्वासन दिले परंतु कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना उचित दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माजलगाव येथील रॉकेल वाटपाबाबत परवानाधारक श्री. डी. एम. जैन, परवाना क्रमांक १६/९५, वार्ड क्रमांक ८ यांना प्रत्येक महिन्यात रॉकेल वाटपाचा किती कोटा दिला जातो, त्याचे वाटप करण्याचे शासनमान्य प्रति लिटर दर, मार्च, एप्रिल व मे २००७ मध्ये त्यांना एकूण किती कोटा मिळाला व त्या काळात त्यांनी त्यांच्या वार्डमध्ये किती वाटप केले, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी तहसीलदार, माजलगांव यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली असल्याने जिल्हाधिकारी, बीड यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील जोडपत्रासह तहसीलदार,

माजलगांव यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या परवानगीशिवाय सुनावणीसाठी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती मागितली होती. तथापि त्यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी अपील केल्यानंतर त्यांनी सदर अपील अर्ज तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासह दिनांक ०४-१०-२००७ रोजी पाठविला. यानंतर या अपील अर्जाची सुनावणी घेण्यासाठी श्रीमती मंजुशा मुथा यांना ते भेटले असता त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यास टाळाटाळ केली व अखेरकार त्यांना राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर करावे लागले. आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून लवकरात लवकर विनामूल्य प्राप्त व्हावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाकडे केलेल्या दुर्लक्षामुळे त्यांच्यावर कार्यवाही करावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०६-

२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांचे जोडपत्र 'अ' व 'ब' ची प्रत जोडली आहे. या प्रतीवरुन अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे हे आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांच्या पत्राची प्रत त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या जोडपत्रासह आयोगास सादर केली असून यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासोबत प्राप्त झाला आहे. त्यामुळे या प्रकरणी जरी संबंधित जन माहिती अधिका-याला प्रथम अर्ज दिनांक ०४-१०-२००७ रोजी प्राप्त
झाला असला तरी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती यासंदर्भात प्राप्त झालेली नाही हे सत्य उरत आहे, याकडे आयोगास दुर्लक्ष करता येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षासंदर्भात असली तरी त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक आहे, हे पाहता, ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचे अभिप्राय मागविण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगांव यांनी

देखील अपिलार्थीच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, जे अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयाकडून दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. सबब संबंधित तहसीलदार, माजलगांव यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा व बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या सचिव (महसूल) यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. म. ईकबाल म. ईस्माईल, कन्या शाळेच्या पाठीमागे, नुरानी मशिदी जवळ, हिमायतनगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१७

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. रमेशचंद्र एस. रामावत, : अपिलार्थी
जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर, अंबाजोगाई, तालुका
अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये रिलायन्स पेट्रोलपंप अंबाजोगाई यांच्या बिलांच्या अस्पष्ट प्रती दिल्या आहेत. गाडी दुरुस्ती, सीट कव्हर, सर्व्हिसिंगच्या बिलाच्या प्रती दिल्या आहेत व २,८२,९७७ रुपयाचे डिझेल ऑईल घेतलेले बील दिसत नाही, त्यांना प्राप्त झालेली माहिती ही जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर प्राप्त झाली असून त्यामध्ये २,८२,९७७ रुपयाचा हिशोब जुळत नाही, तसेच नगरपरिषदकडील गाडी क्रमांक १००१ (ॲम्बेसेडर) वापराबाबत अपूर्ण,

दिशाभूल करणारी व खोटी माहिती पुरवल्याबद्दल संबंधितांची चौकशी आदेशित करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तसेच व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी औरंगाबाद उपस्थितीबद्दल शासनाचा वेळ, कर्मचारी, वाहन वापर केल्यामुळे सर्व संबंधीतांना प्रत्येकी १००० रुपये दंड आकारण्याकरिता शिफारस करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंबाजोगाई नगर परिषदेकडील कार्यालयीन वापर करण्याकरिता ॲम्बेसेडर गाडी क्रमांक १००१ आल्याच्या दिनांकापासून ते दिनांक ३०-०९-२००६ पर्यंतच्या कालावधीतील दरवर्षी, दरमहा किती इंधन वापरले याची माहिती, सदर वाहनासाठी इंधन खरेदी केलेल्या एजन्सीचे नांव, इंधनावर किती रक्कम अदा केली याची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या सुनावणीनंतर प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परिपूर्ण माहिती मिळाली नसून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यांना प्राप्त झालेल्या पत्रामध्ये इंधनाची जुलै २००८ ची बिले दिली असून त्यामध्ये

इंधनाचे प्रत्यक्ष प्रमाण दिले नाही. त्यांना प्राप्त झालेल्या बिलावरुन या गाडीवर अंदाजे ३ ते ३.५० लक्ष खर्च झाला असतांना देखील त्यांना २,८२,९९७ रुपये इतका खर्च झाल्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-११-२००६ च्या पत्राव्दारे दिलेली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून दिशाभूल करणारी दिली असल्याने त्यांच्यावर कडक पध्दतीची कारवाई करण्यात यावी व संबंधित ॲम्बेसेडर गाडी वापरणा-यावर कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १०-११-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये काही माहिती दिली असून काही माहिती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या निर्णयानंतर अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस हवी असलेली उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयाकडे आता उपलब्ध नाही. कारण संबंधित ॲम्बेसेडर गाडीचे २००१ ते २००७ पर्यंतच्या कालावधीचा व्हावचर जळाले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बिलांच्या प्रतीची मागणी केली असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या बिलांच्या प्रती पुरविल्या नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अंबेसेडर गाडी नंबर १००१ च्या लॉगबुकच्या प्रती विनामूल्य पुरवल्या. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, या लॉगबुकमध्ये जुलै २००८मध्ये पेट्रोल डिझेल खरेदी केल्याची नोंद आहे. लॉगबुकवरुन अनुदानाचा खर्च काढला असता तो अंदाजे तीन ते साडेतीन लक्ष रुपये येत आहे. तथापि त्यांना हा खर्च जन माहिती अधिकारी यांनी २,८२,९९७ रुपये इतकाच कळविला आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणी इंधनाच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला असून त्यामध्ये वरिष्ठ स्तरावरुन चौकशी होणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध

असलेली माहिती जशीच्या तशी विनामूल्य पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस दिनांक १०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती व लॉगबुक प्रती या माहितीमध्ये तफावत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडील गाडी नंबर १००१ च्या प्रथम खरेदीपासून ते ३१ सप्टेंबर २००६ पर्यंतच्या झालेल्या खर्चामधील तफावत शोधून काढण्याकरिता व संबंधितांवर कारवाई करण्याकरिता उपायुक्त (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना सूचना देण्यात येत आहेत. यामध्ये जर कोणी अधिकारी / कर्मचारी दोषी आढळला तर त्यांना संबंधितांवर वेळीच प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. उपायुक्त (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील गाडी नंबर १००१ च्या प्रथम खरेदीपासून ते ३१ सप्टेंबर २००६ पर्यंतच्या झालेल्या खर्चामधील तफावत शोधून काढण्याकरिता व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याकरिता सूचना देण्यात येत आहेत. उपायुक्त यांनी हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत या प्रकरणाची चौकशी करावी.

औरंगाबाद

दिनांक १८-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेशचंद्र एस. रामावत, जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप आयुक्त (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१८

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. खदीर म. खाजा शेख, : अपिलार्थी
पाशा कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही दखल न घेतल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी या अपिलावर सुनावणी घेतली. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही व या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी

दूरध्वनीव्दारे संपर्क साधूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुखेड तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना वाटप करण्यात आलेल्या व त्यांनी किरकोळ विक्रेत्यांना वाटप केलेल्या रॉकेलसंदर्भात एकूण चार मुद्दयाद्वारे दिनांक ०१-०१-२००५ ते ३०-०६-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील हॉकर्स व किरकोळ विक्रेत्यांची यादी पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्या या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता यावरुन निश्चित कोणताही अर्थबोध आयोगास होत नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे या पत्रातील हस्ताक्षर अत्यंत गचाळ आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित न करता जन माहिती अधिकारी यांना दिनांक २२-०२-२००८ रोजी पत्र देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, तहसीलदार, मुखेड यांच्या समक्ष दिनांक २२-०२-२००८ रोजी सुनावणीच्या वेळी मुखेड तालुक्यातील सर्व अर्धघाऊक परवानाधारक यांच्याकडून त्यांना लेखी कळविलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त अपिलार्थीस जी माहिती आवश्यक आहे ती देण्याबाबत व अपिलार्थीने ती सर्व अर्धघाऊक यांच्याकडून घेण्याचे मान्य केल्यामुळे प्रकरण अंतीम करण्यात आले होते. तथापि अपिलार्थीने अर्धघाऊक विक्रेत्यांकडून अपेक्षित माहिती घेतली की नाही हे त्यांना आता ठाऊक नाही. कारण यासंदर्भात अपिलार्थीने त्यांना काहीही कळविले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या एकूण चार मुद्दयावरील माहितीपैकी फक्त मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही संबंधित दुकानदारांकडे उपलब्ध असते. अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस माहिती दिल्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कोणताही पुरावा आयोगाकडे सादर करता आला नाही याची येथे विशेष नोंद घेण्यात येऊन अपिलार्थीस आता उर्वरित संपूर्ण माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, मूळ त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अर्धघाऊक विक्रेत्यांसंबंधी विचारलेली माहिती त्यांनी अर्धघाऊक विक्रेत्यांकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस याच कालावधीत विनामूल्य पुरवावी. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांनी उर्वरित संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा) (श्री. पी. के. ठाकूर, सध्या नायब तहसीलदार, जाफ्राबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित (मुद्दा क्रमांक २, ३, व ४) माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) (श्री. पी. के. ठाकूर, सध्या नायब तहसीलदार, जाफ्राबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १८-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खदीर म. खाजा शेख, पाशा कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६१९

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. मजहर अलि पि. फैयाज अलि, : अपिलार्थी
घर नं. १/४/२९९, मकदूमनगर, नई आबादी,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी,
तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यालय नगरपालिका, उमरी,
तालुका उमरी, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. जानीमिया अवदसाब,
२. श्री. ताजोद्दीन अवदसाब

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे उमरी येथील घर क्रमांक २६ व घर क्रमांक २८ या दोनही घरांच्या

फेरफाराची नक्कल मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्याधिकारी, नगर परिषद यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलासंदर्भातही कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अथवा या संदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपिलार्थीने त्यांना संबंधित मिळकतीच्या फेरफाराच्या प्रती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मौजे उमरी येथील घर क्रमांक २६ व २८ याच्या फेरफाराच्या झेरॉक्स नकला त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरी यांनी अपिलार्थीस घर क्रमांक २६ व २८ शी संबंधित फेरफाराच्या नकला त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मजहर अलि पि. फैयाज अलि, घर नं. १/४/२९९, मकदूमनगर, नई आबादी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, कार्यालय नगरपालिका, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२०

निर्णय दिनांक १८-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा,<br>व्दारा, शेळकेसाहेब यांचे राहते घर, दत्तनगर (गोकुंदा),<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात पाण्याच्या टँकरवर कार्यरत असलेल्या चालकाचे व स्वच्छकाचे नाव आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पंचायत समिती कार्यालयास सन

२००० ते २००७ या कालावधीमध्ये पाण्याचे टँकर वापरण्यासाठी ज्या तारखांना दिले त्या तारखा अशी सात वर्षापूर्वीची जुनी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २१-०२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करणे त्यांना अपेक्षित होते. तथापि अशी कार्यवाही संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सात वर्षापूर्वीची जुनी असल्याने ही माहिती वेगवेगळ्या कार्यालयांशी संपर्क साधून त्यांना घ्यावी लागली त्यामुळे त्यांना ही माहिती देण्यासाठी थोडा विलंब लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००८ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही त्यांच्या मूळ अर्जातील मागणी

केलेल्या माहितीशी पूर्णपणे सुसंगत आहे हे पाहता तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा जुना कालवधी पाहता जन माहिती अधिकारी यांचे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी केलेल्या विलंबाचे समर्थन आयोग मान्य करत आहे. मात्र येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार त्यांना कारवाई करणे भाग आहे अशी त्यांना समज देण्यात येऊन अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पूर्णतः मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, व्दारा, शेळकेसाहेब यांचे राहते घर, दत्तनगर (गोकुंदा), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२१

निर्णय दिनांक १८-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रशांत गणपतराव नरवाडे,<br>रा. गोकुंदा, प्रकल्प अधिकारी कार्यालयासमोर, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,<br>पाटोदा (खु), वडोली, नागझरी व दिगडी (म.),<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अर्धवट माहिती दिल्याने आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विना दिनांकाच्या अर्जाव्दारे ग्रामपंचायत, पाटोदा (खु), वडोली, नागझरी व दिगडी (म.) या चार जन माहिती अधिका-यांकडे एकाच माहितीची मागणी

केलेली आहे. यामध्ये संबंधित ग्रामपंचायत कार्यालयातील सन २००५ ते २००७ या कालावधी-तील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी, दलीत वस्ती योजना, पाणीपुरवठा योजना व बाराव्या वित्त आयोगाअंतर्गत कोणकोणती कामे केली त्या कामाचे नाव, मंजूरी आदेश क्रमांक, मंजूर निधी, प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च, शिल्लक, मजुरांची नावे, गावे, ग्रामपंचायत खात्यावर जमा असलेली रक्कम या मुद्दयांवर माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. या संदर्भातील आपले आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००७ रोजी पारित केले. या अपील निर्णयामध्ये त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केल्याचे अनुमान जन अपिलीय अधिकारी यांच्या या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या कथित पत्रावरुन काढण्यात येत आहे. मात्र यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही त्यांना अपूर्ण वाटत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आयोगासमोर हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज न करता तो प्रथमतः सहायक जन माहिती अधिकारी यांना उद्देशून केला असून अपिलार्थीने एकच माहिती एकाच अर्जाव्दारे वेगवेगळ्या जन माहिती अधिका-याकडून अपेक्षिली आहे. तद्वतच अपिलार्थीच्या या अर्जामध्ये दिनांक लिहिलेला नाही. एकाच माहितीसाठी एकाच अर्जाव्दारे वेगवेगळ्या जन माहिती अधिका-याकडे माहिती मागण्याची अपिलार्थीची ही कृती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही, असे

आयोगास वाटते. याचबरोबर अपिलार्थीने त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चूकीची व अपूर्ण असल्याचे आयोगाकडे त्यांनी केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. मात्र त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व अपूर्ण कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगाससमोर उपस्थित नाहीत. यासंदर्भात त्यांनी प्राप्त माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचा त्यांचा दावा सिध्द करण्याकरिता कोणताही लेखी युक्तिवाद अथवा पुरावा आयोगास आजतागायत सादर केलेला नाही. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत गणपतराव नरवाडे, रा. गोकुंदा, प्रकल्प अधिकारी कार्यालयासमोर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पाटोदा (खु), वडोली, नागझरी व दिगडी (म.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२२

निर्णय दिनांक १८-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुधीर भातलवंडे,<br>त्रिमुर्ती भवन, कैलासनगर,<br>उदय पेट्रोल पंपाजवळ, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत अनास्था दर्शविल्यामुळे व माहिती अधिका-याने जास्तीची माहिती दिली असल्याचे मत नोंदविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मा. न्यायालयाने कायदेशीर कारवाई करुनच अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले असतांना याबाबत अपिलार्थीस कोणतेही अभिप्राय व माहिती प्राप्त झाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २६-१०-२००७ रोजी प्राप्त झाला त्या अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर शहरातील अतिक्रमणाबाबत एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-११-२००७ रोजी करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविल्याचे अनुमान काढून, निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-११-२००७ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे, असा युक्तिवाद केला.

या प्रकरणाशी संबंधीत घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की,

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण सहाही मुद्दयाव्दारे अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक व अमूर्त स्वरुपात माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती "...... ३ अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम विभागाने काढली हे सत्य आहे काय ?" - ही अमूर्त स्वरुपात आहे. अशी माहिती अपिलार्थीस अपेक्षित स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सरळ उपलब्ध असू शकत नाही. तथापि या मुद्दयासंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अवगत केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ व्दारे "..... हे खरे आहे काय ?, हे सत्य आहे काय ?" अशा अमूर्त स्वरुपात माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. एवढे असूनही या माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अवगत केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे अशाप्रकारे मागणी केलेली माहिती "माहिती " या स्वरुपात उपलब्ध असणार नाही व त्यामुळे त्यांना ती अपिलार्थीस देता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ५ या उर्वरित मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल कारणे, खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविणे अर्जदारास अनुज्ञेय नाही. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकार यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस पुरेशी माहिती पुरविली आहे असे आयोगाचे मत झाले आहे. मूळात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतचे अभिप्राय " त्यांना

आवश्यक माहिती "म्हणून अपेक्षिले आहेत. अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एकाच पृष्ठाची माहिती व्यक्तिशः दिली असूनही त्यांच्याकडून माहिती देण्यापोटीचा पोस्टाचा खर्च रुपये २५ इतक्या शुल्काची आकारणी केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. त्याप्रमाणे ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १६-११-२००७ रोजी व्यक्तिशः १ पृष्ठाची माहिती घेऊन गेले, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटीचे आकारलेले जादाचे शुल्क रुपये २५ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचे, त्यांच्याकडून माहिती देण्यापोटीचे घेतलेले जादाचे शुल्क रुपये २५ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधीर भातलवंडे, त्रिमुर्ती भवन, कैलासनगर, उदय पेट्रोल पंपाजवळ, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२३

निर्णय दिनांक १८-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. माधव अर्जून भोसले,<br>मु. पो. सरमकुंडी, तालुका वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, श्री गुरुदेवदत्त हायस्कूल, भूम,<br>तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : १. श्री. बांगर पोपट,
२. श्री. भोसले एम. ए.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, या अपील अर्जावर आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ११-०६-२००९ रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थीने एकच अपील दोन प्रतीमध्ये, त्यापैकी एक प्रत मुंबई येथील कार्यालयास व दुसरी प्रत औरंगाबाद येथील कार्यालयास सादर केली असल्याने या विचाराधीन

प्रकरणाची व्दिरुक्ती झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. या अपील अर्जावर दिनांक ११-०६-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय झाल्याने अपिलार्थीचे आज विचाराधीन असलेले अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माधव अर्जून भोसले, मु. पो. सरमकुंडी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुरुदेवदत्त हायस्कूल, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६२५

निर्णय दिनांक  १८-०६-२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. रामरहिमनगर, घर नंबर ९-४-१०६१,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सहायक विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सहायक विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : विक्रीकर सह आयुक्त, व्हॅट प्रशासन, नांदेड विभाग, नांदेड
त्रयस्थ पक्ष : १. श्री. बंडू शंकर स्वामी,
२. श्री. ब्रिजवारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी माहिती मागितली असता विहित मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारा निर्णय दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील लातूर जिल्ह्यातील दोन फटाके परवानाधारक वगळता इतर कोणत्याही फटाके परवानाधारकाकडून व्यवसायकर ज्या नियमाने वसूल करण्यात आला नाही त्या नियमाची प्रत मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक ०१-१०-२००७ ते १५-११-२००७ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०२-२००८ रोजी दिलेली माहिती योग्य असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर नव्हते. अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुनश्च संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२ २००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश

निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. रामरहिमनगर, घर नंबर ९-४-१०६१, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, व्हॅट प्रशासन, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२४

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विक्रीकर उप आयुक्त कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विक्रीकर उप आयुक्त,
विक्रीकर उप आयुक्त कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : विक्रीकर सह आयुक्त, व्हॅट प्रशासन, नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे नाकारली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी अपील दाखल करुन सुध्दा या अपिलाची जन अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी न घेता जाणुनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचा-यांच्या दिनांक ३०-०४-२००७ च्या यादीप्रमाणे ज्या ज्या अधिकारी व कर्मचा-यांच्या नावासमोर जातीचा उल्लेख केला आहे. त्या अधिकारी व कर्मचा-यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या छायांकीत सत्यप्रतीची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यावर उपलब्ध नसल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५४ इतके त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती.

त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज, ही माहिती त्यांच्या ज्या वरिष्ठ कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकेल त्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला. तथापि वरिष्ठ कार्यालयाने त्यांना संबंधित कर्मचा-यांच्याकडून जात प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस पुरविण्याचे सूचित केल्यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील नमूद केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांकडून त्यांच्या जातीची प्रमाणपत्रे मागवून घेतली. या प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्याकडे तयार असून ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ५४ रुपये इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्राने त्यांनी अपिलार्थीस कळविले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्याने त्यांना अद्यापपावेतो अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहजपणे उपलब्ध नव्हती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांच्या मूळ नेमणूका प्राधिकरणाच्या मुख्यालय नागपूर व मुंबई येथील असल्याने ही माहिती त्या कार्यालयांकडे उपलब्ध असते. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होऊ शकत नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे अशा प्रकारणी आवश्यक असते. तथापि विचाराधीन प्रकरणी अशा प्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून केली गेल्याचे दिसून येत नाही. या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याच प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या दुस-या प्राधिकरणाकडे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे हे या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशी कार्यवाही न करुन आपल्या अशा प्रकारच्या कृतीने अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केला असल्याने व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची अधिनियमातील

कलम ७ (१) मध्ये विहीत केलेली मुदत आता व्यपगत झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) मधील तरतुदीप्रमाणे विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती माहिती उपलब्ध करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची सहमती घेणे आयोगास आवश्यक वाटत नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, व्हॅट प्रशासन, नांदेड विभाग,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२७

निर्णय दिनांक १८-०६-२००९

१ श्री. संतराम काशीनाथ माने-पाटील, : अपिलार्थी
" कहेष्का " २४, न्यू एस. बी. एच. कॉलनी, ज्योतीनगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष पोलीस उपमहानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे ‍ ०७

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष पोलीस उपमहानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे ‍ ०७

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विहित कालावधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. आर. के. सहाय, पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन यांच्यासंदर्भात सन २००६ ते ०१-०२-२००७ या कालावधीशी संबंधित एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये श्री. आर. के. सहाय, पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन यांनी त्यांच्या अधिपत्याखालील वाहन खाजगी कामासाठी वापरल्यासंदर्भात ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहावे लागले असल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आता विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे तसेच त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याबद्दल संबंधिताविरुध्द कार्यवाही करावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील सात मुद्यापैकी मुद्दा क्रमांक पाच वगळता उर्वरित सर्व सहा मुद्दयावर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सर्वसाधारण स्वरुप पाहता अपिलार्थीस श्री. आर. के. सहाय, पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन या त्रयस्थ पक्षाच्या जानेवारी २००६ ते ते ०१-०२-२००७ या कालावधीतील प्रवास दैनंदिनी, प्रवासभत्ता बीले आणि वैद्यकीय परिपुर्ती देयकाच्या प्रती, अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ७ वगळता उर्वरित सर्व मुद्दयाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. मात्र अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ७ ही माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. कारण त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अमूर्त (abstract) स्वरुपाची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक असल्याने व ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व ९ मधील तरतुदींचा भंग होण्याचा संभव नसल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ व ७ ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी केलेल्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब सचिव (गृह) यांना,

संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची दखलही त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ व ७ ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (गृह) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतराम काशीनाथ माने-पाटील, " कहेष्का " २४, न्यू एस. बी. एच. कॉलनी, ज्योतीनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७२८/२००७ व ६२४/२००८**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२८ व ६२४/२००८

निर्णय दिनांक  १८-०६-२००९

१ श्री. संतराम काशीनाथ माने-पाटील, : अपिलार्थी
" कहेष्का " २४, न्यू एस. बी. एच. कॉलनी, ज्योतीनगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष पोलीस उपमहानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष पोलीस उपमहानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७

# निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी फेर दाखल केलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांनी माहिती न पुरविल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी या दोनही प्रकरणी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरवलेली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांना वेळेत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर नियमानुसार वेळेत कार्यवाही व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या अपील क्रमांक २७२८/२००७ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी केलेल्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ६८४/२००७, ६८५/२००७, दिनांक ०३-०२-२००७ याच्या प्रती व यासंदर्भात त्यांच्या कार्यालयीन टिपणीच्या साक्षांकीत प्रती, पोलीस मध्यवर्ती मोटार परिवहन कार्यशाळा, औरंगाबाद येथील कार्यालयीन पत्र क्रमांक पोउपअधी/२००७/१०४, दिनांक २२-०१-२००७ चा फॅक्स जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास केव्हा मिळाला व त्याबाबतची कार्यालयीन टिपणी ही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांच्याशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

अपिलार्थीच्या व्दितीय अपील क्रमांक ६२४/२००८ च्या बाबत अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या कार्यालयातील पत्र क्रमांक ८५३८/२००६, दिनांक १३-१२-२००६, पत्र क्रमांक आशा-२/५६५/ २००७ पुणे दिनांक २४-०१-२००७, पत्र क्रमांक ४५/२००७/पुणे, दिनांक २९-०१-२००७ व पत्र क्रमांक एस.के.माने/गोप/४६/२००७, दिनांक २९-०१-२००७ या चार पत्राच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कार्यालयीन टिपणीच्या साक्षांकीत प्रती मागितल्या होत्या. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक २६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या विचाराधीन दोनही अपील प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित राहावे लागल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी उपरोक्त दोनही प्रकरणी त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे. या दोनही प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देणा-या जन माहिती अधिका-यास, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही व्हावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दोनही

अपिलासंदर्भातील मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक १२-०२-२००७ व ०५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १२-०२-२००७ व दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (गृह) यांना करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीच्या दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची नोंद घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक २७२८/२००७ मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ६२४/२००८ मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जांव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

४. सचिव (गृह) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १८-०६-२००९

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतराम काशीनाथ माने-पाटील, " कहेष्का " २४, न्यू एस. बी. एच. कॉलनी, ज्योतीनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०१
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. संजय कांतराव उदावंत, परभणी : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद (बांधकाम), परभणी : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, परभणी
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (बां), जिल्हा परिषद,परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वेळा अर्ज करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने,त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. आपल्या या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च, २००६ ते ऑगस्ट, २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित बांधकाम या विषयासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या

मूळ अर्जामध्ये - बांधकामासाठी शासनाचे नियम व अटीसंबंधित परिपत्रकाची एक प्रत, मार्च, २००६ ते ऑगस्ट, २००७ पर्यंतच्या केलेल्या बांधकामाची सविस्तर तपशीलवार माहितीची यादी, सदर कालावधीत बांधकामासाठी खर्च करण्यात आलेल्या निधीची माहिती, प्रत्येक बांधकामानुसार केलेल्या खर्चाची सविस्तर व तपशीलवार यादी - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आता दि. ०५.०५.२००९ रोजी त्यांच्याकडील बांधकामाची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीने ज्यावेळी त्यांचा दि. ०३.०९.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला, त्यावेळी कार्यकारी अभियंता, श्री. जी.एस.खाडे हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तानाजी गुरव हे जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. तथापि या रचनेत माहे डिसेंबर, २००८ पासून बदल करण्यात आला असून आता उप कार्यकारी अभियंता यांची माहिती अधिकारी म्हणून व कार्यकारी अभियंता यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये "शासनाचे नियम व अटी संबंधी पत्रकाची एक प्रत" हा भाग माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. यासंदर्भात शासनाचे कोणत्या बांधकामाविषयी अथवा बांधकामाच्या कोणत्या भागासंबंधीचे नियम, तसेच अटी म्हणजे कोणत्या विषयासंदर्भातील अटी यांचा कोणताही उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात केला नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील हा भाग मोघम स्वरुपाचा असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितल्याशिवाय ती जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास देता येणार नाही, हे पाहता, अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००९ रोजी म्हणजेच अधिनियमातील माहिती देण्याच्या विहित कालावधीपेक्षा अंदाजे एक वर्ष सात महिने इतक्या विलंबाने दिली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापृष्ठयर्थ लावलेल्या विलंबापेक्षा त्यांच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर, या संपूर्ण घटनाक्रमातील कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, हे जास्त महत्वाचे आहे. अपिलार्थीने या प्रकरणी दि. २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर देखील संबंधित कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही, यासंदर्भात कोणत्याही प्राधिकरणाशी पत्रव्यवहार झाल्याचे अपिलार्थीस ज्ञात केले नाही. ही बाब देखील आयोग गांभीर्याने घेत आहे.संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती दिल्याचा योग्य तो पुरावा, अपिलार्थीच्या पोचसहीसह आयोगासमोर सादर केला आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ती अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील माहितीच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत असून, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय कांतराव उदावंत,उदयनगर, लोहगाव रोड, गंगाखेड नाका, परभणी ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०२
निर्णय दिनांक   १९-०६-२००९

१. श्री. पुंडलिकराव नरसिंगराव राव, सोनेरी बंगला,मोरेवाडी,ता.अंबाजोगाई,जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,अंबाजोगाई, जि.बीड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोरेवाडी, ता.अंबाजोगाई,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती,अंबाजोगाई, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांच्याकडे मोरेवाडी गावातील रस्त्यासंदर्भात काही माहिती मागितली

होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये - मोरवाडी गावातील रोडची रुंदी किती आहे? व अपिलार्थी यांच्या घरासमोर २० फूटाचा रोड का नाही ?,दोन्ही बाजूंनी नाली का नाही ? - अशी माहिती मागविली होती. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांनी अपिलार्थीचा हा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे म्हणजेच ग्रामपंचायतीकडे दि.१०.०१.२००७ रोजी हस्तांतरीत केला. ग्रामपंचायतीच्या संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीच्या दि. ०३.०१.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस दि. १३.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिली. ही माहिती ग्रामसेवकाने त्यांच्या ग्रामपंचायत कार्यालयातील शिपायामार्फत अपिलार्थीकडे पाठविली. ती माहिती पोस्टाने न पाठविण्याचे कारण ग्रामसेवकास विचारले असता, त्यांनी त्यांच्या गावात पोस्टाची सोय नसल्याने त्यांच्या गावातील अंतर्गत सर्व पत्रव्यवहार हा त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत केला जातो, असे आयोगास अवगत केले. ग्रामपंचायतीचा शिपाई दि. १३.०१.२००७ रोजी अपिलार्थी यांच्याकडे गेला असता, त्यांना या पत्राची तामिली, अपिलार्थी हे त्या पत्त्यावर, उपलब्ध नसल्याने होऊ शकली नाही. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांनी दि. २९.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील मुदतबाहय झाल्याने फेटाळून लावले या पत्राची प्रत गट विकास अधिकारी, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे व ग्रामसेवक, मोरेवाडी,ता.अंबाजोगाई,जि.बीड यांना अग्रेषित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे सूचित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तयार करुन ती अपिलार्थीस दि. १३.०१.२००७ व दि. ०२.०२.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर घेऊन गेले असता, हे पत्र घेण्यास अपिलार्थीने नकार दिला. अपिलार्थीने हे माहितीचे पत्र स्वीकारण्यास नाकारल्याबद्दल त्यांनी दोनही वेळेला पंचनामा केल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास अशाप्रकारची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणे अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार केला नाही. अपिलार्थीने माहिती न स्वीकारल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक वेळी पंचनामा केला आहे. त्यामुळे व तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्यही नसावे, असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. एवढे जरी असले तरी मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन

माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदींशी विसंगत माहिती मागविली असल्याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध ठरत आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुंडलिकराव नरसिंगराव राव, सोनेरी बंगला, मोरेवाडी ता,अंबाजोगाई, मोरेवाडी पोस्ट चनई, ता.अंबाजोगाई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मोरेवाडी,ता.अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३७
निर्णय दिनांक १९-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. राजेश्वर मारोतराव पोतदार,<br>रा. परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांचा अर्ज स्वीकारण्यास टाळाटाळ केली व प्रथम अपिलावर आयोजित सुनावणीच्या पत्रावर कोणताही दिनांक टाकला नाही व त्यांना या प्रकरणातील संबंधिताचा हेतू स्पष्ट न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बेरळी खु. ता.लोहा येथील शेत गट नं. ८७ हे.५ -आर-८६ खिदमती इनामाची विरासत मान्यतेसाठीच्या प्रस्तावास होणाऱ्या विलंबाबाबत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ०३.०६.१९९८ च्याा अर्जावर काय कार्यवाही झाली, याची माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रस्तुत प्रकरणात आजपर्यंत काय

कार्यवाही झाली, विलंबाची कारणे, विलंबास जबाबदार असलेल्यांच्यावर काय कारवाई झाली, अथवा करणार - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या प्रकरणाशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी समक्ष उपस्थित राहून पाहण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने दि. १५.०२.२००८ रोजीपर्यंत माहिती पाठविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दि. १०.१०.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीच्या मूळ अर्जात अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, याचा बोध न झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित संचिका त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे सूचविले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीचा, त्यांच्या मूळ अर्जावर संदर्भित केलेल्या दि. ०३.०६.१९९८ च्या अर्जावर त्यांच्या कार्यालयात दिवाणी स्वरुपाची सुनावणी चालू आहे. याकरिता या सुनावणीसाठी अपिलार्थीस वेळोवेळी बोलावण्यात आले असता, अपिलार्थी हे सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे या प्रकरणात आजतागायत कोणताही अंतिम निर्णय घेण्यात

आला नाही. त्यामुळे ते जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्याकडे संविधानिक (Statutary) स्वरुपात त्यांच्याकडे चालू असलेल्या प्रकरणासंदर्भात माहिती मागविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या दि. ०३.०६.१९९८ रोजीच्या अर्जावर अर्धन्यायिक स्वरुपाची कार्यवाही चालू आहे. अपिलार्थी हे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे त्यांनीच केलेल्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहत आहेत. हे पाहता त्यांनी माहिती अधिकाराखाली जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करेपर्यंत त्यांच्या अर्जावर काय कार्यवाही झाली ही माहिती अपिलार्थीस निश्चित ठाऊक असणार आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडे अनौपचारिकरित्या उपलब्ध आहे, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली, अशाप्रकारची माहिती विचारल्यास अर्जदाराच्या मूळ अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अर्जासंदर्भात वेगवेगळया प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या प्रकरणाच्या संदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यांवर उपलब्ध असलेल्या नोंदी त्यांनी अशा वेळी अर्जदारास पुरविणे अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०६.१९९८ रोजीच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयामार्फत घेण्यात आलेल्या सुनावणीच्या अपिलार्थीस पाठविण्यात आलेल्या नोटीसच्या प्रती व प्रत्येक सुनावणीच्या वेळी झालेल्या रोजनाम्याच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणासंदर्भात होणाऱ्या विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली आहेत. तथापि अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती

मागविली आहे. ते प्रकरण अर्धन्यायिक स्वरुपाचे असल्याने व अपिलार्थीची या मुद्यावरील त्यांना अपेक्षित असलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने या मुद्यावर मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची अथवा त्यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे व स्पष्टीकरणे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ती देणे, अशा प्रकारच्या प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अर्धन्यायिक स्वरुपाच्या प्रकरणाशी संबंधित असल्याने व या प्रकरणात विलंब झाल्याचा निष्कर्ष कोणत्याही प्राधिकरणाने काढला नसल्याने, या विलंबाची जबाबदारी निश्चित करावयाची किंवा कसे याबाबतही जन माहिती अधिकारी यांचा कोणताही निर्णय झाला नसल्याने या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होऊ शकत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे वरील परिच्छेदात केलेल्या पृथक्करणाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती फक्त देय होत आहे. ती माहिती त्यांना अपिलार्थीस आता हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत पुरविण्याचे वरील परिच्छेदात आदेशित केले आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील वरील निर्णयात स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेश्वर मारोतराव पोतदार, विठ्ठल मंदिरामागे, सहकारनगर, जुना पेडगाव रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३८
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. शरद कुलकर्णी, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जालना
२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना
प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, दुधना मध्यम प्रकल्प सोमठाणाच्या लाभक्षेत्रातील ३४०१ हे.च्या तपशीलाची, एप्रिल, १९९७ ते ऑक्टोबर, २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये - "लाभक्षेत्र ३४०१ हे चा तपशिल, गाव तालुका क्षेत्रासह, सदर जमिनीची सध्याची स्थिती, लाभक्षेत्रातील ३४०१ हेक्टर जमीन असताना प्रकल्पग्रस्तांना जिल्हयात वाटप का केली नाही, सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पर्यायी जमीन मागणीचे अर्ज प्राप्त नव्हते का, असतील तर

त्याचा तपशील, प्रकल्पग्रस्तांना वाटपाकरिता जमीन उपलब्ध असलेल्या जाहीर प्रसिध्दी/सूचनाफलक/दवंडी बाबतचा पुरावा, जिल्हयात प्रकल्पग्रस्तांना वितरीत पर्यायी जमीनी वा तपशील गावनिहाय,तालुकानिहाय व क्षेत्रनिहाय तसेच प्रकल्पग्रस्त कोणत्या गाव,तालुका व जिल्हयातील आहेत, त्याचा पुरावा, प्रकल्पग्रस्तांचे जिल्हयातून प्राप्त पर्यायी जमीन मागणी अर्ज, इतर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्याबाबत आपल्या कार्यालयाला प्राप्त शिफारसीचा तपशील, इतर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना जालना जिल्हयात पर्यायी जमीन वाटप केल्याचा गाव तालुकानिहाय क्षेत्रासह तपशील प्रकल्पग्रस्त पुराव्यासह" - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली जमीन ही प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादित केली नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीने संदर्भित केलेला जमिनी वाटप हा विषय त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध होऊ शकत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न अपिलार्थीने झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हे आदेश पारित होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०१.२००८ रोजी दिलेल्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या जमिनीचा संदर्भ दिला आहे, ती जमीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मूळात संपादितच केलेली नाही. तसेच या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना बदनापूर तालुक्यामध्ये सोमठाणा गावाच्या आसपास निर्विवाद जमिनींची माहिती दिली तरी चालेल, असा युक्तिवाद केला आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये निश्चित कोणत्या जमिनीच्या तपशीलाची मागणी केली व ही मागणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या जमिनीशी संबंधित माहिती मागितली आहे, त्या माहितीपेक्षा पूर्णतः वेगळी आहे किंवा कसे याचा आयोगास बोध होत नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर पुनश्च् सुनावणी घेणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीचा दि. ३०.१२.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज व त्यावरील जन अपिलीय अधिकारी यांचा दि. २१.०१.२००८ रोजीचा निर्णय, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे फेरविचारासाठी परत पाठविण्यात येत असून,त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. ३०.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या दि. २९.०१.२००८ रोजी दिलेल्या पत्राची दखल घेऊन, त्यावर हे आदेश निर्गमित होताच, त्यांनी पंचेचाळीस दिवसांच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन,आपला फेरनिर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३०.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शरद कुलकर्णी,प्लॉट नं.४, आर्या टॉवर्स, एडीसीसी स्टेडीयमजवळ,एन-२,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६३९
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.१०.२००७ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दि. २८.१०.२००७ रोजी प्राप्त झाला,त्यान्वये त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०६.२००६ ते २४.१०.२००७ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८(९) प्रमाणे देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस एक महिन्याचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ३०.०४.२००८ रोजी नोंदणीकृत पत्राद्वारे व विनामूल्य पाठविली असून त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ पोचपावतीची प्रत आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला, असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे, जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे, द्वितीय अपील केले आहे. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०४.२००८ रोजी आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली असल्याने अपिलार्थीचा आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचा हेतू सफल झाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीसंबंधी अपिलार्थीने अद्यापपावेतो कोणतेही अभिप्राय आयोगाकडे सादर केले नाहीत. तसेच आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे आयोगासमोर

अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत संपतराव मुंडे,गौरीकुंज, मार्केट,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४०
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
मु.पो.मंगरुळ,ता.माजलगाव,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
माजलगाव,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाचा निकाल दिला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील खत, औषध,बियाणे खरेदी व वाटप तसेच शेतकरी प्रशिक्षण, कर्मचारी प्रशिक्षण यावर झालेल्या खर्चाचा तपशील सन २००५ पासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत खर्चासंदर्भातील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

कोणकोणत्या सरकारी योजना केंद्र सरकार,राज्य सरकार यांच्याकडून आलेल्या आहेत,त्याबाबतचे शासन नियम, या कालावधीत खत,औषधीं,बियाणे कोणत्या कंपनीकडून किंवा दुकानदाराकडून खरेदी केले व कोणत्या शेतकऱ्यांस वाटप केले, त्यांच्या संपूर्ण नावागावासहीत माहिती, तसेच शेतकरी प्रशिक्षण कोठे व केव्हा घेतले याचा कालावधी, दिनांक व फोटोसहीत कर्मचारी प्रशिक्षणाची माहिती, या दोन्ही प्रशिक्षणावर झालेला खर्च याची तपशीलवार माहिती, कर्मचारी प्रशिक्षणाचे प्रमाणके (व्हावचर),कृषि विस्तार योजना,कृषी अधिकारी यांना देण्यात आलेल्या अग्रीमाचा तपशील दिनांकासह,सन २००६-०७ चे कापूस अर्थसहाय्य हेक्टरी १५०० रुपये जे तलाठी व इतर लोकांकडून स्थळपहाणीमध्ये नजरचुकीने राहिले, त्याबाबत तहसीलदार,माजलगाव यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पत्राप्रमाणे मावेजा कधी वाटप करणार - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी, माजलगाव जि.बीड यांना दि. २४.०१.२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस नियमाप्रमाणे मुदतीत माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या पत्रानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या पदाचा कार्यभार एक वर्षापूर्वी घेतला असून त्यांना या प्रकरणाशी संबंधित काही माहिती नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे

त्यांनी आता अवलोकन केले असून, अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. या अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय हात नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही भविष्यकाळातील आहे. ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मात्र उर्वरित ४ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.५ वगळता, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद तर दिला नाहीच परंतु उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती अद्यापपावेतो दिली नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड काम नव्हते किंवा ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती, अशातील

कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव व पर्यायाने संबंधित जन माहिती अधिकारी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. गोस्वामी एल. आर. हे कृषि अधिकारी कार्यरत होते. सध्या ते तालुका कृषि अधिकारी, पैठण या पदावर कार्यरत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी (श्री.गोस्वामी एल.आर.) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याने त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांनी देखील आयोगाकडे आज रोजी सुनावणी होईपर्यंत अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेतल्याचे अथवा अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संकलन करण्याचे काम केल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे त्यांनी देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्याप्रती अक्षम्य बेपर्वाई दर्शवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री.पवार) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. आयुक्त (कृषि) यांना, विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे,मु.पो.मंगरुळ नं.१,ता.माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४१
निर्णय दिनांक १९-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे,<br>कारंजारोड,बीड,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय,<br>जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी दि. २१.०९.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.१२.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्षात सुनावणी घेतली नाही. सुनावणीसाठी अपिलार्थी हजर होते. या अपील निर्णयाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करुनही अपिलार्थीस दिली नाही. या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीने अंतिमतः आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे साधन व्यक्ती नियुक्तीसंदर्भात एकूण २ मुद्यांद्वारे विविध प्रकारची माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - साधन व्यक्ती म्हणजे काय? त्यांचा उद्देश ठरविणाऱ्या शासनाच्या आदेशाच्या प्रती, दि.१४.११.२००६ रोजी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी जन माहिती अधिकारी यांना ३४० शिक्षक अतिरिक्त असताना साधन व्यक्तींची सरळ भरती करण्यात येत असल्यासंदर्भात मागणी केलेल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायाची प्रत, साधन व्यक्तींच्या नियुक्त्या करताना सेवाज्येष्ठ व अनुभवी शिक्षकांतूनच प्राधान्याने नियुक्ती करावी, असे आदेश होते. त्या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केले होते किंवा नाही, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेली पदे भरताना मागासवर्गीयांचे व अपंगांचे आरक्षण विचारात घेऊन पदे भरण्याची दक्षता घ्यावी, असे दर्शविले होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे किंवा नाही, दि. २१.०८.२००७ रोजी ॲड. अजित एम.देशमुख यांनी केलेल्या विनंती अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाहीच्या/आदेशाच्या प्रती, साधन व्यक्तींच्या नियुक्तीसाठी पात्रता कोणती आहे ? याबद्दलची विस्तृत माहिती, शिक्षकांच्या हजेरीपत्रावरील सहया नसल्या तरी देखील त्यांना पात्र ठरविण्यात येते की नाही, याबद्दलच्या आदेशाची माहिती, सध्या पदसंख्येनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत सेवेत असलेल्या शिक्षकांपैकी किती शिक्षक अतिरिक्त आहेत, अपिलार्थीने अर्ज करण्याच्या सहा महिने अगोदर एकूण किती साधन व्यक्तींना किती पगार दिला व या साधन व्यक्तींच्या नियुक्त्या करताना अतिरिक्त संख्या किती होती, याची माहिती द्यावी, तसेच ही संख्या अतिरिक्त असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना कळविले होते की नाही, - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. १७.१२.२००७ रोजी सुनावणीसाठी दुपारी ०१.००वाजता उपस्थित राहण्याचे सूचित केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि तदनंतर या सुनावणीचा निर्णय अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २२.१०.२००७ रोजी आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. १७.१२.२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने यासंदर्भात त्यांनी कोणताही निर्णय पारित केला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३,४ व ६ अंशतः ही माहिती अपिलार्थीस मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षिले आहेत. मुद्दा क्र. ६ च्या संदर्भातील - साधन व्यक्तींच्या नियुक्तीसाठी पात्रता कोणती आहे- या मुद्यावरील

माहिती अपिलार्थीस देय होते व ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.२२.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. या सर्व मुद्यांमध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट कागदपत्रांच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, "याबद्दलची माहिती द्या"अशी मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. अशाप्रकारची मागणी ही मोघम असल्याचे दिसून येत आहे.माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती स्पष्ट व नेमक्या स्वरुपात मागणे त्यांना अनिवार्य आहे. नुसते "माहिती द्या", अशी सर्वसाधारण स्वरुपाची मोघम माहिती अर्जदारास देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिलेली आहे व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणतः सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस गैरहजर राहूनही सुनावणीस हजर असल्याचे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी नमूद केले आहे. मात्र यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत नाही. आज रोजी आयोगाकडील सुनावणीस देखील अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या कथित सुनावणीच्या वेळेची कोणतीही कागदपत्रे (रोजनामा) आयोगास सादर केली नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थी हे या सुनावणीस गैरहजर राहिले, त्यामुळे त्यांना ही सुनावणी घेता आली नाही व यासंदर्भात त्यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, एखाद्या अपिलाची सुनावणी ठेवल्यानंतर शक्यतो त्याच दिवशी संबंधित पक्षकार जरी गैरहजर असतील तरी त्यांच्या गैरहजेरीत सुनावणी घेण्यास व आपला निर्णय

देण्यास हरकत नाही. या सुनावणीसंदर्भात आवश्यक असलेल्या रोजनाम्याच्या प्रती त्यांनी स्वतःकडे उपलब्ध करुन ठेवाव्यात म्हणजेच या प्रकरणी अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती इतर कोणत्याही अपिलार्थीच्या बाबतीत होऊ शकणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे,लाईन गल्ली, कारंजा रोड,बीड,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४२
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. आबासाहेब नानाराव भोसले, वसमत,जि.हिंगोली : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, वसमतनगर,जि.हिंगोली : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, हिंगाली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती एस.के.देशमुख,सहशिक्षिका यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रस्तावाबाबत सन २००५-०६ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वैद्यकीय बील मागणी अर्जाची प्रत, वैद्यकीय बील मागणी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची प्रत, वैद्यकीय बील मागणीसाठी ठरावाची मंजूरी लागते किंवा

नाही, असल्यास ठरावाची प्रत,नसल्यास त्याचा तपशील, बीलाची जास्तीत जास्त मर्यादा (रक्कम) किती, - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील पहिल्या दोन मुद्यांवर अपिलार्थीस माहिती न पुरविता उर्वरित मुद्यांवर अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुद्दा क्र. १ व २ द्वारे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, याचा बोध त्यांना झाला नसल्याने, त्या ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास दि. २१.११.२००७ रोजी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरीही या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पहिल्या दोन मुद्यांद्वारे अपिलार्थीस अधिनियमाद्वारे कोणत्या मुद्यांवर माहिती अपेक्षित आहे, याचा त्यांना अर्थबोध न झाल्याने या मुद्यावरील माहिती त्या अपिलार्थीस पुरवू शकल्या नाहीत, आयोग अमान्य

करीत आहे. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये पहिल्या मुद्याद्वारे -"-वैद्यकीय बील मागणी अर्जाची प्रत"- ही माहिती मागितली होती. ही माहिती आयोगाच्याच नव्हे तर, इतर कोणत्याही जन सामान्यांना निश्चितपणे समजेल अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्टपणे मागणी केलेली माहिती आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे अपिलार्थीने,"वैद्यकीय बील मागणी अर्जासोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती" ही माहिती मागविली आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीस वैद्यकीय प्रतिपूर्तीची मागणी करत असताना या बीलासोबत जी कागदपत्रे संबंधीतांनी त्यांच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक आहेत, याची यादी अभिप्रेत असावी, असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेला हा मुद्दा जरी सकृतदर्शनी संदिग्ध असला तरीही या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वैद्यकीय बीलाप्रतीच्या अर्जासह जोडण्यासाठी ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, त्याची यादी अपिलार्थीस कळविण्यासाठी कोणताही प्रत्यवाय नव्हता, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून आले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित, वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूराचा आपल्या सोयीनुसार शब्दःच्छल करुन अपिलार्थीस पहिल्या दोन मुद्यावर माहिती दिली नाही. याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सकारात्मक कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित, वरील निर्णयात स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आबासाहेब नानाराव भोसले,रा.शहर पेठ,वसमतनगर, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, हिंगाली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४३
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. नितीन त्रिंबकराव भिसे, : अपिलार्थी
मु.पो.जायकवाडी (उत्तर), ता.पैठण,
जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी प्रकल्प विभाग,
नाथनगर (उत्तर) पैठण,जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १९.०६.२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती

मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.६४३/०८, दि. २७.०३.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नितीन त्रिंबकराव भिसे, मु.पो.जायकवाडी (उत्तर),ता.पैठण,जि.औरंगाबाद,

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी प्रकल्प विभाग,नाथनगर (उत्तर) पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४५
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. मोहंमद खमरुल इस्लाम, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
कुरेशिया प्राथमिक शाळा,
बारा इमाम रोड,नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
कुरेश एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया
प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड,नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून या अर्जामध्ये मुख्याध्यापक मदरसे कुरेशीया ऊर्दू प्राथमिक शाळा यांच्यासंदर्भात शाळेच्या रेकॉर्डमध्ये खाडाखोड करण्याबाबत तक्रार केली आहे व संबंधित मुख्यापकाच्या विरुध्द पोलीस कारवाई करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दि. ११.१२.२००७ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये त्रयस्थ पक्ष शेख खलील शेख रहीम

कुरेशीची प्रवेश अर्जाची छायाप्रत, दाखल-खारीज रजिस्टरमध्ये श्री. शेख खलील रहीम कुरेशी यांचे नाव ज्या पानावर आहे, त्या पानाची छायाप्रत आणि संबंधित विद्यार्थ्याचा उपस्थितीबाबत सर्व रेकॉर्डच्या छायाप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.१.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या तीन मुद्यांपैकी दोन मुद्यांवरील माहिती देऊ केली व विद्यार्थ्यांचे हजेरी रजिस्टर सध्या उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कुरेश एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे दि. २२.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी संबंधित प्रवेश-निर्गम रजिस्टरच्या झेरॉक्स प्रतीची जन माहिती अधिकारी व दुसऱ्या स्त्रोताकडून मागणी केली असता, एकाच माहितीसाठी दोन वेगवेगळया प्रवेश-निर्गम रजिस्टरच्या प्रती प्राप्त झाल्या आहेत. यावरुन असे दिसून येते की, संबंधित शाळेच्या प्रवेश-निर्गम रजिस्टरमध्ये खाडाखोड केलेली आहे, तसेच त्यांनी ज्या विद्यार्थ्याची माहिती मागविली आहे त्या विद्यार्थ्याची माहिती न देता त्यांना दुसऱ्या विद्यार्थ्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. या घटनेशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली

कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विसंगत माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी 'शेख खलील शेख रहीम कुरेशी' या विद्यार्थ्याच्या संदर्भात माहिती मागविली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सय्यद खलील नावाच्या विद्यार्थ्याची प्रवेश-निर्गम उताऱ्याची प्रत दिली. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या प्रवेश निर्गम उताऱ्याच्या प्रतीमध्ये याही पेक्षा जास्त त्रूटी आहेत. या उताऱ्यामध्ये शेख खलील या विद्यार्थ्याच्या वडिलांचे नाव शेख रहीम कुरेशी असे दर्शविले आहे. दोन ओळीनंतर त्यांच्या वडिलांचे नाव सय्यद करीम असे दर्शविले आहे. यावरुन ही माहिती अपिलार्थीस वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे वाटते. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित करुन दिलेली नाही. त्यामुळे हा प्रवेश-निर्गम उतारा हा खरोखरीच जन माहिती अधिकारी यांच्याकडील रजिस्टरची प्रत आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रवेश-निर्गम रजिस्टरच्या प्रतीची मागणी केली असता, त्यांना प्राप्त झालेली व त्यांच्या परिचितांना याच रजिस्टरच्या याच पृष्ठाची प्राप्त झालेली प्रत पूर्णतया वेगळी असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि या प्रवेश-निर्गम रजिस्टरमधील लिखित मजकूर ऊर्दू या भाषेमधील असल्याने अपिलार्थीचे म्हणणे कितपत योग्य आहे, हे कळण्यास आयोगास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने या मुद्यासंदर्भात आयोगासमोर सुनावणीमध्ये उपस्थित केलेला मुद्दा हा आयोगास गंभीर वाटतो. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांना राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जास अपिलार्थीने जोडलेल्या तक्रार अर्जाची प्रत पाठविण्यात येऊन त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि.२७.०२.२००८ रोजीच्या अर्जाची त्यांनी सखोल चौकशी करुन यासंदर्भात, त्यांना आवश्यक वाटल्यास, संबंधित संस्थेतील अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तीवर फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या शेवटच्या माहितीसंदर्भात - शेख रहीम शेख कुरेशीबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्षाच्या कोणत्या

कालावधीतील उपस्थितीची माहिती हवी आहे, याचा त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या उपस्थिती रेकॉर्डबाबत मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. त्यामुळे या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या माहितीतील आयोगासमोर उपस्थित केलेल्या विसंगतीच्या संदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीतील विसंगतीचे निराकरण करण्याच्या दृष्टीने संबंधित मुख्याध्यापक, अपिलार्थी आणि आवश्यक वाटल्यास संस्था चालक आणि या प्राधिकरणाशी संबंधित सर्व यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत एकत्र बैठक घेऊन अपिलार्थीने उपस्थित केलेल्या विसंगतीचे निराकरण करावे, अन्यथा संबंधित शाळेवर शाळा संहितेप्रमाणे शासनाच्या प्रचलित आदेशानुसार आवश्यक ती कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या दोन मुद्यावरील सत्य माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद खमरुल इस्लाम,घर क्र.९-४-४०६, हनिफ दूध भंडारासमोर,उमर कॉलनी,देगलुरनाका, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,कुरेशिया प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. सचिव,कुरेश एज्युकेशन सोसायटी मार्फत कुरेशिया प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड,नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना,अपिलार्थीच्या दि.२७.०२.२००८ रोजीच्या तक्रार अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५९
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. सौ. रेखा विलास लव्हाडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नगर रचना अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपअभियंता, नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक,
नगररचना (मूल्यांकन),
महानगरपालिका, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अयोग्य व दिशाभूल करणारी माहिती देणारे पत्र प्राप्त झाल्याने व त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी योग्य तो आकार न लावल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या संदर्भात असे नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती सारख्याच माहितीशी संबंधित अपिलांवर, या खंडपीठाने यापूर्वी दि. ०४.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन, निर्णय दिला असल्याने व या अपील निर्णयाशी संबंधित सर्व घडामोडी व निर्णय विचाराधीन अपिलासही तंतोतंत लागू होत असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील (मुद्दा क्र. ३ मधील काही भाग वगळता) उर्वरित संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. रेखा विलास लव्हाडे, बी-५१,अरिहंतनगर,विष्णूनगर,आकाशवाणी मागे,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना (मूल्यांकन), महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२६
निर्णय दिनांक १९-०६-२००९

१. श्री. पंडीत रामलिंग मारकड, : अपिलार्थी
मु.पो.सोनगिरी,ता. भूम,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,भूम,जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सोनगिरी,
ता.भूम, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,भूम,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर त्यांनी फक्त आश्वासने देऊन माहिती देण्यास विलंब केला आहे व माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन ते भ्रष्ट कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.१२.२००५ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील दि. ०१.०१.२००५ ते दि. ३०.११.२००५ या कालावधीशी संबंधित भूम तालुक्यातील सोनगिरी येथील हरियाली पाणलोट क्षेत्र विकास योजनेमध्ये झालेल्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या, हजेरीपत्रकाच्या, मोजमाप पुस्तिकेच्या प्रतींची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित गट विकास अधिकारी यांनी कधी प्रतिसाद दिला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधित ग्राम सेवक व गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी हे देखील आयोगास काहीही दाखवू शकत नाहीत, यावरुन अपिलार्थीच्या दि. २०.१२.२००५ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, असे अनुमान काढण्यात येत आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०४.२००६ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एका आठवडयाचे आत माहिती देण्याचे सूचित केले व तसेच संबंधित ग्रामसेवकांने विहित मुदतीत जर कागदपत्रे पुरविली नाहीत, तर त्यांच्याबाबतीतील कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना गट विकास अधिकारी यांना दिल्या. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी संबंधित ग्रामसेवकाकडे दि. १७.०२.२००६ रोजी भरले असताना देखील त्यांना अद्यापपावेतो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी ग्रामपंचायत,सोनगिरी

कार्यालयाची दि.१७.०२.२००६ रोजीची नमुना नं.७ मधील क्र.००१ ची पावती आयोगास दाखविली आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.५००/- इतक्या शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येत आहे.

गट विकास अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास या प्रकरणाशी संबंधित काहीही सांगितले नाही. संबंधित ग्रामसेवक यांनी, जे प्रत्यक्षत: माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांना समक्ष दोन वेळा माहिती दिली होती. तथापि अपिलार्थीकडून या संबंधीची पोच त्यांनी घेतली नाही. अपिलार्थीस माहिती दिल्याबद्दलचा कोणताही पुरावा ते आयोगास सादर करु शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा माहिती दिली होती, हा युक्तिवाद, ते आयोगास, अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठयर्थ कोणतीही कागदपत्रे किंवा कोणताही पुरावा सादर करु न शकल्यामुळे, आयोग अमान्य करीत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरुनही अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून या प्रकरणी दि. १७.०२.२००६ रोजी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५००/- त्यांना परत करावे लागेल. हे शुल्क देखील जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही विहित मुदतीत तर केली नाहीच, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००६ रोजी सुनावणीमध्ये आदेशित

करुनही संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे, या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सोनगिरी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या असेही निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांनी आयोगाकडे सुनावणीसाठी स्वतः हजर राहणे अपेक्षित असताना त्यांच्या कार्यालयातील अशा प्रतिनिधीला पाठविले की, त्यांनी आयोगास या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती सादर केली नाही अथवा या संबंधीच्या आयोगाच्या प्रश्नांना कोणत्याही प्रकारे समाधानकारक उत्तरे त्यांना देता आली नाहीत.त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, आयोगाकडील सुनावणीसाठी शक्यतो संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या परवानगीशिवाय गैरहजर राहू नये, व अगदी जरुरीच्या वेळी त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कर्मचाऱ्यास त्या प्रकरणाचे पूर्णपणे ज्ञान आहे अशी जन माहिती अधिकारी यांनी खात्री करावी, अशा सूचना त्यांना द्याव्यात, जेणेकरुन आयोगाच्या वेळेचा अपव्यय होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना त्यांच्याकडून माहितीपोटी स्वीकारलेल्या रु.५००/- इतके परत करुन, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पंडीत रामलिंग मारकड,मु.पो.सोनगिरी, ता. भूम,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सोनगिरी ता.भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४६

निर्णय दिनांक २०-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बबनराव साहेबराव गाडेकर,<br>रा. भातखेडा, पो. खामगांव, तालुका बदनापूर,<br>जिल्हा जालना | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता,<br>लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.),<br>जिल्हा परिषद, जालना | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००७ ते २००८ या वर्षामध्ये सिंचन खात्याच्या रोजगार योजनेअंर्तगत करण्यात आलेले गावतलाव ज्या शेतक-यांच्या जमिनीत केले होते त्यांची नांवे व गट नंबर ही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती मौजे दाभाडी ५, खामगांव,

विल्हाडी, लालवाडी, भाकरवाडी, खोडावाडी, सिरसगांव घाटी, राजेवाडी येथील गावतलावाच्या संदर्भात मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक २९-०८-२००८ पर्यंत देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नसून त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता यांच्या ताब्यात होती. ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता यांना दिनांक ०७-०८-२००८ व दिनांक १९-०७-२००८ रोजी स्मरणपत्र देखील दिले आहे. तथापि आजतागायत संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी ही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. आता अपिलार्थीने नमूद केलेल्या गावतलावाच्या कामास भेट देऊन नंतर त्यांना संबंधितांकडून ही माहिती हस्तगत करुन ती अपिलार्थीस द्यावी लागेल व त्यासाठी त्यांना १५ दिवसाचा कालावधी पुरेल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. रोजगार हमी योजनेमध्ये अथवा अशा प्रकारच्या तत्सम योजनांमध्ये ज्या जमिनीवर ही योजना राबविली जाते त्या जमिनीची प्रथम मालकी पाहिली जाते. जर त्या जमीनीची मालकी खाजगी असेल तर संबंधित जमीन मालकाची संमती घेऊन ती योजना राबविली जाते. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे सहायक यांच्या ताब्यात असणे मूलतः अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयाकडे, अशा प्रकारच्या योजनांच्या संदर्भात जमीन मालकाचे संमतीपत्रक व संबंधित अभिलेख्याचे सहपत्रे संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्या ताब्यात असण्याची पध्दत प्रचलीत आहे. अपिलार्थीने ज्या गावतलावाच्याबाबत माहिती मागविली आहे ते गावतलाव जरी पूर्ण झाले असले तरी श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता यांनी ही माहिती या प्रकरणामध्ये उप अभियंता यांच्याकडे अद्यापपर्यंत जमा केलेली नाही. परिणामी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, माहिती देण्यासाठी त्यांनी कनिष्ठ अभियंत्याकडे पाठपुरावा करुनही, ते अपिलार्थीस वेळेत माहिती पुरवू शकले नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले यासंदर्भात आयोगाकडे कोणतीही माहिती नाही. तथापि अपिलार्थीने दि. ०४-०८-२००८ व १५-०९-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना स्मरणपत्रे दिली होती आणि उप अभियंता यांनी दिनांक १९-०७-२००८ व ०७-०८-२००८ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता यांना सूचित केले होते. तथापि त्यांनी केवळ जन माहिती अधिकारी यांच्याच आदेशाचे नव्हे तर कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक २७-०८-

२००८ रोजीचे आदेशही पाळले नाहीत. यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर त्यांची बाजू मांडण्यासाठी उपस्थित नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी केवळ नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी हेच जबाबदार असतात असे नसून अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील सहायक कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता अपिलार्थीस त्यांना अपेक्षित माहितीपासून, अनुज्ञेय कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवण्यासाठी संबंधीत शाखा अभियंता हे जबाबदार असल्याचे येथे सिध्द होत आहे.

सबब श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यासाठी विहीत कालावधीपेक्षा जास्त व असमर्थनीय कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल या प्रकरणी त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला असमर्थनीय विलंब त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. के. आर. वाकोडे, शाखा अभियंता) यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बबनराव साहेबराव गाडेकर, रा. भातखेडा, पो. खामगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. के. आर. वाकोडे, तत्कालीन शाखा अभियंता, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(मार्फतः जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, जालना.)

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४७

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. शिंगाडे अंन्सीराम बापूराव, : अपिलार्थी
रा. नारायणगांव, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक १४-०३-२००८ पर्यंत माहिती देण्याचे लेखी आश्वासन दिले. परंतु त्या आश्वासनाला माहिती अधिका-याने कचरापेटीत टाकून त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वाळकेश्वर, डाकलगाव, शहागड व दोदडगाव येथे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत झालेल्या कामाच्या मजुरांच्या मस्टरच्या प्रती, मजुरांचे पासबुक, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती, गहू, तांदूळ वाटपाच्या पासेसच्या छायांकीत प्रती, ही सन २००६ ते २००७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती व या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची प्रत सक्षम प्राधिकरणाने साक्षांकीत केली नसल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून दिले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ३०-०१-२००८ रोजी त्यांचे साक्षांकीत दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी वाळकेश्वर व ढाकलगांव येथील कामे सिंचन खात्याच्या योजनेअंतर्गत झालेली नाहीत व शहागड व दोदडगांव येथील कामाची, कोणत्या वर्षी झालेल्या कामाची संबंधित माहिती अपिलार्थीस हवी याचा बोध त्यांना झालेला नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक ०४-०१-२००८ पर्यंत व्यक्तिशः संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारचा कोणताही संपर्क जन माहिती अधिकारी यांच्याशी न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी सुनावणी घेऊन यासंदर्भात कोणताही निर्णय

घेतला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करीत असतात. अपिलार्थीने त्यांच्याकडील साक्षांकीत करुन दिलेल्या त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राच्या प्रतीवर विशेष कार्यकारी अधिकारी श्री. नंदकुमार उन्हाळे यांची सही घेतली आहे. तथापि विशेष कार्यकारी अधिकारी हे सत्यप्रत प्रमाणित करण्याकरिता सक्षम प्राधिकरण नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या मनात शंका आहे. याही उपर त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, विचाराधीन माहितीसाठीचा अर्ज, प्रथम अपील यावरील सही व अपिलार्थीची प्रत्यक्ष सही यामध्ये फरक असल्याने विचाराधीन अपीलाशी संबंधीत प्रथम अर्जाच्या वैधतेबाबत ते साशंक आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरील सही आणि प्रत्यक्षात अपिलार्थीस आयोगाने त्यांच्या समोर सही करण्यास सांगितले असता त्यांनी केलेली सही यामध्ये जाणवण्याइतपत फरक आहे. त्यामुळे या प्रकरणाशी संबंधित व्दितीय अपील हे खरोखरच अपिलार्थीने केले आहे किंवा कसे याबद्दल आयोगाच्या मनात शंका आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधतेसंबंधी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून खात्री करुन घ्यावी व जर अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील असतील तर त्यांच्याकडून त्यांनी या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील मूळ अर्ज परत प्राप्त करुन घ्यावा व नंतर अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्याकरिता प्रथमतः अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची वैधता गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून तपासून घ्यावी व जर अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील असतील तर त्यांच्याकडून त्यांनी या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील मूळ अर्ज त्यांच्याकडून परत प्राप्त करुन घ्यावा व नंतर अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंगाडे अंन्सीराम बापूराव, रा. नारायणगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४८

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. राजू भुजंगराव तारे, : अपिलार्थी

मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता,

जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, अंबड,

तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.),

जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहितीपोटी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत शहागड गावतलाव क्रमांक २ व ३ च्या संदर्भात मजुराचे मस्टर, मोजमाप पुस्तिका, धान्य कुपन इत्यादी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००७ ते २००८ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५०० /- इतके त्यांना चलनाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्या प्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्काची रक्कम दिनांक २९-०५-२००८ रोजी श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे भरली. तथापि श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांनी या रकमेचा भरणा शासकीय कोषागरात न करता अपिलार्थीकडून रुपये २५०० /- इतकी रक्कम स्वीकारुन अपिलार्थीस एका साध्या कागदावर दिनांक २९-०५-२००८ रोजी या रकमेची पोच पावती दिली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून, "या प्रकरणी संबंधित उप अभियंता हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे सिध्द झाल्यामुळे संबंधित अर्जदारास दुय्यम अपिलात जाण्यास या कार्यालयाची संमती देण्यात येत आहे," असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे त्यांनी दिनांक २९-०५-२००८ रोजी रुपये २५०० /- इतकी रक्कम

दिल्याबद्दल श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांनी दिलेली पावती आयोगास दाखविली. या पावतीवरच श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ०३-०६-२००८ पर्यंत माहिती देण्याचे त्यांचे अभिप्राय नोंदविले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केल्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा सादर न केल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. मात्र यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अर्जदाराने माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अर्जदारास देण्यासाठी लागणा-या शुल्काचा संपूर्ण तपशील, जसे, संभावित माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर, अंदाजे एकूण शुल्क, ही रक्कम कोठे जमा करावयाची त्या बँकेचा किंवा कोषागाराचा पत्ता व ही रक्कम कोणत्या शिर्षाखाली जमा करावयाची ते शिर्ष हा विहीत मुदतीत अर्जदारास देणे त्यांना अनिवार्य आहे. परंतु अशा प्रकारचा कोणताही तपशील या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिला नसल्याने जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जालना जिल्हा परिषदेकडील कर्मचारी श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना (सध्या पंचायत समिती, घनसावंगी येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीची फसवणूक केली आहे अशी शंका येण्यास या प्रकरणी भरपूर वाव

आहे. श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये २५०० /- हे जिल्हा परिषद, जालनाकडे भरले किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, श्री. ए. सी. पेरकर, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीची २५०० /- रुपये इतकी रक्कम प्राप्त झाल्याच्या पावतीवरच माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. यानंतर अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांनी अपिलार्थीस दुय्यम अपील करण्याची परवानगी दिली आहे. हा सर्व प्रकार पाहता, जालना जिल्हा परिषदेत माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार चालू आहे किंवा कसे ही एक शंका आयोगाच्या मनात येत आहे. त्यामुळे या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांच्या स्तरावर या प्रकरणाची चौकशी करुन त्यामध्ये दोषी आढळणा-या सर्व संबंधितांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जर सदर शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला असता तर हे शुल्क परत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगास आदेशित करता आले असते. तथापि अपिलार्थीने जिल्हा परिषदेकडे सदरची रक्कम भरणा केल्याचा अवैध पुरावा आयोगाकडे सादर केला असल्याने अपिलार्थीस त्यांचे आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क परत करण्याबाबत आयोगास कोणतेही आदेश देता येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजू भुजंगराव तारे, मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ल.पा.वि.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६४९

निर्णय दिनांक २०-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी भाऊराव बनकर,<br>रा. बुटखेडा, तालुका जाफ्राबाद,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रशासकीय अधिकारी,<br>जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा शल्य चिकित्सक,<br>जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. परंतु आदेश न देता त्यांचे अपील निकाली काढल्याचे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी कळविले. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००६-२००७ या कालावधीमध्ये कक्षसेवक व शिपाई या पदावर झालेल्या भरतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस काही माहिती पाठविली व इतर कागदपत्रे बघण्यासाठी त्यांच्या कार्यालयाचे सहायक अधीक्षक आजारी असून ते बरे

झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती पाहण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी पात्र उमेदवारांच्या अर्जाव्यतिरिक्त उर्वरित सर्व माहिती विनामूल्य रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपकी उर्वरित माहिती आता ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. परंतु अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व दि. ३१-०१-२००८ रोजीचे हास्यास्पद पत्र अपिलार्थीस पाठविले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी

त्यांच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली व काही पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. अशा प्रकारे अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे तयार आहेत हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, आरोग्य सेवा यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक, आरोग्य सेवा यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हास्पिटल परिसर, छत्रपती शिवाजी टर्मिनल जवळ, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५०

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. चंद्रकांत बी. के. : अपिलार्थी
साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, सामनगांव,
तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक, कृषि कार्यालय, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमा-अंतर्गत मागणी केलेली माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेले असता त्यांच्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध नाही, माहिती देता येत नाही, काय करायचे ते करा, अशा प्रकारची उत्तरे त्यांना देण्यात आली व माहिती देण्यास संबंधितांनी टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०६-०५-२००८ ते ०५-०६-२००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत दिनांक ०१-०१-२००८ ते ३१-०३-२००८ पर्यंत केलेल्या मा.ना. बंधारे व कंटूर बंडीगच्या कामाशी संबंधीत संदर्भात मजूराचे हजेरीपत्रक, धान्य वाटप कुपन रजिस्टर, प्राप्त निधी व कसा खर्च झाला या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना उद्देशून केला होता. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे तालुका कृषि अधिकारी असल्याचे कळविले व या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी, जालना यांच्याकडे पाठवून दिला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी, जालना यांना त्यांच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात दिनांक ३०-०५-२००८ रोजी असे लिहून दिले होते की, त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले आहे. अपिलार्थीने जरी अशा प्रकारचे लिहून दिले असले तरी देखील त्यांनी यानंतर राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०५-२००८ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असून ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ व प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्याने अपिलार्थीने त्यांना पोच पावती देखील दिली आहे. त्यांनी अपिलार्थीची दिनांक ३०-०५-२००८ रोजीची पोच पावती आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०५-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या पोच पावतीवरील सही व अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरील त्यांची सही यामध्ये सकृतदर्शनी जाणवण्याइतपत फरक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेली कथित पोच पावती, आयोग अवैध ठरवित आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत व्यक्तिशः व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत, स्वतः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत व्यक्तिशः व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत बी. के. साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५१

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. सदानंद देवाप्पा लोणगावकर, अपिलार्थी
व्दारा, श्री. वैद्यनाथ सॉ मील लक्कड-कोट,
जालना, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी श्री. प्रशांत पंढरीनाथ बिलोलीकर यांनी अपिलार्थीचे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना तथा या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १८-०६-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्याकडील आदेश दिनांक ०४-०३-२००८ अन्वये अंमल होऊन त्यांच्या सभासदांच्या नावाची नोंद आखीव पत्रिकेवर झाल्याने त्यांना आता माहितीची गरज उरली नाही. त्यामुळे त्यांचा दिनांक २१-११-२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढावा. अपिलार्थीने ज्या माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले होते, परंतु त्या

माहितीची आता त्यांना आवश्यकता नसल्याचे या पत्रावरुन आढळून येत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६५१/२००८, दिनांक २८-०३-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदानंद देवाप्पा लोणगावकर, व्दारा, श्री. वैद्यनाथ सॉ मील लक्कड-कोट, जालना, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५२

निर्णय दिनांक २०-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. एकनाथ भाऊराव मराठे,<br>औदुंबर निवास, मन्नालाल सराफ नगर,<br>जुना जालना, जिल्हा जालना | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सब ईंजीनिअर महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.<br>(ग्रामीण विभाग), तालुका जालना जिल्हा जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.<br>जालना जिल्हा जालना | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी कोठलीही शहानिशा अथवा सुनावणी न घेता माहिती अधिका-याकडून विहित मुदतीत माहिती घेतली नाही व जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपूर्ण /

अपुरी व असमाधानकारक सादर केली ती जशीच्या तशी पोस्टाने पाठवून फक्त टपाली काम केले आहे त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले नाही, म्हणून त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही हजर नाही. अपिलार्थीने त्यांना संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही असे आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती दिली हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, अपुरी व असमाधानकारक कशी आहे हे आयोगापुढे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी सुनावणीसाठी हजर नाहीत तसेच त्यांनी त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ कोणताही लेखी युक्तिवाद आयोगाकडे कोणत्याही माध्यमाव्दारे सादर केलेला नाही, त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एकनाथ भाऊराव मराठे, औदुंबर निवास, मन्नालाल सराफ नगर, जुना जालना,

जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सब ईंजीनिअर महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. (ग्रामीण विभाग), तालुका जालना जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. जालना जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५३

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, : अपिलार्थी
रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना,
तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
जालना (उत्तर)

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक रोहयो, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदरचे अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती न दिल्याने त्यांनी आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील आन्वी, हिवरा, उज्जैनपुरी या गावामध्ये एफ. डी. ए. मध्ये झालेली कामे व मजुरांची यादी याच्या सत्यप्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत त्यांच्या कार्यालयातर्फे आन्वी, हिवरा, उज्जैनपुरी या गावामध्ये एफ. डी. ए. अंतर्गत कोणतीही कामे घेतली गेली नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक समजावी असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे कळविले व तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०५-०८-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ आवश्यक ती पोस्टाची पावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली आहे आणि अपिलार्थीचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाल्याचे

कबुलीपत्र पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.), जालना (उत्तर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक रोहयो, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५४

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. राजू भुजंगराव तारे, अपिलार्थी
मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, अंबड,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दिनांक १८-०६-२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, अंबड यांनी प्रत्यक्ष कामाच्या जायमोक्यावर हजर होऊन अपिलार्थीस संबंधित काम दाखविले, ते पाहून अपिलार्थीचे समाधान झाले, तसेच त्यांनी संबंधित कामाचे रेकॉर्ड अपिलार्थीस समक्ष दाखविल्यामुळे त्यांच्या तक्रारीचे निरासन झाले आहे व आता त्यांना सदील रेकॉर्डची आवश्यकता नाही. त्यामुळे आयोगाला अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन प्रकरण निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या स्वरुपात प्राप्त झाली त्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे व अपिलार्थीने खुद्द राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक १८-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचे विचाराधीन अपील प्रकरण निकाली काढण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २०-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजू भुजंगराव तारे, मु. पो. बाळानगर, पाचोड रोड, अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५५

निर्णय दिनांक २०-०६-२००९

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, : अपिलार्थी

लोकप्रश्न कार्यालय, रहेमान गंज, रामचंद्र आर्य चौक,

जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, अंबड,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व माहिती देता येत नाही म्हणून दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००७ ते ०३-०५-२००७ या कालावधीमध्ये त्यांनी घेतलेल्या २७८.१७ कोटी रुपयाच्या एल. ओ. सी. वाटपाबाबतची माहिती मागितली होती. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित कनिष्ठ अभियंत्याचे नाव, कामाचे नाव, मजुराची उपस्थिती व मजूर हे स्थानिक होते की तहसीलदार कार्यालयाने नोंदणीकृत केलेले या मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७,४९० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७,४६० /- इतके चलनाव्दारे बँकेत भरण्याचे सूचित केले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील कामाच्या हजेरीपत्रकाच्या प्रती द्याव्या

लागतील असे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७,४९० /- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तसेच त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या मूळ विभागामध्ये रुपये २७८.१७ कोटीची एल. ओ. सी. प्राप्त झाली नाही त्यामुळे ते अपिलार्थीस या एल. ओ. सी. चे विवरण देऊ शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मजुराच्या हजेरीपत्रकाच्या प्रतीची मागणी केलेली नव्हती. त्यांनी उपस्थित मजुराच्या हजेरीपटावरील उपस्थिती किती होती ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहितीपोटीचे कळविलेले शुल्क निश्चितपणे अवाजवी आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये त्यांनी या शुल्काचा तपशील, जो त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदी प्रमाणे देणे अनिवार्य आहे, तो देखील दिलेला नाही. त्यामुळे त्यांचे दिनांक २३-०७-२००७ रोजीचे पत्र पूर्णतः अवैध ठरत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज नीट न वाचता अपिलार्थीस अवाजवी शुल्क कळवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक

कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांचे वर्तन आयोगास अत्यंत बेपवाईचे आढळले आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००७ रोजी प्रथम अपिलाची सुनावणी न घेता अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २७,४६० /- इतके जन माहिती अधिकारी कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २७,४९० /- रुपये इतके शुल्क कळविले असता जन अपिलीय अधिकारी यांनी २७,४६० /- इतक्या रकमेचा भरणा करण्याचे सुचित केले. शुल्काच्या रकमेमधील हा फरक कसा आला हे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास सांगू शकत नाहीत. यावरुन असे अनुमान काढण्यात येत आहे की, कार्यकारी अभियंता, लघुपाटबधारे (स्थानिक स्तर ), जालना यांच्या कार्यालयातील कामकाज अत्यंत बेपर्वाईने चालले आहे. या प्रकरणी जर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी घेऊन यासंदर्भात निर्णय दिला असता तर कदाचित अपिलार्थीला राज्य माहिती आयोगाकडे धाव घेण्याची गरज पडली नसती. त्यामुळे मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थनिक स्तर), पुणे यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, लोकप्रश्न कार्यालय, रहेमान गंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), प्रादेशिक कार्यालय, बंगला नं. १२, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६५८
निर्णय दिनांक २२-०६-२००९

१. श्री. शिवाजी लिंबाजी क्षिरसागर, : अपिलार्थी
मु.पो.पांगरा,ता.पैठण, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,पैठण,
जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून नोटीस तामिलीची नक्कल व सुनावणी संचिका या वाढीव माहितीची मागणी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गट नं.११७ मधील वैयक्तिक रस्ता मोकळा करण्यासाठी पाठविलेला पोलीस बंदोबस्त प्रकरण न्यायकक्षेत असतानादेखील व अपिलार्थीचे म्हणणे ऐकून न घेता, कोणत्या कलमान्वये,रस्ता खुला करुन देण्याचे आदेश दिले आहेत- याबाबत माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन घेऊन जाण्याचे सूचित केले व तदनंतर दि. २६.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. त्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०२.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले व या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण संचिका त्यांनी पाहिली व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी हस्तगत केल्या. या पहाणीमध्ये त्यांना असे आढळून आले की, जन माहिती अधिकारी यांनी ज्या कलमान्वये/नियमान्वये ही कार्यवाही केली होती, त्या कलमाच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होत्या परंतु त्या न मिळाल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संचिकांची पहाणी करुन व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून घेतल्या. या पहाणीमध्ये त्यांना असेही आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी फक्त प्रत्यक्ष जागेवर पंचनामा करुन हा रस्ता मोकळा करुन दिलेला आहे. या निर्णयावर त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे अपील केले

असता, या जन माहिती अधिकारी यांच्या रस्ता मोकळा करुन देण्याच्या कार्यवाहीस आता स्थगिती दिली असल्याने, त्यांच्या मूळ गाऱ्हाण्याचा निपटारा झाला आहे व त्यांना आता माहितीची आवश्यकता नाही.

अपिलार्थी यांचा वरील युक्तिवाद हा स्वयंस्पष्ट असून अपिलार्थीस आता कोणत्याही माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यकता राहिलेली नसल्याने व त्यांचा आयोगाकडे अर्ज करण्याचा मूळ हेतू साध्य झाला असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी लिंबाजी क्षिरसागर,मु.पो.पांगरा, ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६३
निर्णय दिनांक २२-०६-२००९

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव (रेणूकाई) ता.भोकरदन,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,
जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील गटनिहाय व बाबनिहाय खर्चाच्या व पतमर्यादेच्या वितरणाबाबतची तपशीलवार माहिती मागविली असता,संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास त्यांच्याकडील दि. ०५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित करुनही त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे रोजगार हमी योजनेअंतर्गत पतमर्यादा वितरणाबाबत काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०५.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना दि. ०९.०१.२००८ पर्यंत माहिती सादर करण्याचे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली.तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००७ रोजीच्या ज्या अर्जाद्वारे माहितीची मागणी केली होती, त्या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असून याबाबतचा पुरावा म्हणून त्यांनी रजिस्टर्ड पोष्टाची पावती क्र.२९५१ आयोगाकडे सादर (दि. अस्पष्ट आहे) केली असून अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने व तसेच जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाने नियुक्त केलेले माहिती अधिकारी असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी लागणारा अपेक्षित कालावधी याचा विचार करता जन माहिती अधिकारी

यांना आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०१.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद या पदावर दि. ०१.११.२००७ ते दि. ३०.११.२००७ या कालावधीमध्ये कार्यरत असलेले) यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३) आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,पिंपळगाव (रेणूकाई) ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,जालना यांना या निकाल- पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकाल- पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ६६४/०८,६६५/०८,६६६/०८ व ६६७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६४,६६५,६६६ व ६६७
निर्णय दिनांक २२-०५-२००९

१. श्री. यादवराव मुकुंदराव नेम्मानीवार, किनवट, जि.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपील क्र.६६४/०८<br>जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका वनक्षेत्र अधिकारी<br>(रोहयो), किनवट, जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकाससं),<br>किनवट, जि.नांदेड | : प्रतिवादी |
| २. | अपील क्र.६६५/०८<br>जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका वनक्षेत्र अधिकारी,<br>किनवट, जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकाससं),<br>किनवट, जि.नांदेड | |
| ३. | अपील क्र.६६६/०८<br>जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका वनक्षेत्र अधिकारी,मांडवी,<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकाससं),<br>किनवट, जि.नांदेड | |
| ४. | अपील क्र.६६७/०८<br>जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका वनक्षेत्र अधिकारी,माहूर<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकाससं),<br>किनवट, जि.नांदेड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने वन विभागाच्या चार वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या एकाच प्रकारच्या माहितीसंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०३.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र अपिले (अपील क्र.६६४/०८,६६५/०८,६६६/०८ व ६६७/०८) आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या चारही द्वितीय अपील अर्जाच्या

संदर्भातील चार वेगवेगळया मूळ माहितीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने एकच माहिती सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असल्याने, या अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या चारही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीनंतरही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या चार प्रकरणांपैकी अपील क्र.६६५/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने दि. ११.१०.२००७ रोजीच्या एका,दि. ०१.१२.२००७ रोजीच्या तीन स्वतंत्र मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०७ ते २००७-०८ या कालावधीतील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत केलेल्या वेगवेगळया कामासंदर्भात एकूण २२ वेगवेगळया मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास वन क्षेत्र अधिकारी,किनवट (रोहयो) यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. वनक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी दि. ०१.१२.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.५२२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व या शुल्काचा अपिलार्थीने कोषागारात भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती पुरविली नाही व त्यांच्या दि. ०७.११.२००७ व दि. ०१.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठांच्याकडे अनुदानाची मागणी करण्यात आली आहे, असे कळवून अपिलार्थीस अनुदान प्राप्त होताच माहिती पुरविण्यात येईल, असे कळविले आहे. वनक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही व वन क्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २५.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी शुल्क रु.२५,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २१.०१.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. यापैकी अपील क्र. ६६४/०८ च्या संदर्भात जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुधारित माहिती वन क्षेत्र अधिकारी (रोहयो),किनवट यांच्याकडून विनामूल्य प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व उर्वरित तीनही प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे चार स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, चारही प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, विचाराधीन चारही अपील प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्यासंबंधी सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. त्यांच्या अपील क्र.६६५/०८ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे, त्यांनी रु.५२२/- इतक्या शुल्काचा शासकीय कोषागारात भरणा करुनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून देण्यासाठी अनुदान उपलब्ध नाही, या कारणास्तव माहिती देण्याचे नाकारले आहे. अपील क्र.६६७/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रु.२५०००/- इतक्या रकमेचा भरणा करण्याचे सूचित केले असून या पत्रामध्ये त्यांनी शुल्काचा तपशील - कोणत्या शीर्षाखाली,कोठे जमा करावयाचे याचा कोणताही उल्लेख केला नाही. अपिलार्थीच्या अपील क्र. ६६४ व ६६६ च्या संदर्भात या दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे आयोगास अवगत केले. या प्रमाणे चारही प्रकरणात माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी, अशीही विनंती अपिलार्थीने आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगास केली.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सर्व साधारणतः असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस ते आता पंधरा दिवसांच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देतील. वनक्षेत्र अधिकारी (रोहयो),किनवट यांनी अपिलार्थीस एका पृष्ठाची माहिती दिल्याचे कबूल केले. वनक्षेत्र अधिकारी,किनवट यांनी अपिलार्थीस एका पृष्टाच्या प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशाची प्रत अपिलार्थीस दिल्याचे कबूल केले व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे अनुदान उपलब्ध नसल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, उपरोक्त चार प्रकरणांत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात काही प्रकरणी विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही, तर उर्वरित प्रकरणात अपिलार्थीस विहित मुदतीत जो प्रतिसाद दिला आहे, तो पूर्णतः चुकीचा दिला आहे. एका प्रकरणी तर अपिलार्थीने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.५२२/- इतक्या रकमेचा भरणा करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. वनक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अपिलार्थीस फक्त रु.२५०००/- भरण्याचे सूचित केले आहे. त्यांच्या दि. २५.१२.२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावा लागणारा आवश्यक तो तपशील त्यांनी पुरविलेला नाही. थोडक्यात, या चारही अपील प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जो काही थोडाबहुत प्रतिसाद दिला आहे, तो अवैध व चुकीचा सिध्द होत आहे. आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ (ए) या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने, "सदर कामाचे कलम १७ प्रमाणे सामाजिक अंकेक्षणाची पुढील तारीख व ठिकाण कळविण्यात यावे"- ही माहिती अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध/प्रचलित असल्यासच मिळू शकेल. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. हे पाहता, सर्व जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, सर्व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूपुरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास यासंदर्भात सादर करण्यात आलेल्या संबंधित माहितीची कार्यवाहीची कागदपत्रे पाहता, अपिलार्थी यांच्या या युक्तिवादामध्ये तथ्यांश आढळून येत आहे. वनक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५२२/- इतके चलनाद्वारे सादर केला असतानाही केवळ त्यांच्या कार्यालयास झेरॉक्स प्रती करण्याकरिता अनुदान उपलब्ध नाही, हे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती दिली नाही. वन क्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा योग्य तो तपशील कळविला नाही. मात्र अपिलार्थीस रु.२५,०००/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले व उर्वरित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही, हे पाहता तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांना आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार नाही, हे पाहता अपिलार्थीच्या युक्तिवादातील तथ्यांश लक्षात घेऊन यासंदर्भात आयोगाने असा निष्कर्ष काढला आहे की, सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे सिध्द केला आहे. सबब मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांनी या प्रकरणांशी संबंधित चारही जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची चारही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र.६६७/०८,६६५/०८,६६६/०८ व ६६७/०/८ मान्य करण्यात येत आहे.

२) उपरोक्त चारही प्रकरणांशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीकडून त्यांनी स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.५२२/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

४) मुख्य वनसंरक्षक,औरंगाबाद यांना उपरोक्त चारही प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. यादवराव मुकुंदराव नेम्मानीवार,वेलमापूरा, वॉर्ड क्र.३,किनवट, जि.नांदेड-४३१८०४

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका वनक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका वनक्षेत्र अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन माहिती अधिकारी तथा तालुका वनक्षेत्र अधिकारी,मांडवी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. जन माहिती अधिकारी तथा तालुका वनक्षेत्र अधिकारी,माहूर जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

६. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकाससं), किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. मुख्य वनसंरक्षक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७६९/०८ व ७७०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७६९ व ७७०
निर्णय दिनांक २२-०६-२००९

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

१ अपील क्र.७६९/०८ : प्रतिवादी
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पुणे-१.

२ अपील क्र.७७०/०८ :
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,
पुणे-१.

३ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले अपील क्र.७६९/०८ व दि.०७.०४.२००८ रोजी नोंदविलेले अपील क्र.७७०/०८ अशी दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. ७६९/०८ :**

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी सुनावणीचे पत्र दिल्यानंतर त्यांनी द्वितीय अपील अर्ज

करेपर्यंत कोणतेही पत्र न दिल्याने व तसेच या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७३४/- रकमेचा भरणा केल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश द्यावेत, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि. ०१.०४.२००२ ते दि. ०६.१२.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७३४/- इतके त्यांच्या कार्याल्यास भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने हे शुल्क दि. २१.०१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची पावती क्र. ४४६४१७ द्वारे भरले. तथापि शुल्काचा भरणा करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीचे आदेश पारित केले नाहीत व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केले होते, असेही आयोगाकडील या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले स्वतंत्र द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २००५ मधील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले आहे. मात्र शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क कळविल्याचा दिनांक व अपिलार्थीने सदरचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्याचा दिनांक लक्षात घेऊन अपिलार्थीस या प्रकरणी दि.३१.०१.२००८ रोजी सशुल्क माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०४.२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.०२.२००८ रोजी अनुक्रमे द्वितीय अपील व प्रथम अपील अर्ज करेपर्यंतही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थी कडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.७३४/- इतके त्यांना परत करावे.

अधीक्षक अभियंता यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल अधीक्षक अभियंता यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**<u>अपील क्र.७७०/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत न कळविल्याने त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०२.२००८ रोजी प्रस्तावित केलेल्या सुनावणीचे पत्र त्यांना दि. २१.०२.२००८ रोजी प्राप्त झाले असल्याने ते या सुनावणीसाठी हजर राहू शकले नाहीत. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००७ ते दि. ०६.१२.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी अधिनियमातील कलम ७ च्या पोटकलम ९ प्रमाणे विशिष्ट प्रकारच्या माहितीची मागणी केल्यास त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यात ज्या नमुन्यात माहिती ठेवली जाते, ती देण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल व तदनंतर दि. ०४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.११८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. शुल्काचा भरणा करण्याचे सदर पत्र अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाल्याने अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही.त्यामुळे अपिलार्थीने दि. २१.०१.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवून माहिती अधिकाऱ्यास माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय

अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तसेच अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल या सर्वांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त दोनही अपिले क्र.७६९/०८ व ७७०/०८ अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र.७६९/०८ व ७७०/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२) उपरोक्त दोनही प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे यांना उपरोक्त दोनही प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल,ए-५१,नाथनगर,सिंधी कॉलनीच्या मागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे-१

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६८

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. संजय मरिबा गायकवाड, : अपिलार्थी
मु. पो. मालेवाडी, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मालेवाडी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३०-०५-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि निकाल अनिर्णयीत ठेवला असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, "मौजे मालेवाडी ग्रामपंचायतीतर्फे इंदिरा आवास योजनेचा लाभ दिल्या गेलेल्या लाभार्थ्यांची नांवे, जात, डी. आर. डी. नंबर, घराचे ई. स. नुसार एकूण घरकुले, पूर्ण केलेली घरकुले व अपुरे घरकूल, पूर्ण केलेल्या घरकुलाचे फोटो, सन २००७-०८ मध्ये इंदिरा आवास योजनेतून किती जणांचे घरकुलाचे प्रस्ताव प्रतीक्षा यादीनुसार दाखल केले त्यांची नावे, प्रतिक्षा यादीतील किती जणांना डावलले त्यांची नांवे व अनुक्रमांक व ते कशाच्या आधारे डावलले", ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००८ पर्यंत माहिती देण्याची हमी दिली आहे, असे अपिलार्थीस कळवून व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दिनांक ०२-०६-२००८ पर्यंत मुदत दिली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही पूर्वसूचना देऊनही आयोगासमोर त्यांची बाजू मांडण्यासाठी उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधीत घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील

तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विशिष्ट अशा स्वरुपाची व विशिष्ट कालावधीशी संबंधित आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती किंवा स्वरुप एवढे मोठे नव्हते की, ही माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती अशातली कोणतीही बाब संभवत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही समर्थन असू शकणार नाही हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या संदर्भातील तरतुदीची अंमलबजावणी करण्याचे त्यांचे कर्तव्य चोखपणे पार पाडले नाही. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०५-२००८ रोजी दिलेले पत्र सर्वथा अवैध व गैर आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन अथवा पत्रव्यवहाराव्दारे अपिलार्थीस कशी माहिती देता येईल याकडे जन अपिलीय अधिकारी यांनी जास्त लक्ष देणे गरजेचे होते. तथापि त्यांनी केवळ जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००८ पर्यंत माहिती देण्याची हमी दिल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याची मुदत दिनांक ०२-०६-२००८ पर्यंत वाढवून दिली. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता या तरतुदींच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाहीकरिता या कायद्यामध्ये निश्चित असा**

**कालावधी विहित केला गेला आहे. या कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाला नाहीत.** त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले दिनांक ३०-०५-२००८ रोजीचे पत्र केवळ अवैधच आहे असे नव्हे तर ते कोणत्याही प्रकारे कायदेशीर असल्याचेही सिध्द होत नाही. सबब या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी

त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या अशा प्रकाराच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाकडे या प्रकरणी अक्षम्य दुर्लक्ष करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय मरिबा गायकवाड, मु. पो. मालेवाडी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मालेवाडी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६६९

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. बालासाहेब गंगाधर काळे, : अपिलार्थी
शांतीनगर, दर्गा रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,
परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही आदेश प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ जिल्हा रुग्णालय, परभणी मधील संबंधित आवक लिपिकाने अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या स्थळप्रतीवर सही केली आहे. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने या

माहितीसाठीच्या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी सर्व गैरहजर आहेत.

अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले आहे. तथापि या संदर्भातील आवश्यक तो वैध पुरावा त्यांनी या अर्जासोबत जोडल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक परभणी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांनी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालासाहेब गंगाधर काळे, शांतीनगर, दर्गा रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७०

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ सौ. करकडे अंजली निवृत्तीराव, : अपिलार्थी
" करकडे निवास ", जाधव गॅस एजन्सीजवळ, जिंतूर रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, नूतन प्राथमिक शिक्षणालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ मुद्दयाव्दारे माहिती मागविली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त मुद्दा क्रमांक दोनची माहिती प्राप्त झाली. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांची अनुसूचित जातीच्या प्रवर्गात निवड झाली होती. तथापि एक महिन्यानंतर मूळ आदेशात खाडाखोड करुन त्यांना पदावनत केले. या प्रकरणी त्या संबंधित प्राधिकरणाच्या सेवेत कार्यरत असतांना त्यांनी संस्थेची परवानगी घेऊन एम. ए. बी. एड. केले तथापि ही नोंद संस्थेतर्फे घेण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मागितलेली माहिती दिली नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले

असता त्यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेविषयी, सन १९८५ ते २००१ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण १७ मुद्दयाव्दारे विचारली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर परत दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे २३ रुपये इतके अतिरिक्त शुल्क भरण्याचे सूचित केले. व तदनंतर अपिलार्थीने दिनांक २१-०१-२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर दिनांक १६-०२-२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांनी कोणताही निर्णय पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी दिनांक १६-०२-२००८ रोजी पूर्ण माहिती दिल्याचा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या मते त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०२-२००८ रोजी संपूर्ण माहिती दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस त्यांनी संपूर्ण माहिती दिली हा दावा आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या शिक्षक निवडीच्या छायांकीत प्रतीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती संस्थेशी संबंधित असल्याने त्या अपिलार्थीस पुरवू शकल्या नाहीत असे त्यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे ही माहिती मागितली होती ते प्राधिकरण व शिक्षण संस्था हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने व तसेच यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी संस्थेशी वा इतर कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती देण्यासंदर्भात संबंधित मुख्याध्यापिकेने अधिनियमातील कलम ६ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत सर्व संबंधितांकडे पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या इतर प्राधिकरणाशी संबंधित असलेली माहिती आता त्यांना संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस द्यावी लागेल, हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार या भागाची तसेच या निर्णयामध्ये पुढे नमूद केलेल्या भागांची माहिती हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ८ व्दारे अपिलार्थी या १९९१ ला एम. ए. उत्तीर्ण झाल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना कळविले असल्यास त्याच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या शैक्षणिक पात्रतेची कोणतीही बाब शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना कळविलेली नसल्याचे

आयोगास अवगत केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भात शिक्षणाधिका-याकडे कोणतीही माहिती पुरविली नसल्याची माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात असे अभिप्राय आहेत की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्याद्वारे त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसलेल्या कार्यवाहीबाबत खुलासा मागितला आहे असे दिसून येते. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे त्यांच्या या मुद्दयासंदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीची तपासणी करावयाची मागणी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत वेगळ्या अर्जाव्दारे करावी व जेणेकरुन त्यांना २००१ मध्ये संबंधित संस्थेने शिक्षकांच्या ज्येष्ठता यादी १९९९ चा दुरुपयोग केला आहे किंवा कसे हे ज्ञात होईल. खुलासेवजा माहिती कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार देय होत नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नाही. याच कारणास्तव अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ व १४ या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ११ व्दारे अपिलार्थीच्या दोन वार्षिक वेतनवाढी कोणत्या नियमाने थाबविल्या त्या शासकीय नियमाची प्रत मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या संस्थेने अपिलार्थीवर केलेली कारवाई ही शाळा समिती कोडप्रमाणे केलेली आहे. त्यामुळे या मुद्दयावर त्यांनी शाळा समितीच्या या मुद्यासंदर्भातील समितीच्या अधिकाराशी संबंधित तरतूदी दर्शविणा-या पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक १३ व्दारे मुख्याध्यापक, संत जनाबाई प्राथमिक विद्यालय, गंगाखेड यांच्या दिनांक १८-०८-२००७ व दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून केलेल्या कार्यवाहीच्या छायांकीत प्रतीची माहिती मागविली आहे. यासंदर्भात असे सुचविण्यात येते की, मुख्याध्यापक, संत जनाबाई प्राथमिक विद्यालय, गंगाखेड

यांच्याकडे अपिलार्थीने संदर्भित केलेल्या पत्राच्या संदर्भिय उत्तराच्या प्रती तसेच इतर प्राधिकरणाकडे केलेल्या इतर पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १५ व्दारे त्रयस्थ पक्ष श्रीमती मठपती यांच्या जातीच्या दाखल्याची व जातीच्या वैधता प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली आहे. ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १५ व्दारे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये कारण त्रयस्थ पक्षाला त्यांनी केलेल्या शासकीय सेवेबद्दल प्राप्त होणारे वेतन व त्यांच्या पदाच्या अनुषंगाने मिळणारे इतर अनुषंगिक फायदे हे शासनाकडून प्राप्त होणा-या निधीतून दिले जातात. त्यामुळे ती माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे व ती अपिलार्थीस प्राप्त करुन घेण्याचा हक्क आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक १६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या स्वत:विषयी विचारली आहे. अपिलार्थी यांना भारत सरकारची कथित शिष्यवृत्ती प्राप्त झाली त्यावेळी त्या याच शाळेत कार्यरत होत्या. या परिच्छेदातील अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात आयोगाने वर केलेले भाष्य तंतोतंत लागू होते. त्यामुळे ही माहिती सुध्दा जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस द्यावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस प्रत्यक्षत: पुरविण्यात आलेली माहिती याचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथ:करण व विवेचन पाहता आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदामध्ये विवेचन केल्यानुसार या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने माहितीपोटी सर्व शुल्क भरल्यानंतरही अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, यापूर्वी

अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये  १५४ इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी जर संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, यांनी वेळीच घेतली असती तर अपिलार्थीस कदाचित राज्य माहिती आयोगाकडे येण्याची गरज पडली नसती. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, (श्री. खानवे, सध्या शिक्षणाधिकारी निरंतर, अहमदनगर या पदावर कार्यरत) यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई व बेजबाबदारपणाची शिक्षण संचालक, पुणे यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी आणि याच कालावधीत अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये १५४ इतके त्यांना परत करावे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. करकडे अंजली निवृत्तीराव, " करकडे निवास ", जाधव गॅस एजन्सीजवळ, जिंतूर रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नूतन प्राथमिक शिक्षणालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्टिल जवळ, पूणे - १० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७१

निर्णय दिनांक २३-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धाराजी आबाजी भुसारे,<br>दै. लोकपत्र कार्यालय, गाळा क्र. ३३, स्टेडियम कॉम्पलेक्स,<br>स्टेशन रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती दिली नाही व मुदतीनंतर दिलेली माहिती ही अर्धवट स्वरुपात असल्याने त्यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००८ रोजी जन

माहिती अधिकारी यांना सात दिवसाच्या आत माहिती देण्याचा निर्णय दिला. तरीही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विना दिनांकाच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००७ रोजी प्राप्त झाला. यावरुन अपिलार्थीने हा अर्ज दिनांक १२-१२-२००७ रोजी केल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत प्रशिक्षण देणा-या संस्थाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जिल्ह्यात सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी ज्या संस्थांनी अर्ज केले अशा संस्थेची नांवे, यापैकी ज्या संस्थांना प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता देण्यात आली अशा संस्थांची नांवे, देण्यात आलेली विद्यार्थी संख्या, संस्थेची प्रशिक्षणासाठी निवड कोणत्या निकषावर केली त्याचा तपशील, प्रशिक्षण देण्यासाठी कोणती संस्था अर्ज करु शकते, यासाठी कोणते नियम व अटी आहेत, ते नियम व अटी प्रशिक्षण देणा-या संस्थांनी पूर्ण केल्या आहेत का याची सत्यप्रत व प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेकडून अर्ज मागविण्यात आले होते त्या संदर्भात कोणत्या प्रसिध्दी माध्यमांचा उपयोग केला होता, यासंदर्भात जाहिराती, बातम्या प्रकाशित झाल्याचा दिनांक - या मुद्दयाचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस यासंदर्भात माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २५-०४-२००८ रोजी निर्णय

देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या विहित कालावधीनंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली व प्राप्त झालेली माहिती ही अर्धवट आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा दुरुपयोग केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली असून हे पत्र त्यांनी दिनांक ०९-०१-२००८ रोजी पोस्टाने पाठविले. अपिलार्थीस याहून जास्त तपशीलवार माहिती आवश्यक असेल तर ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, जे त्यांनी दिनांक ०९-०१-२००८ रोजी पोस्टात टाकले, त्याव्दारे प्रतिसाद दिला आहे. हा प्रतिसाद अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे. केवळ अपिलार्थीस हे पत्र तीन दिवसानंतर प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

विलंबाने माहिती दिली असे उपलब्ध पुराव्यावरुन म्हणता येणार नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " क " व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, या संस्थांची प्रशिक्षणासाठी निवड करतांना जे निकष वापरण्यात आले होते त्या निकषाचा तपशील, अशी मोघम स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देतांना सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंमलबजावणी पुस्तिका या पुस्तिकेचा संदर्भ दिला असून अपिलार्थीस माहिती देतांना या पुस्तिकेच्या पृष्ठ क्रमांक १९ वरील अनुक्रमांक ३७ अशी माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या मुद्दयावर त्यांना माहिती देतांना संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या यासंदर्भात अपिलार्थीच्या अपेक्षित माहितीशी संबंधित आदेशाच्या/परिपत्रकाच्या/पुस्तिकेतील पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती पुरविल्यास अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेला तपशील प्राप्त होऊ शकेल.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " इ " व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रशिक्षण संस्थेकडून अर्ज मागवितांना कोणत्या प्रसिध्दी माध्यमाचा उपयोग केला गेला यासंदर्भात माहिती मागविली होती. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने असे सांगितले की, की त्यांनी या प्रकरणी योजनांची प्रसिध्दी देतांना कोणत्याही प्रसिध्दी माध्यमांचा उपयोग केला नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्दयावरील माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संस्थेची निवड करतांना कोणत्याही प्रसिध्दी माध्यमाचा उपयोग केला नव्हता असे कळवावे लागेल. जेणेकरुन अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी आता अपिलार्थी यांना उर्वरित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या

आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसले तरी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांच्या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांनी व प्रकरणाशी संबंधितांनी केलेले नाही. ही बाब येथे स्पष्टपणे सिध्द होत आहे. अशा प्रकारच्या कृतीद्वारे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, जिल्हाधिकारी, परभणी यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित सर्व माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धाराजी आबाजी भुसारे, दै. लोकपत्र कार्यालय, गाळा क्र. ३३, स्टेडियम

कॉम्पलेक्स, स्टेशन रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७२

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. माधव भुजंग दामरे, : अपिलार्थी
मु. पो. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपजिल्हाधिकारी (भूसुधार),
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. पी. आर. शेळके

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने विचाराधीन अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील खारीज केल्यामुळे केले असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदोष माहिती दिनांक १३-०२-२००८ दिल्याचेही नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे -अपिलार्थीने दिनांक २९-०६-२००१ रोजी अपील रुपाने अर्ज देऊनही श्री. पी. आर. शेळके यांनी जादा चार्ज काळात त्यांच्या कुळाच्या जमिनीची जी परवानगी दिली आहे ती महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार दिली आहे का - ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०२-२००८ रोजी त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देतांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलासा केला व या खुलाशामध्ये त्यांनी असे नमूद केले की, अपिलार्थीच्या संदर्भित केलेल्या परवानगीमुळे जर कोणाच्या हितसंबंधास अथवा हक्कात काही अडथळा झाला असेल तर यामध्ये न्यायालयीन प्रक्रियेव्दारे या परवानगी आदेशासंदर्भास अपिलार्थीस अपील करता येईल. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेच्या बाहेर असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्ष श्री. पी. आर. शेळके यांनी जमिनीच्या वहिवाटीच्या संदर्भात चुकीचे आदेश पारित केले आहेत ते आदेश योग्य आहेत किंवा कसे याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी नाही. अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही माहितीची मागणी केल्यास त्यांच्याकडे ती माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, त्यांनी का घेतला, तो योग्य आहे किंवा अयोग्य अशा प्रकारच्या माहितीची मागणी ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती हीच अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीच्या बाहेरची असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माधव भुजंग दामरे, मु. पो. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७३

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. सिरसाट प्रभाकर तुळशीराम, : अपिलार्थी
मु. सोनखेड, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ ,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी,
जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी निर्णय देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही व दिनांक २३-०४-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती न देता ती अपिलार्थीस पूर्वीच देण्यात आली असल्याचे कळविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सोनपेठ येथील घाऊक व किरकोळ केरोसीन विक्रेते यांच्या दोनही मूळ परवान्याच्या नकला, परवाने देण्यापूर्वी काढलेले जाहीर प्रगटन, जाहिर प्रगटनावरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या नकला, अर्जदाराने पाठविलेले मुलाखत पत्र व निवड झालेल्या केरोसीन विक्रेत्यांची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देता मुदत संपल्यानंतर दिनांक ०७-०२-२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वीस वर्षापुर्वीची असल्याने त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी तहसीलदार, गंगाखेड यांना अर्जदारास सात दिवसाच्या आत माहिती द्यावी असे सूचित केले. तथापि यानंतर एक महिन्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. थोडक्यात अपिलार्थीस माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही तहसीलदार, गंगाखेड यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

तहसीलदार, सोनपेठ यांनी असा युक्तिवाद केला की, सोनपेठ हा नवीन निर्माण झालेला तालुका असून हाच तालुका पूर्वी गंगाखेड या तालुक्यामध्ये समाविष्ट होता. सोनपेठ या तालुक्याची निर्मिती दिनांक ०१-०६-१९९९ ला झाली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वीस वर्षापूर्वीची जुनी असल्याने व त्यावेळी सोनपेठ तालुका अस्तित्वात नसल्याने ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण दिनांक ०१-०६-१९९९ रोजी अस्तित्वात आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही हे प्राधिकरण अस्तित्वात येण्यापूर्वीची आहे. त्यामुळे तहसीलदार, गंगाखेड व तहसीलदार, सोनपेठ या दोघांनीही एकमेकांशी समन्वय साधून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेख्यात उपलब्ध आहे किंवा कसे याचा शोध घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे तहसीलदार, गंगाखेड व तहसीलदार, सोनपेठ यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहितीचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपुष्टात आला असल्याने ती नष्ट केली असल्यास, अपिलार्थीस योग्य त्या पुरावासह तसे संबंधीत तहसिलदाराने त्यांना कळवावे. अन्यथा ही माहिती ज्या कर्मचा-या-कडून गहाळ झाली असेल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	तहसीलदार, गंगाखेड व तहसीलदार, सोनपेठ यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील अभिलेख्यांचा पुनश्च शोध घेऊन ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध होईल असे पहावे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सिरसाट प्रभाकर तुळशीराम, मु. सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तहसीलदार, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७४

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. तुकाराम भिमराव सुरनर, : अपिलार्थी
मु. तावजीवाडी, ग्रामपंचायत गिरधरवाडी,
पो. बनवस, तालुका पालम, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गिरधरवाडी,
तालुका पालम, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,
तालुका पालम, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : सूकुमारबाई ज्ञानोबा सुरनर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील तांडावस्ती सुधार योजनेची तावजीवाडी व लोभानाईक

तांडा येथील कामाच्या अंदाजपत्रकाच्या, मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्स प्रती, अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स प्रती, मार्च २००६ व २००७ पासून ग्रामसभेची प्रोसिडींग झेरॉक्स इत्यादीसंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये अपिलार्थीने ज्या कालावधीमधील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपेक्षिली आहे त्या कालावधीचा उल्लेख केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही अपिलार्थीच्या या अपील अर्जावर या प्रकरणी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिड वर्ष इतका कालावधी ओलांडून गेल्यानंतरही माहिती न मिळाल्याने त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई आयोगाने करावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या प्रथम व अपील अर्जावर त्यांच्या डाव्या हाताचा अंगठा केला आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपिलार्थीस कशी समजली अथवा त्यांनी ती कशी वाचली असे विचारले असता त्यांच्या सहका-यामार्फत ही माहिती अपिलार्थीने अवगत करुन घेतली असल्याचे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे अशा प्रकारे मोठी व्याप्ती असलेली माहिती त्यांच्याकडे वारंवार मागत असतात व त्यांच्या नियमित कार्यामध्ये

वारंवार अडथळे आणत असतात. अपिलार्थीचा ही माहिती मागण्यामागे हेतू चांगला नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी आणली असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच त्यांना सशुल्क माहिती देण्याचा कालावधी देखील आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती आयोगासमोर हस्तांतरीत केली व अपिलार्थीने ही माहिती हस्तगत करुन घेतली व या मुद्दयावर त्यांचे भाष्य, ही माहिती त्यांच्या सहका-याने अवलोकन केल्यानंतर करता येईल, असे आयोगास सांगितले. हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे असे दिसून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. मात्र उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी लावलेल्या विलंबाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अर्जांवर त्यांनी अर्जदाराच्या माहिती मागण्याच्या हेतूचा कोणताही विचार न करता सतर्कतेने कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम भिमराव सुरनर, मु. तावजीवाडी, ग्रामपंचायत गिरधरवाडी, पो. बनवस, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गिरधरवाडी, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७६

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. राजेश्वर मारोतराव पोतदार, : अपिलार्थी
विठ्ठल मंदिरामागे, सहकार नगर, जुना पेडगांव रोड, परभणी,
तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग नायगांव (बा), जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
देगलूर विभाग, देगलूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी पोस्टाव्दारे माहिती मागितली असता व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क मनीऑर्डरने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले असता त्यांनी ती मनीऑर्डर स्वीकारण्यास नकार दिला व माहिती देण्याचे टाळले त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन

अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. आरळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड येथील कृषि पंपधारक वीज ग्राहकांची यादी, त्यांच्या करारनाम्याच्या प्रती व तपासणी अहवाल याच्या झेरॉक्स प्रती ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथमत: भरणा करावे व तदनंतर या शुल्काचा भरणा केल्याची पावती त्यांच्या कार्यालयास सादर करुन उपलब्ध असलेली माहिती घेऊन जावी. यानंतर अपिलार्थीने ८० रुपये इतक्या रकमेची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डर पाठविली. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ती मनीऑर्डर नाकारली. ती मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक २६-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या मनीऑर्डरचा स्वीकार केला नसल्याचा संदर्भ अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक २५-०३-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये दिसून येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शविली व अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मनीऑर्डरव्दारे प्राप्त होणारे शुल्क प्राप्त करुन घ्यावयाचे किंवा कसे याबाबत त्यांच्या मनात संभ्रम झाल्याने त्यांनी प्रथमतः ही मनीऑर्डर स्वीकारली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मनीऑर्डरने पाठविलेले माहितीपोटीचे शुल्क स्वीकारावे किंवा कसे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी संभ्रमित झाले व परिणामतः अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले ही वस्तुस्थिती आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र. आर. टी. आय. २००५/सी. आर. ३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ मधील अधिसूचना कलम क्रमांक ४ मध्ये आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने काय दराने शुल्काचा भरणा करावा व जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही अर्जदारास माहिती देतांना काय दराने शुल्क आकारणी करावी याचे विवेचन दिले आहे. यामध्ये अर्जदारास माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रतीचे शुल्क अर्जदाराकडून मनीऑर्डरने प्राप्त करुन घेणे त्यांना अनुज्ञेय असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीची मनीऑर्डर प्राप्त करुन घेऊन त्यानंतर अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविली असती तर ते अधिक उचित ठरले असते. तथापि आता जन माहिती अधिकारी अपिलार्थीस सात

दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्यास तयार असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वास्तविक पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सुनावणीच्या वेळी जर अपिलार्थीने मनीऑर्डरव्दारे पाठविलेले शुल्क स्वीकारण्याच्या अनुज्ञेयतेबाबत जन माहिती अधिकारी यांच्या मुद्यावर विचार केला असता तर कदाचित अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे येण्याची गरज पडली नसती व परिणामी अपिलार्थीस ती माहिती प्राप्त झाली असती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना अधिनियमातील तरतुदींचा योग्य प्रकारे अभ्यास केला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अपील अर्जावर सतर्कतेने निर्णय घ्यावा, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश्वर मारोतराव पोतदार, विठ्ठल मंदिरामागे, सहकार नगर, जुना पेडगांव रोड, परभणी, तालुका जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग नायगांव (बा), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, देगलूर विभाग, देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७७

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, : अपिलार्थी
विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून असे नमूद केले आहे की, त्यांना मूळात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने हे आदेश दिनांक २२-११-२००७ रोजी पोस्टात टाकले व ते अपिलार्थीस दिनांक ०६-१२-२००७ रोजी प्राप्त झाले. हे

आदेश घेऊन अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाले नसल्याचे कारणावरुन माहिती देण्याचे नाकारले. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०१-२००३ ते १७-०४-२००७ या कालावधीतील व्यापक स्वरुपाची माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २९-०७-२००७ रोजी निर्णय दिला. तो अपिलार्थीस दिनांक ०६-१२-२००७ रोजी प्राप्त झाला. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा पुनरुच्चार करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची खोटी माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले. ही माहिती खोटी असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या पाच मुद्दयावरील माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीस नेमके जन माहिती अधिकारी यांच्याकडून काय अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. यासंदर्भात अपिलार्थीने आज आयोगासमोर असा खुलासा केला की, माहिती अधिकार अधिनियम कायद्याचा प्रभावीपणे प्रसार होण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे प्रत्येक अर्जावर कार्यवाही करण्याचा कालावधी, दंड, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने तालुक्यावरील कार्यालयांना वेळोवेळी पाठविलेल्या पत्राच्या प्रती या मुद्दयाबाबत त्यांना माहिती अपेक्षित आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल जिल्हाधिकारी, परभणी यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने उपविभागीय अधिकारी, परभणी यांचे दिनांक २९-०७-२००७ रोजीचे आदेश दिनांक २२-११-२००७ रोजी पोस्टात टाकले. अपिलार्थीच्या या म्हणण्यामध्ये तथ्यांश असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची छाननी करता आयोगास आढळून आले आहे. अपिलीय अधिकारी यांचा निर्णय पोस्टात टाकण्यासाठी त्यांच्या कार्यालयाने लावलेल्या अंदाजे चार महिने इतक्या विलंबाचे निश्चित कोणतेही समर्थन

असू शकत नाही. सबब या प्रकरणी जबाबदार असणारे सर्व संबंधित कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, परभणी यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७८

निर्णय दिनांक २३-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मिलींद वसंतराव विटेकर,<br>दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,<br>जिल्हा परभणी | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ,<br>जिल्हा परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी,<br>जिल्हा परभणी | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०५-०२-२००८ रोजीच्या त्यांच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये या माहितीसाठी एकूण ९३० रुपये इतके शुल्क दिनांक ०१-०३-२००८ पूर्वी भरण्याचे सांगितले. हे पत्र प्राप्त झाल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०३-२००८ रोजी पैसे भरणा

करण्यासाठी गेले असता अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दिनांक ०१-०३-२००८ रोजी न केल्याने अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज निकाली काढला असल्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-०१-२००८ या कालावधीशी संबंधित एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्राने ९३० रुपये इतके शुल्क माहितीपोटी त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा करण्याकरिता अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०७-०३-२००८ रोजी गेले असता अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याची मुदत संपली असल्याने अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयागाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनाक १३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे योग्य राहील असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

परभणी

दिनांक २३-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलींद वसंतराव विटेकर, दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६७९

निर्णय दिनांक २३-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिलिंद वसंतराव विटेकर,<br>विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,<br>तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ,<br>तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांच्या अर्जावर विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे. तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी २५० रुपयाप्रमाणे शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००७ या कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कृषि विभागातील राबविण्यात आलेल्या ग्रामीण बीजोत्पादन कार्यक्रम, नाला सरळीकरणाची करण्यात आलेली कामे, रोजगार हमी योजनेतील कामे व सेंद्रीय शेती व कृषि सप्तकांचे कार्यक्रम या संदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली असल्याचे आढळून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे कळविले व ही माहिती अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने देण्याचे आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे केला. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हवी असल्याचा पुनरुच्चार केला. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या पदावर ते नुकतेच रुजू झाले असल्याचे आयोगास अवगत केले आणि १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती ही मूळात प्रमाणाबाहेर असून देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देण्याची तयारी दर्शविली. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी दिनांक ०४-०७-२००७ रोजी व्यक्तिशः उपस्थित राहिले असता " तुम्ही आता अपील केले आहे तेव्हा आता अपिलाचा जो काय निर्णय होईल त्याप्रमाणे माहिती देऊ असे अपिलार्थीस तोंडी सांगितले." याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १४-०५-२००७ रोजी खरोखरच तयार होती किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. एवढे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे आजच्या सुनावणीमध्ये आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**परभणी**
**दिनांक २३-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८०

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, : अपिलार्थी
विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये केलेल्या अर्जातील माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते गेले असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर दिनांक ३०-०४-२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी निर्णय झाला नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंचायत समिती कार्यक्षेत्रातील काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मोठ्या प्रमाणात होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथमतः व तदनंतर दिनांक ०४-०३-२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती देऊ केली व उर्वरित माहितीपोटीचे शुल्क रुपये २८८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या २८८ रुपयांपैकी १४४ रुपये इतक्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात १०० /- रुपये इतके शुल्क होते. तथापि ही माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले व अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीस हा निर्णय दिनांक २४-०५-२००८ रोजी कळविला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४, ५ व ८ च्या व्यतिरिक्त उर्वरित सर्व माहिती त्यांना मिळाल्याचे मान्य केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणात ज्या प्रमाणात शुल्काचा भरणा केला त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या अपील सुनावणीच्या वेळी असे निष्पन्न झाले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ४, ५ व ८ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली गेली नाही जी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आता आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीस त्यांनी आजच्या सुनावणीमध्ये त्यांना त्यांच्या मुद्दा कमांक ३ द्वारे त्यांनी माहिती मागतिली असता ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही असे आयोगास अवगत केले. या मुद्दयावर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात वाहकाच्या लॉगबुकच्या प्रती व वाहनाची माहिती एवढीच माहिती मागितली आहे. वाहनाची माहिती म्हणजे अपिलार्थीस वाहनाच्या संदर्भात नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा उल्लेख त्यांनी या माहितीमध्ये केला नसल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली "वाहनाची माहिती" व "वाहकाची माहिती", ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागताना ती माहिती स्पष्ट स्वरुपात मागणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्याव्दारे मागणी केलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४, ५ व ८ च्या संबंधाने संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४, ५ व ८ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८१

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. मिलींद वसंतराव विटेकर, अपिलार्थी
दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ०३-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे हे अपील जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा शाखेकडे प्राप्त झाले. ते अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर न केल्या गेल्यामुळे अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही नगरपरिषदेच्या कारभाराशी संबंधित आहे. आता नगरपरिषदेचे मुख्याधिकारी हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले असल्याने ते अपिलार्थीचा दिनांक ०३-१२-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज तीन दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सोनपेठ यांच्याकडे पाठवून देतील. सबब अपिलार्थीचा दिनांक ०३-१२-२००७ रोजीचा अपील अर्ज अपर जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सोनपेठ यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच प्राप्त अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी ,जन अपिलीय अधिकारी यांचा या अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून, माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सोनपेठ यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्ज अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

परभणी ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलींद वसंतराव विटेकर, दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८२

निर्णय दिनांक २३-०६-२००९

१ श्री. धाराजी आबाजी भुसारे, : अपिलार्थी
दै. लोकपत्र कार्यालय, गाळा क्र. ३३, स्टेडियम कॉम्पलेक्स,
स्टेशन रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अर्धवट प्राप्त झाली असल्याने त्यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. त्यांना अर्धवट माहिती मिळाल्यामुळे व त्यांच्या अपिलाची सुनावणी न झाल्यामुळे आणि अपिलार्थीस माहिती

मिळाली असे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना सांगितल्यावरुन त्यांच्यावर अधिनियातील कलम २० (१) २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे राबविल्या जाणा-या शासनाच्या विविध योजनांच्या संदर्भात दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम उत्तर देऊन अपिलार्थीस ५२ पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००८ रोजी व्यक्तिशः प्राप्त झाले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००८ रोजी सुनावनी घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील माहितीचा पुनरुच्चार करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली व त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'क' च्या संदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००८ रोजी पूर्ण माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " क " शी संबधित माहिती प्राप्त होणे बाकी आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ ते ३१-०३-२००८ या भविष्यकाळामधील कोणकोणत्या योजनांची कामे अमलात आणणार आहात आणि ही कामे किंवा योजनांचा फायदा कोणाला घेता येईल व त्यासाठी त्या योजनेवर किती खर्चाची तरतूद आहे याची माहिती मागितली आहे. याचा अर्थ अपिलार्थीस ज्या योजना सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये चालू होणार आहेत त्या योजनांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २५-०१-२००८ रोजी अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविलेल्या कथित माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस भविष्यकाळामध्ये काय करणार याची माहिती दिली आहे ती फसवी व चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस भविष्यकाळातील माहिती देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अपेक्षित नाही. तथापि ज्या योजना निश्चितपणे पुढील वर्षी चालू राहणार आहेत त्या योजनांची नांवे व त्याकरिता आर्थिक वर्ष २००८-०९ या वर्षातील परिस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रसंगी देणे योग्य राहिले असते. आता ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आज कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेश्ति करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " क " शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे आयोगाने कारवाई करण्याची अपेक्षा त्यांच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली

आहे. तथापि या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळले किंवा अपिलार्थीपासून दूष्ट हेतूने माहिती दडवून ठेवली आहे असे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आयोग आदेशित करत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक " क " च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धाराजी आबाजी भुसारे, दै. लोकपत्र कार्यालय, गाळा क्र. ३३, स्टेडियम कॉम्पलेक्स, स्टेशन रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८४

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. गंगाधर धोंडिबा काळे, अपिलार्थी
शांतीनगर, दर्गा रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सामान्य रुग्णालय,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,
परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. एल. एन. देशपांडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष हजर आहे.

वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच श्री. लक्ष्मीकांत नारायणराव देशपांडे, निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी यांनी अपिलार्थीतर्फे अपिलार्थीचे दिनांक १८-०६-२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २१-०६-२००८ रोजी माहिती

देण्यात आली असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपील रद्द करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिनांक १८-०६-२००९ रोजी लिहिलेल्या पत्रातील मजकूर सत्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ६८४/२००८, दिनांक २१-०७-२००८ खारीज करण्यात येत आहे.

परभणी

दिनांक २४-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर धोंडिबा काळे, शांतीनगर, दर्गा रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी, सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८५

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, : अपिलार्थी
व्दारा समर्थ मल्टिसर्व्हिसेस, आठवडी बाजार, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दारु विक्री संदर्भात दिनांक ०१-०१-२००० ते ०१-०१-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे

शुल्क रु. १०५ इतकी रक्कम त्यांना चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. या शुल्कामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या प्रती पुरविण्यासाठी रुपये ७० व टपालखर्च रुपये ३५ याचा समावेश होता. त्यानंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७५ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पावती क्र ८४९७५१५ द्वारे दि. २३-०४-०८ रोजी जमा केली. तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी दिली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीतील त्रुटीची पुर्तता १५ दिवसाच्या आत करण्याचे आदेश दिले. तथापि यानंतरही प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही एकूण तीन मुद्दयावर माहिती मिळणे बाकी आहे. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी पकडलेल्या सर्व दारुंचे बॅच क्रमांक, मद्य विक्रेत्यांच्या जागेच्या बांधकामाचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेला नकाशा व परवानाधारकासाठी खात्याची नियमावली या मुद्दयावर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या विभागातर्फे पकडले जाणारे सर्व दारुचे साठे हे अवैध असतात. त्यामुळे या साठ्यातील

दारुचे बॅच क्रमांक त्यांच्याकडे उपलब्ध नसतात. बांधकामाच्या नकाशासंदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ही माहिती स्वतः घेऊन जातो हे कबूल करुनही ते ही माहिती घेण्यासाठी प्रत्यक्षतः कधीही हजर झाले नाहीत. तसेच त्यांच्याकडे मद्यविक्रीसाठी असलेली नियमावली अपिलार्थीस देण्यासाठी ते आजही तयार आहेत. या सर्व बाबींचा योग्य तो खुलासा त्यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस केला होता. त्या वेळी अपिलार्थीने समाधान झाल्याचे कबूल केले होते. तथापि प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित न होता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करणे पसंत केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे उपलब्ध असून ते, ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिनांक ३१-०३-२००८ रोजी पुरविली आहे. आता अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे ज्या तीन मुद्दयावरील माहिती अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने आजच्या सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या तीन मुद्दयासंदर्भातील माहिती त्यांनी आपल्या कार्यालयामध्ये हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार ठेवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने व भरलेल्या शुल्कामध्ये टपाल खर्चाचा समावेश नसल्याने अपिलार्थीने उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आता व्यक्तिशः प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून या तीन मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दुष्ट हेतूने दडविण्याचा अथवा माहिती देण्याचे टाळण्याचा कोणत्याही टप्प्यावर प्रयत्न झाल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळले नाही त्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, व्दारा समर्थ मल्टिसर्व्हिसेस, आठवडी बाजार,

सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८६

निर्णय दिनांक २४-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब विठ्ठलराव कदम,<br>जुनी पंचायत समिती रोड, पालम, तालुका पालम,<br>जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तहसील कार्यालय, पालम, जि.परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी, परभणी | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी |
| जन अपिलीय अधिकारी | : | उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच या अपील अर्जासोबत त्यांनी उपविभागीय अधिकारी, परभणी यांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २५-०२-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून त्यामध्ये त्यांनी तहसीलदार यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे व तसेच उपविभागीय अधिकारी

यांच्याकडे त्यांनी केलेले अपील अर्ज रद्द करण्याची विनंती करणारा त्यांचा अर्ज हा बनावट असल्याचे देखील त्यांनी या पत्रामध्ये नमूद केले आहे. थोडक्यात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक २१-०१-२००८ रोजीचा त्यांनी केलेला प्रथम अपील अर्ज हा वैध आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि.१३.०७.२००७ ते १४.१२.२००७ या कालावधीतील कुटुंब अर्थसहाय्य यादी संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कुटुंब अर्थसहाय्य मंजुरी यादी (वाटप झालेली), एकूण बजेट चेक नं. डि.आर.डि. नंबरसह, मंजुरी किती ? - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी नेमके कोणत्या तारखेला प्रतिसाद दिला किंवा नाही हे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास सांगू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीचे कथित खोट्या सहीचे त्यांचे प्रथम अपील अर्ज रद्द करण्याचे पत्र प्राप्त झाल्याने त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, आयोगाकडे अपिलार्थीचे दाखल झालेले अपील हे अपिलार्थीने केले

नसल्याचे अपिलार्थीने त्यांना गेल्या आठवड्यात त्यांच्या कार्यालयात येऊन स्वतः सांगितले. यासंदर्भात त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २२-०४-२००८ व दिनांक ०१-०९-२००८ रोजी म्हणजे त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर पुरविण्यात आली आहे. या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयांचा त्यामध्ये समावेश झाल्याचे आढळून येते आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, याबाबत नेमकी कोणती कागदपत्रे वैध आहेत हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांच्या सहीचा जो मुद्दा उपस्थित झाला आहे त्या मुद्याची शहानिशा करण्यामध्ये आयोगाचा विनाकारण कालापव्यय होईल असे आयोगास वाटते. त्यामुळेअपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पाठवावी. या पत्राची पोच त्यांच्या अभिलेख्यावर जतन करुन ठेवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण

माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेव्दारे व विनामूल्य पाठवावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब विठ्ठलराव कदम, जुनी पंचायत समिती रोड, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८७

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. सुग्रीव आश्रोबा पैठणे, : अपिलार्थी
रा. पिंपळदरी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळदरी,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ व त्यांच्याशी चुकीचा पत्रव्यवहार केला असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पिंपळदरी ग्रामपंचायतीच्या सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये केलेल्या विकास कामाची माहिती विस्तृत प्रमाणात मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना

व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत असे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३००० इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. तथापि या पत्रानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००८, ११-०३-२००८ व २९-०३-२००८ अशा तीन दिवशी सुनावण्या ठेवल्या होत्या. तथापि एका सुनावणीस जन माहिती अधिकारी गैरहजर असल्याने व दोन सुनावणीस अपिलार्थी गैरहजर असल्याने अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क ३००० रुपये इतके त्यांनी अपिलार्थीस भरण्यासाठी दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे कळविले होते. सदर पत्र अपिलार्थीस त्याच दिवशी प्राप्त झाले होते. हे पत्र प्राप्त होऊनही अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कोणतेही शुल्क न भरल्यामुळे अपिलार्थीस ते माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस ते, ही माहिती त्वरित देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजे अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ३००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे एकूण तीन वेळा सुनावणी ठेऊन कोणताही निर्णय दिला नाही. मात्र अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकली नाही याची जाणीव गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रावरुन दिसून येते. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्याशी दिशाभूल करणारा पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी यांनी केला असे म्हटले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता या पत्रावरुन अपिलार्थीची कोणत्या प्रकारे दिशाभूल होते हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने या प्रकरणी शुल्काच्याबाबत कोठेही आपले आक्षेप नोंदविले नाहीत. एवढेच नव्हे तर या शुल्काचा भरणा करण्यासाठी त्यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर स्वत: होऊन तयारी देखील दर्शविलेली नाही. आजही आयोगापुढे सुनावणीसाठी अपिलार्थी हजर नाहीत त्यामुळे मूळात अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता आहे की नाही याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी आजही तयार आहेत, हे पाहता,

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती अद्यापपावेतो प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे ज्याप्रमाणे त्यांचे कर्तव्य आहे, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविल्यानंतर ते शुल्क भरण्याचे उत्तरदायित्व अर्जदारावर देखील आहे. या प्रकरणी हे उत्तरदायित्व अपिलार्थीने योग्य प्रकारे पार पाडलेले नाही, या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुग्रीव आश्रोबा पैठणे, रा. पिंपळदरी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळदरी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८८

निर्णय दिनांक २४-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. घोगरे वसंत व्यंकटराव,<br>सह शिक्षक, प्राथमिक शाळा, गोळेगांव के. देवूळगांव,<br>तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : १. श्री. गायकवाड

२. श्री. लांडे के. के.

३. श्री. अनिल कांबळे

४. श्री. वसंत घोगरे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील

माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ (अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांनी दिनांक २७-०८-२००६ अशी त्यांची इंग्रजीमध्ये तारीख टाकली आहे. तथापि हा अर्ज दिनांक २७-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज हा दिनांक २७-०८-२००७ रोजी केल्याचे अनुमान काढण्यात येत आहे) रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ या संदर्भातील माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना सूचना दिल्याचे त्यांनी अपिलार्थीस अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि सर्व संबंधित त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. ते या प्रकरणी निलंबीत झाले असल्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पूर्णतः पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ व ४ वगळता उर्वरित कोणतीही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने चौकशी अधिकारी श्री. गायकवाड यांनी शाळेस कोणत्या वेळी भेट दिली, त्या दिवसाचा संपूर्ण तपशील देणे, सायंकाळी पाच वाजता श्री. गायकवाड कोठे होते, वगैरे प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित असलेली माहिती मागितल्याचे दिसून येत आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत नाही. अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमीत प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या एखाद्या निर्णयाबाबत अथवा त्यांच्या कृतीबाबत त्यांचे खुलासे, स्पष्टीकरण किंवा एखाद्या निर्णयाची कारणे अशा प्रकारची माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अनुज्ञेय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देण्याची आवश्यकता नाही. अपिलार्थीने या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व्दारे श्री. के. के. लांडे यांनी पंचायत समितीकडे पाठविलेल्या अहवालाची छायांकीत प्रत व मुद्दा क्र.४ द्वारे गट

शिक्षणाधिकारी यांनी त्यावर काय कार्यवाही केली या दोन मुद्दयावरील माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये या मुद्दयावरील माहितीचा समावेश नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती पुरविली असल्याचे ते आयोगासमोर सिध्द करु शकले नाहीत. तसेच आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे कोणतीही तयारी न करता आयोगासमोर आले. त्यामुळे त्यांना आयोगाच्या कोणत्याही प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ व्दारे मागणी केलेली, श्री. के. के. लांडे यांनी पंचायत समितीकडे दिलेल्या अहवालाची प्रत व गट शिक्षणाधिकारी यांना हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांनी केलेली कार्यवाही ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरी या प्रतिसादाव्दारे त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा कमांक ३ व ४ च्या संदर्भातील माहिती गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त व्हावयाची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमाक ३ व ४ संदर्भातील माहिती दिली आहे किंवा कसे याबाबत त्यांनी त्यांच्या स्तरावर चौकशी करुन त्यामध्ये जर गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पूर्णा हे दोषी आढळले तर त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती वर निर्णयामध्ये विवेचन केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पुर्णा यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, या प्रकरणी ते दोषी आढळल्यास, यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. घोगरे वसंत व्यंकटराव, सह शिक्षक, प्राथमिक शाळा, गोळेगांव के. देवूळगांव, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८९

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. सय्यद जावेद पिता सय्यद वाजेद, : अपिलार्थी
रा. कौसडी, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर जास्तीत जास्त शिक्षा करण्याचे आदेशित करावे व जायमोक्या-वरील नालीबाबत चौकशीचे आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०७-०१-२००८ रोजी मौजे कौसडी येथील नालीबद्दल तक्रार निवारण करण्याबाबत केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितली होती.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०७-०१-२००८ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती मागितली होती. अपिलार्थीने दिनांक ०७-०१-२००८ रोजी दिलेल्या मूळ अर्जामध्ये मौजे कौसडी येथील नालीबद्दल केलेल्या तक्रारीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना उद्देशून केला होता, तथापि या प्रकरणी प्रत्यक्षतः माहिती अधिकारी हे ग्रामसेवक आहेत त्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी अपिलार्थीचा हा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे ग्रामसेवक यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अपेक्षित होते. तथापि अशा प्रकारची कार्यवाही त्यांच्याकडून झाल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००८ रोजी पंचायत समिती, जिंतूर येथे उपस्थित राहण्याचे सूचित केले. मात्र त्या दिवशी नेमके काय झाले हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. याप्रमाणे अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. सर्व संबधितांकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक

प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी व ग्रामसेवक यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर काय कार्यवाही केली याचे समाधानकारक स्पष्टीकरण त्यांना आयोगास देता आले नाही. मूळात अपिलार्थीचा दिनांक १४-०३-२००८ रोजीचा अर्ज ग्रामसेवक यांना प्राप्त झाला किंवा कसे हे देखिल आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक १४-०३-२००८ रोजीचा अर्ज जो गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना उद्देशून अपिलार्थीने केला होता त्या अर्जाची प्रत त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही ग्रामसेवकाच्या ताब्यात असते. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांनी संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, यांच्याकडे, त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अभिप्रेत होते. तथापि संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले असल्याचे या प्रकरणी

नि:संशयपणे सिध्द होत आहे. केवळ जिंतूर पंचायत समितीचे संबंधित गट विकास अधिकारी यांच्या या प्रकरणातील अशा प्रकारच्या अकार्यक्षमतेमुळे आवश्यक ती माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकली नाही. आता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत ग्रामसेवक, कौसडी यांच्याकडे पाठवावी व ग्रामसेवक, कौसडी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांना प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर व ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी यांनी अशाप्रकारे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असतांना, आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस वंचित ठेवल्याचे स्पष्टपणे सिध्द केल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत ग्रामसेवक, कौसडी यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत पाठवावी.

३. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांच्याकडून अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना, या प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद जावेद पिता सय्यद वाजेद, रा. कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कौसडी, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९०

निर्णय दिनांक २४-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी,<br>जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील, पाथरी तालुक्यात दिनांक ०१-०४-२००५ ते ३०-०६-२००७ या कालावधीतील रोहयो अंतर्गत केलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची रोहयो अंतर्गत किती गावात कामे झाली, ज्या शेतात कामे झाली त्या शेतक-यांची नावे, गट नंबर व कामाच्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, काम जेसीबीने केले की मजूराच्या हस्ते केले ? मजूर असतील तर मजूरी किती निघते, धान्य कुपनाच्या प्रती व मजूराची यादी, मशिनने काम केले असल्यास मशिनचे भाडे दर व शासन आदेशाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या पत्राची एक प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मजूरांची व शेतक-यांची यादी या मुद्दयांचा समावेश नाही, त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली माहिती ती दिशाभूल करणारी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस आता जी माहिती अपेक्षित आहे त्या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यास ते ही माहिती अपिलार्थीस त्वरित उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक दोनद्वारे कामे मजूराव्दारे केली की मशिनव्दारे केली या मुद्दयावरील माहिती ही अधिनियमातील विहित तरतुदींशी विसंगत असल्याने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय राहणार नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या प्रकरणी असे आढळून आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) च्या तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस प्रथमतः तीस दिवसाच्या आत कळविणे त्यांना भाग होते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कधीही प्राप्त झाली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीच्या शुल्काचा विषय प्रथम जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्रामध्ये उपस्थित केला आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर जे उत्तरदायित्व आहे ते

त्यांनी वेळेत पार पाडले नसल्याने आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मजूरांची व शेतक-यांची यादी ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील या प्रकरणाशी संबंधित शेतक-यांची व मजूरांची यादी ही माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी,
जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पाथरी, तालुका पाथरी,

जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९१

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने आयोगाकडे सदर अपील केले असल्याचे यामध्ये नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०३-२००७ ते १२ ऑक्टोंबर २००७ या कालावधीमध्ये त्यांनी राबविलेल्या ग्राहक जागृती अनुदान व कार्यक्रमाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्राहक जागृती अभियानासाठी जन माहिती अधिकारी यांना मार्च २००७ मध्ये प्राप्त झालेले अनुदान, त्यापैकी झालेला खर्च, शिल्लक असल्यास किती, सदरील अनुदान खर्च केले असल्यास कोणता कार्यक्रम राबविला याची संपूर्ण माहिती व खर्चाच्या पावतीच्या छायांकीत सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या मूळ पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यास व संचिका पाहण्यासाठी सूचित केले. या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी मोघम स्वरुपाची माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर अपिलार्थी यांनी दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे स्पष्टीकरण देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती कशी स्पष्ट आहे ते जन माहिती अधिकारी यांना स्पष्ट केले. तथापि एवढे करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचा खुलासा केल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला. त्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, आता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०५-२००८ रोजीच्या पोस्टाच्या शिक्क्यासह माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे कोणतेही अभिप्राय नसून ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली एवढीच बाब त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारणपणे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन मधील " कोणते कार्यक्रम राबविले त्याची संपूर्ण माहिती " ही माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण संपूर्ण माहिती म्हणजे नेमके कोणती माहिती याचा उल्लेख अपिलार्थीने या अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या अनुदान संदर्भात जे काही कार्यक्रम राबविले आहेत त्यांच्या शीर्षकाची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्पष्ट स्वरुपात असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी अशा प्रकारचे दिशाभूल करणारे पत्र अपिलार्थीस लिहून माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी केवळ जन माहिती अधिकारी यांच्या लेखी खुलाशावर पूर्ण

विश्वास टाकणे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविल्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशावर विश्वास ठेवणे, अपिलार्थीचे अपील निकाली काढणे, जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून यासंदर्भात सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी खरोखरच अपिलार्थीस माहिती पुरविली किंवा कसे याकडे त्यांची शहानिशा केली असती तर कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे धाव घेण्याची गरज पडली नसती. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००८ रोजी माहिती दिल्याचे नमूद केले असले तरी त्यांना प्रत्यक्षतः पोस्टाचा दिनांक १७-०५-२००८ रोजीचा शिक्का सही प्राप्त झाली आहे. त्यामुळे येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जानेवारी महिन्यात माहिती पाठविली असली तरी ती पोस्टात टाकण्यासाठी संबंधित विभागाच्या कार्यालयाच्या जावक लिपीकाने ही माहिती मे महिन्यामध्ये पोस्टात टाकली आहे. त्यामुळे दिनांक २५-०१-२००८ ते मे २००८ या कालावधीतील या माहितीचा बटवडा का होऊ शकला नाही याची नोंद प्रशासकीय प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी, जालना यांनी घेणे आयोगास अगत्याचे वाटते.

सबब जिल्हाधिकारी, जालना यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी संबंधितांनी लावलेल्या विलंबाची जबाबदारी निश्चित करुन या प्रकरणी त्यांना दोषी आढळणा-या कर्मचा-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करुन आपना अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमत होताच ९० दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जिल्हाधिकारी, जालना यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत सादर करावा.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९२

निर्णय दिनांक २४-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश केशवराव कसबे,<br>इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परतूर, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना मुदतीच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निर्णय झाला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. यानंतर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नसल्याने दिनांक ०५-०८-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगाकडे अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये फक्त त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची व अपील अर्जाची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नसल्याच्या त्यांच्या दाव्याप्रीत्यर्थ युक्तिवाद करण्यासाठी, आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच या संदर्भात त्यांनी आयोगाशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही आणि त्यांच्या या दाव्याप्रीत्यर्थ आयोगाकडे कोणताही लेखी युक्तिवाद सादर केलेला नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश केशवराव कसबे, इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९३

निर्णय दिनांक २४-०६-२००९

१ श्री. सुरेश केशवराव कसबे, : अपिलार्थी
इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००१ ते २००८ या कालावधीतील काही

माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती पोस्टाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०७-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि ही माहिती खोटी, अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०६-२००९ रोजी परभणी येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २८-०७-२००८ रोजी अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी आतापर्यंत शेतक-यांची यादी व मजुराच्या हजेरीपत्रकाच्या प्रती पुरविल्या नाहीत. कारण अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही आठ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित असल्याने व या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दाखविली. आता ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांना अपेक्षित असलेली माहिती स्वतः हाताने लिहून घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली शेतक-यांची व मजुरांची यादी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीतील संदर्भित शेतक-यांची व मजुराची यादी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**परभणी** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश केशवराव कसबे, इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७११
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री. अशोक सर्जेराव देशमुख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमि अभिलेख,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती शारदा नारायण पुतन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती शारदा नारायण पुतन यांच्या गट नं.८ नक्षत्रवाडी, मोजणी नकाशा नंबर नं.मोर/औरंगाबाद/३५१८/८६ मोजणी दिनांक ०३.०५.१९८६ ची प्रत व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, "अभिलेख कक्षाचे स्थलांतरण झालेले असल्याने

अभिलेखापाल यांनी या कामी मुदत मागितल्यामुळे अभिलेखे काढून शोधल्यानंतर आपणास माहिती पुरविण्यात येईल" असे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि काही कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०४.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख तथा जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात विशेष मोहिम घेऊन संबंधित संचिका शोधून अपिलार्थीस नियमानुसार फी आकारुन त्यांनी मागणी केलेल्या नकला पुरवाव्यात, असे सूचित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०५.०४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या प्रकरणात असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्याचे आदेशित करतांना त्यांनी त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेतलेले नाही, त्यामुळे आता जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घेऊन अपिलार्थीच्या दि.११.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक सर्जेराव देशमुख,रा.१५, स्वानंदनगर,न्यु श्रेयनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१२
निर्णय दिनांक २५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. जे. एम. कळसणे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक,<br>उच्च शिक्षण विभाग,औरगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदरचा अपील अर्ज अपिलार्थीने एका साध्या कागदावर लिहून या अर्जासोबत माहितीसाठीच्या विनादिनांकाच्या चार अर्जांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. अपिलार्थीस या अर्जांपैकी नेमक्या कोणत्या अर्जासंदर्भातील माहिती आवश्यक आहे, याचा या अपील अर्जामध्ये उल्लेख केलेला नाही. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेला द्वितीय अपील अर्ज, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.आर.टी.आय.२००५/सीआर.३१५/०५/५,दि.११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये

विहित केलेल्या प्रपत्रामध्ये प्रत्येक मूळ अर्जाकरिता त्यांच्याकडील प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह व्दितीय अपील अर्ज सादर करावा, म्हणजे या प्रकरणात निर्णय घेणे आयोगास सुकर होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जे. एम. कळसणे,एस.आर.टी.-११, लेबर कॉलनी,औरंगाबाद,

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग,औरगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१३
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री. दिपक विठ्ठल भुसारे, : अपिलार्थी
मु.वाघला, पो.पोखरी,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व त्यांना दिशाभूल करणारे पत्र दिले व त्यांनी मागणी केलेल्या माहितीसाठी रु.१०/- प्रतिपृष्ठ इतके शुल्क आकारुन त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असताना अपिलार्थीस कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना कोणतीही माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून वैजापूर तालुक्यातील शिरेगाव येथील भूखंड वाटपासंदर्भात त्यांच्याकडे एकूण ९

मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र पोस्टाद्वारे मागवून या प्रथम अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२९.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीकरिता अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.१०/- या प्रमाणे शुल्क आकारले व त्याचबरोबर अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैयक्तिक प्रमाणपत्र त्यांच्याकडे सादर केल्यास अपिलार्थीस या प्रती विनामूल्य पुरविण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार पुरवावी, असे आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी,विद्यमान जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, औरंगाबाद जिल्हयामध्ये ६२,००० शिधापत्रिका बोगस आढळल्या असून अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या शिधापत्रिकेची प्रत, ही ते खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, असा पुरावा मानता येणार नाही. जर अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असतील तर त्यांनी यासंबंधीचे वैध प्रमाणपत्र संबंधित ग्रामपंचायत /पंचायत समितीकडून प्राप्त करुन घेऊन ते जन माहिती अधिकारी यांना सादर करणे सहज शक्य होते. तथापि अपिलार्थी

या संपूर्ण घटनाक्रमात, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा कोणताही वैध पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने त्यांच्याकडे अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा सादर केल्यास अपिलार्थीस ते ही माहिती विनामूल्य व तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी प्रथम चुकीच्या शुल्काची आकारणी केली असली तरी, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले नाही. याउलट अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांच्या मूळ अर्जात नमूद करुनही यासंदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा (रेशनकार्डच्या झेरॉक्स प्रतीशिवाय) जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेला नाही. रेशनकार्डाची झेरॉक्स प्रत देखील सत्यप्रत म्हणून कोणीही साक्षांकित केलेली नाही, याही पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे औरंगाबाद जिल्हयात सुमारे ६२,००० शिधापत्रिका बोगस असतील तर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेले रेशनकार्ड हे बोगस रेशनकार्ड नाही कशावरुन? हा प्रश्न येथे अनुत्तरीत राहत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राबाबतचा कोणताही इतर वैध पुरावा,या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचा प्रयत्न केल्याचे देखील आयोगास आढळून आले नाही. यावरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि.०५.०४.२००८ रोजी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक विठ्ठल भुसारे,मु.वाघला,पो.पोखरी,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१४
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री. शेख सांडू ताजमहंमद पटेल, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक संचालक,नगररचना,
महानगरपालिका,औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक, नगररचना,
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपअभियंता, नगररचना,
महानगरपालिका,औरंगाबाद.

### निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांना दंड व शिक्षा करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिका ठराव क्र.१०९२/६, दि. २०.०९.२००७ प्रमाणे रोशनगेट ते आझाद चौक रस्ता ६० फूट (१८ मी.रुंद) करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम

१९६६ च्या कलम ३७(२) अन्वये फेरबदल करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी दिली, याची वैधानिक कार्यवाही झाली किंवा नाही, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही लिखित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०४.२००८ रोजी सूनावणी घेऊन या प्रकरणासंदर्भात निर्णय दिला. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती अवगत केली. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभेत ठराव क्र. १०९२/०६ दि. २०.०९.२००७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीस त्यांनी अवगत केले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित वस्तुस्थिती अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्या वेळी दि. २२.०४.२००८ रोजी ज्ञात झाली आहे. यापृष्ठयर्थ अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील संबंधित अभिलेख्यावर सही देखील केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती दि. २२.०४.२००८ रोजी प्रथमतः प्राप्त झाली असे मानता येईल, तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड व शिक्षेचे आदेश आयोगाने पारित करावेत. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास त्या माहिती संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्यासाठी स्वतः अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेणे, 'व्यक्तिशः' या प्रकारामध्ये अभिप्रेत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले होते, यासंदर्भात त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन कोणताही तपशील आयोगास ज्ञात होत नाही. तसेच उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यामध्ये अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये कधी गेले होते, याची नोंदही उपलब्ध नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाची ही कारवाई ज्या वेळी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असतील किवा एखाद्या दुष्ट हेतूने त्यांच्यापासून माहिती दडवून ठेवली, असे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे, त्या वेळी त्यांच्यावर अधिनियमातील कलम (२०) चा वापर करण्याबाबत विचार करणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा ही माहिती अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने लपविल्याचे कोणत्याही टप्प्यावर सिध्द होत नाही. याउलट अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी गेल्याचा त्यांनी कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. यावरुन अपिलार्थीने त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यासाठी वरील प्रमाणे अपेक्षित असलेले त्यांचे उत्तरदायित्त्व पार पाडले नसल्याचे सिध्द होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, हा अपिलार्थीचा आक्षेप आवश्यक त्या पुराव्याअभावी अमान्य

करण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख सांडु ताजमहंमद पटेल,रा.घ.नं.४-११-९०,किराडपूरा,सिडको रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१५
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. कॉ. युनुसखान जुम्मा खॉ पठाण, सिल्लोड,जि.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,सिल्लोड, जि.औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. २८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली असता, त्यांना कोणत्याही प्रकारे माहिती देण्यात आली नाही व पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्यात येईल, असे तोंडी सांगण्यात आले परंतु कोणत्याही प्रकारचे लेखी उत्तर त्यांना संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - " दि. २९.०५.२००७ रोजी झालेल्या बैठकीच्या प्रोसेडींगची नक्कल व संजय गांधी,

इंदिरा गांधी व श्रावणबाळ योजनेअंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांची नावे" ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र प्रथम अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.०३.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपिलाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत आयोगासमोर सादर केली असता, ही प्रत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.१०.२००८ रोजीच्या वेगळ्या विषयावर केलेल्या अर्जाशी संबंधित असल्याचे दिसून येते. थोडक्यात आज रोजी सुनावणी घेताना आयोगासमोर अपिलार्थीचा मूळ अर्ज, प्रथम अपील अर्ज व आयोगाकडील द्वितीय अपील अर्ज एवढीच कागदपत्रे उपलब्ध आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रमात अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, एवढेच नव्हे तर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,

सिल्लोड यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या अपिलावर निर्णय पारित केलेला नाही.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ती अतिशय सोपी व सरळ असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.०५.२००७ रोजी झालेल्या बैठकीच्या प्रोसिडींगची नक्कल व संजय गांधी, इंदिरा गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची यादी एवढीच मर्यादित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असून देखील ती अपिलार्थीस सव्वा वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकत नाही,ही खरोखरीच महसूल विभागाच्या दैनंदिन कारभारातील अपारदर्शकता स्पष्ट करते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दि. २४.०३.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ संबंधित लिपीकाने अपिलार्थीच्या दोनही अर्जाच्या प्रतीवर, पोचसहया दिल्या आहेत. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज संबंधितांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. युनुसखान जुम्मा खॉ पठाण,रा.मोमीनपुरा, गल्ली नं.४, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे).

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१६
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री. विकास रावसाहेब दांडगे, मु.पो.वरुड काजी, ता.जि.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : डॉ.भानुशाली, वैद्यकीय अधिकारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद जिल्हयातील वरुड काजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय

अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाच्या वीज बिलाबाबत व डॉ. भानुशाली यांच्या नेमणूकीबाबत काही माहिती मागविली होती. त्यापैकी डॉ. भानुशाली यांच्या नियुक्तीबाबत अपिलार्थीस त्वरित माहिती प्राप्त झाली. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या वीजबिलाबाबत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणाशी संबंधित अपिलीय प्राधिकरण म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २१.०४.२००८ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ३१.०४.२००८ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीच्या मागणीचा पुनरुच्चार केला. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आपले आदेश दि.२१.०४.२००८ रोजी पारित केले असून या आदेशाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम,अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती देताना, आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी वरुड काजी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निवासस्थानाचे वीज बील जिल्हा परिषदेमार्फत भरले जाते,

असे अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याचे आयोगास आढळून येत आहे.अशाप्रकारची माहिती देताना अधिनियमातील कलम ८(१) व ९ मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होणे संभवत नाही, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.०४.२००८ रोजीच्या आदेशान्वये सूचित करुनही अद्यापपावेतो अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र होत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विकास रावसाहेब दांडगे,मु.पो.वरुड काजी ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे).

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१७
निर्णय दिनांक २५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुरेश दामोधर गवळी,<br>रा.बोरगाव बू. पो.जानेफळ<br>(पं),ता.जाफ्राबाद,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,भोकरदन,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना. | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
भोकरदन,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,भोकरदन,
जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००५ ते २००८ या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे झालेल्या मातीबांध व सर्व योजना या कामाच्या अंदाजपत्रकाच्या,मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती व कर्मचाऱ्यांचे दौरे व कर्मचाऱ्यांची यादी व निवासस्थाने, रोजगार हमी व संपूर्ण विस्तारीत योजना यांची माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०६.२००८ (प्रत्यक्षात टंकलेखनाच्या चुकीमुळे सदर पत्राची तारीख दि.१८.०६.२००६ अशी नमूद केल्याचे दिसून येते.)रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५६,३३६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व सन २००५ ते २००६ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती काढत असल्याचे कळविले,तथापि या पत्राने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०७.२००८ रोजी घेऊन अपिलार्थीस अनुदान उपलब्ध होताच माहिती देण्यात येईल, असे आश्वासित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या कामासाठी वेळ लागणार असल्याने ही माहिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी अपिलार्थीस दिवस व वेळ ठरविण्याचे कळविले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य

अपेक्षित आहे. तसेच या प्रकरणी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही निधी उपलब्ध नाही. यासंदर्भात त्यांनी त्यांचे वरिष्ठ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे दि. १०.०७.२००८ रोजी रु.५६,३३६/- इतक्या निधीची मागणी केली होती, तथापि त्यांना आवश्यक तो निधी वरिष्ठांकडून प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे, ही बाब देखील येथे विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते.आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. परंतु ती देण्यासाठी आवश्यक तो निधी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी सध्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत लिहून घ्यावी. या कामी लागणारी स्टेशनरी (कागद-पेन) जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक तो निधी वरिष्ठांकडून उपलब्ध झाल्यानंतर तात्काळ ही माहिती अपिलार्थीस पुरवावी.

प्रसंगावशात, आयोगाकडे कृषि विभागाशी संबंधित दाखल होणाऱ्या अनेक अपील प्रकरणी असे आढळून आले आहे की, कृषि विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना कार्यालयीन खर्चासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीपोटी जमा होणारे शुल्क देखील संबंधित जन माहिती अधिकारी अर्जातील

माहिती देण्यासाठी वापरत नाहीत. अर्जदाराकडून प्राप्त झालेले शुल्क ते तात्काळ शासकीय कोषागारात जमा करतात व परत अर्जदारास माहिती देण्यासाठी निधी उपलब्ध नाही, हे कारण दर्शवून अर्जदारास माहिती देण्याचे टाळतात. कृषि विभागाच्या अशाप्रकारच्या अगम्य कार्यपध्दतीमध्ये सचिव (कृषि) यांनी वेळीच लक्ष घालून कृषि विभागाचा क्षेत्रीय स्तरावरील कारभार जास्तीत जास्त पारदर्शक कसा होईल, याकडे लक्ष देणे आयोगास गरजेचे वाटते. त्यामुळे अशाप्रकाराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांनी एक तर त्यांच्या विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कार्यालयीन खर्चासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा किंवा अपिलार्थीने भरलेल्या माहितीसाठीच्या शुल्काचा अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात वापर करण्याची परवानगी देणारे परिपत्रक जारी करावे,असे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद, अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर, देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत कृषि आयुक्त,पुणे यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) कृषि आयुक्त,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश दामोधर गवळी,रा.बोरगाव बू. पो.जानेफळ (पं),ता.जाफ्राबाद,जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना यांना या निकाल- पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (कृषि),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१८
निर्णय दिनांक २५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मोहमंद अजमल कलीम मोहंमद गौस,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, मौलाना आझाद हायस्कूल<br>खुलताबाद,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही, माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील सन २००७ व २००८ मध्ये इयत्ता ५ वी ,६ वी व ७ वीच्या विद्यार्थ्यांच्या घेतलेल्या परीक्षेसंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - इयत्ता ५ वी,६ वी 'अ' व 'ब' आणि ७ वी 'अ' व 'ब' या तुकडया सन २००७-०८ मध्ये इंग्रजी, हिंदी, मराठी,ऊर्दू,इतिहास,भूगोल या विषयाच्या पहिल्या, दुसऱ्या व

तिसऱ्या घटक चाचणीमधील व वार्षिक परीक्षेमधील उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती, सन २००६-२००७ चे घटक चाचणी व परीक्षा नोंद रजिस्टर, सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीतील शाळेतील सर्व शिक्षकांच्या वैयक्तिक वेळापत्रकाच्या प्रमाणित प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने त्यांचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविल्याचा उल्लेख केला असून यासंदर्भात त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दोन आठवडयाच्या आत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे व निरीक्षण केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीच्या प्रती त्यांना सशुल्क पुरविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्रथमतः प्राप्त झाला नाही. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून दि. ०४.०२.२००८ रोजीच्या पत्राबरोबर त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्यामार्फत अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी अपिलार्थीस

रु.७६७०/- इतक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट त्यांच्याकडे भरण्याचे कळविण्याची विनंती केली व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही केला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही कधीही उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा दि. १५.१२.२००७ रोजीचा कथित मूळ अर्ज मुख्याध्यापिका, मौलाना आझाद हायस्कूल,खुलताबाद,जि.औरंगाबाद यांना शिक्षणाधिकारी यांच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झाला आहे. हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.०२.२००८ रोजीच्या शिक्षणाधिकारी (मा),जि.प.औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.७६७०/- इतके त्यांच्या कार्यालयात डी.डी. द्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने केलेला नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०२.२००८ रोजीच्या त्यांच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व या निरीक्षणाद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीतील अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना सशुल्क पुरविण्याचे माहिती अधिकाऱ्यास आदेशित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शवूनही अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी स्वतः होऊन त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, यामध्ये असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी एखाद्या अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची अपेक्षा केलेली असते, त्यावेळी

माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर या अर्जाच्या संबंधाने पुढील सर्व घडामोडी व्यक्तिशः ज्ञात करुन घेणे, हे अर्जदाराचे उत्तरदायित्त्व ठरते. तथापि या प्रकरणी एकदा अर्ज केला की, काम झाले, अशा आविर्भावात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधीही व्यक्तिशः संपर्क साधला नाही, त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे उत्तरदायित्त्व योग्य त्या प्रकारे पार पाडले असल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका या अपिलार्थीस देय होत नाहीत. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या बाबतीत आयोगाने वेळोवेळी उत्तरपत्रिकांच्या संदर्भात माहितीच्या मागणीचा त्यांचा हक्क नसल्याचे निर्णय दिलेले आहेत. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र या अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती त्यांनी आता त्यांच्याकडे अपिलार्थीस उपलब्ध करुन ठेवावी व अपिलार्थी हे ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये व्यक्तिशः आल्यास ती त्यांनी प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने त्यांना सशुल्क पुरवावी.

अपिलार्थीस अशाप्रकारे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसापर्यंत सशुल्क उपलब्ध होऊ शकेल. या कालावधीनंतर ही माहिती मागण्यासाठी अपिलार्थीस वेगळा अर्ज करावा लागेल, असे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर नाकारले नसल्याने अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणत्याही कारवाईची शिफारस नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसापर्यंत सशुल्क व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहमंद अजमल कलीम मोहंमद गौस, व्दारा, इकबाल सलीम, प्लॉट नं.१३, औरंगाबाद टाईम्स कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मौलाना आझाद हायस्कूल, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७१९
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री. मुनवर अहेमद नईम अहेमद, रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०४.२००८ पासून त्यांना माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २४.०४.२००८ रोजी पत्र पाठवून देखील या पत्राची तारीख हेतुपूरस्सर दि.२१.०४.२००८ अशी दर्शविली आहे. या पत्रासोबत गट शिक्षणाधिकारी यांच्या अहवालाची प्रत जोडलेली नाही. मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती घेऊन

जाण्यासाठी पत्र पाठविले नाही व माहितीचा खर्च किती लागेल, हे सुध्दा त्यांनी कळविले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजतागायत जाणूनबुजून माहिती दिली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना आझाद हायस्कूल, खुलताबाद या शाळेत दि.२६ जानेवारी, २००८ रोजी पाऊणतास उशिरा झेंडावंदन झाल्याबद्दल केलेल्या तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. २४.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २१.०४.२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२१.०४.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्रत्यक्षात ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०४.२००८ रोजी पुरविली असून या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे गट शिक्षणाधिकारी यांच्या अहवालाची प्रत या पत्रासोबत जोडली नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि.२१.०४.२००८ रोजीच माहिती पुरविली असून त्यांच्या या पत्रासोबत त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांचा अहवाल जोडला होता. यानंतरही त्यांनी अपिलार्थीस दि. १९.०३.२००९, २६.०३.२००९ व १५.०५.२००९ रोजी हीच माहिती पुरविली

आहे. या संदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती वेळोवळी विनामूल्य प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती घेऊन जा, असे पत्र पाठविले नाही. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भाने प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्याची जबाबदारी ही अर्जदाराची असते. अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे ती माहिती उपलब्ध आहे किंवा कसे, असल्यास ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती शुल्क भरावे लागेल याची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने स्वतः होऊन करणे अपेक्षित आहे. या प्रकरणी अपिलार्थीने अशाप्रकारची कोणतीही कृती न करता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जासंदर्भात उत्तराची वाट पाहिली. अपिलार्थीची ही अपेक्षा अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. तसेच अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही असद्‌हेतूने कधीही टाळल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जातील सर्व मुद्दे वरीलप्रमाणे निकाली निघत असल्याने व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्रं ७१९/०८

प्रत,

१. श्री. मुनवर अहेमद नईम अहेमद,द्वारा अब्दुल माजीद,४०,न्यू एस. टी. कॉलनी, कटकटगेट,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७२०
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री.शेख अफसर शेख बाबू, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,जलभवन नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप-विभागीय अधिकारी,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम
उपविभाग,क्र.२ नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एन.आर.ए.पी. आणि एस.टी.पी.नांदेड अंतर्गत कामाबद्दल काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एन.आर.ए.पी. आणि एस.टी.पी.नांदेड अंतर्गत कामाकरिता केंद्राकडून किती अनुदान प्राप्त झाले, किती कामे पूर्ण झाली,

यातील कोणती कामे किती वर्षापासून शिल्लक आहेत. उर्वरित कामे मुदतीत पूर्ण झाली काय? सर्व कामांच्या कार्यारंभ आदेशाच्या साक्षांकित प्रती, या कामाची आजपर्यंत दिली गेलेली चालू देयके व अंतिम देयक कोणत्या दिनांकास व कोणकोणत्या ठेकेदारास देण्यात आली, याची लेखी स्वरुपात माहिती - या मुद्यांचा समावेश होता. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असून त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत जोडला असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः पाहणी करण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०१.२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली व अपिलार्थीने मागितलेल्या देयकाच्या संदर्भात या माहितीची त्यांच्या कार्यालयात पाहणी करुन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात येऊन आवश्यक त्या माहितीची खात्री करुन घेऊ शकतात, असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलबध करुन देण्यात

आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मर्यादित आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे, याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. "माहितीशी संबंधित कालावधी" या मूळ अर्जातील मुद्यापुढे अपिलार्थीने,"माहिती अधिकार २००५ नियमाप्रमाणे" असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत, जे या माहितीशी पूर्णतः गैरलागू आहेत. या अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विशिष्ट स्वरुपाची व विशिष्ट कालावधीशी संबंधित नसल्याचे व त्यामुळे या माहितीचे स्वरुप हे पूर्णतया मोघम होत आहे. हे पाहता व तसेच सर्व संबंधितांची आजच्या सुनावणीचे वेळी असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेख अफसर शेख बाबू,द्वारा सिग्मा इंजिनियरींग वर्क्स, गोकुळनगर चौक,नांदेड-४३१६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग,क्र.२ नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७२१
निर्णय दिनांक २५-०६-२००९

१. श्री.शेख अनवर शेख मन्नु, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. रमाकांत उध्दवराव मनुरवार व इतर सहा स्वस्त धान्य दुकानदार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अर्ज पाठवून माहिती मागितली असता, मुदत संपल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे प्रथम अपील अर्ज केला. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस हवी असलेली माहिती न देता अपिलार्थीची दिशाभूल करुन अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुदखेड तालुक्यातील मौ.बारड येथील चार त्रयस्थ पक्ष तथा किरकोळ रॉकेल विक्रेते - श्री.रमाकांत उध्दवकांत मनुरवार,श्री.समदानी पठाण,श्री.विजय लक्ष्मण मनूरवार,श्री.काशीनाथ रामजी अगरे तसेच मौ. मुगट येथील श्री. पुरभाजी नामदेव मुंगल,श्री. रमेश बन्सीलाल छप्परवाल आणि मौ.आमदुरा येथील श्री. अब्दुल जब्बार खमरोद्दीन या किरकोळ रॉकेल परवानेधारकांच्या संदर्भात त्यांना शासनाकडून दि.०१.०४.१९९० ते दि.२५.०१.२००८ या कालावधीत देण्यात आलेल्या रॉकेलच्या वितरणाच्या व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती इत्यादी माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या मूळ अर्जाचे व प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, हे दोनही अर्ज संबंधितांना मूळात प्राप्त झाले किंवा कसे याबद्दल आयोग साशंक आहे. कारण अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पत्रव्यवहार केल्याचे नमूद केले आहे. मात्र यासंदर्भातील कोणताही वैध पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही पुरावा अथवा लेखी म्हणणे आजतागायत मांडलेले नाही, हे पाहता आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे

विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेख अनवर शेख मन्नु,रा.लेबर कॉलनी, घर नं.४९,ब्लॉक नं.४,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७२२
निर्णय दिनांक २५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.शेख अनवर शेख मन्नु,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. केरबा दाऊजी दासरे,
श्री. नारायण गौराजी अकमवाड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांचा मूळ अर्ज रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पावती क्र.८०६६ दि.११.०२.२००८ द्वारे पाठवूनही जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्जही रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पावती क्र.११७५,दि.०८.०४.२००८ द्वारे पाठवून दिला तथापि त्यांना मुदतीत माहिती देण्यास संबंधीतांनी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मुदखेड तालुक्यातील त्रयस्थ पक्ष स्वस्त धान्य दुकानदार श्री. केरबा दाऊजी दासरे व श्री. नारायण गौराजी अकमवाड यांना शासनाकडून स्वस्त धान्य दुकानांना प्राप्त होणाऱ्या गहू, साखर व पाम तेल या बद्दलचे वितरण, स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती व इतर योजनेची त्रयस्थ पक्षाला परवाना मिळाल्यापासून दि. ३०.०१.२००८ पर्यंतच्या कालावधीमधील अनुषंगीक माहिती मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या मूळ अर्जाचे व प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, हे दोनही अर्ज संबंधितांना मूळात प्राप्त झाले किंवा कसे याबद्दल आयोग साशंक आहे. कारण अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पत्रव्यवहार केल्याचे नमूद केले आहे. मात्र यासंदर्भातील कोणताही वैध पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केली आहे. तथापि यासंदर्भातील कोणतीही पूरक कागदपत्रे त्यांनी आयोगाकडे सादर केलेली नाहीत.

यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही पुरावा, त्यांचे लेखी म्हणणे आजतागायत मांडलेले नाही. हे पाहता आवश्यक त्या पुराव्याअभावी, अपिलार्थीच्या उपस्थितीअभावी

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेख अनवर शेख मन्नु,रा.लेबर कॉलनी, घर नं.४९, ब्लॉक नं.४,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ६९९/०८,७००/०८,७०१/०८,७०२/०८,७०३/०८,७०४/०८,७०५/०८,७०६/०८, ७०७/०८ व ७०८/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९९ ते ७०८
निर्णय दिनांक २६-०६-२००९

१ श्री. मोहमद नासेर पिता मोहमद मौलाना, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नांदेड.

त्रयस्थ पक्ष :
१) अपील क्र.६९९/०८-श्री.गफार खान सादेख खान
२) अपील क्र.७००/०८-श्री.किशनसिंघ गंगनसिंघ
३) अपील क्र.७०१/०८-श्री.श्रीकांत लक्ष्मण गायकवाड
४) अपील क्र.७०२/०८-श्री.जोगेंद्रसिंघ गगनसिंघ
५) अपील क्र.७०३/०८-श्रीमती शेख अमीना बेगम
६) अपील क्र.७०४/०८-श्री.रमेश शेषेराव शेळके
७) अपील क्र.७०५/०८-श्री.रितेश दिपक पुरी
८) अपील क्र.७०६/०८-श्री.अलीमोदीन खमरोदीन
९) अपील क्र.७०७/०८- श्री.घोडजकर
१०) अपील क्र.७०८/०८-दुकानदार,स्वस्त धान्य दुकान क्र.७०

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०४.२००८ रोजी नोंदविलेली दहा स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या दहा प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे व दहा पैकी आठ

प्रकरणात अपिलार्थीने केरोसिनच्या अर्ध घाऊक विक्रेत्यांसंदर्भात, तर अपील क्र. ७०३ द्वारे केरोसिनच्या किरकोळ परवाने धारकांसंदर्भात व अपील क्र. ७०८ द्वारे स्वस्त धान्य दुकान क्र. ७० च्या परवान्यासंदर्भात काही माहिती मागितली असल्यामुळे या दहा द्वितीय अपिलांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष (अपील क्र.७००/०८,७०१/०८ व ७०२/०८ या प्रकरणातील त्रयस्थ पक्ष वगळता) उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या दहा प्रकरणांमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००८ ते ०८.०१.२००८ या कालावधीतील स्वतंत्र अर्जांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून त्यापैकी आठ प्रकरणातील माहिती नऊ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित होती व अपील क्र.७०३/०८ व ७०८/०८ मध्ये अनुक्रमे पाच व चार वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीच्या या अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या दहाही प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क म्हणून रु. ७२,०००/- इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०३.२००८ रोजी या दहापैकी आठ प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले व अपील क्र.७०३ व ७०८ च्या संदर्भात अनुक्रमे दि. ०६.०२.२००८ व १४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर त्याचदिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध आहे व ती पाहून त्यांच्याकडून सशुल्क घेऊन

जाण्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे एकूण दहा द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नऊ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित असून त्यांना उपरोक्त दहाही प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण रु.७२,०००/- इतके शुल्क भरण्यासाठी त्यांनी दि.२१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले. तथापि या पत्रातील सूचनेप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बव्हंशी माहिती ही पुरवठाधारकाकडे उपलब्ध असल्याने त्यांनी अपिलार्थीस दि.१७.०२.२००८ रोजीच्या अपील निर्णयानंतर ही माहिती तयार असल्याचे व ती पाहून त्यातील आवश्यक ती माहिती अपिलार्थीच्या खर्चाने घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी अशी कोणतीही कार्यवाही न करता, सरळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केली आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी श्री. मोहंमद नासेर मोहंमद मौलाना यांचा दि. ०८.०९.२००८ रोजी खून झाला असून आज रोजी ते हयात नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या या विधानाच्या पृष्ठयर्थ अपिलार्थीच्या पोस्टमार्टम तथा मृत्यू प्रमाणपत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थी यांचा मृत्यू झाल्याचे सिध्द होत आहे.

त्रयस्थ पक्षाने एकत्रितपणे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन त्यांच्याकडून पैसे उकळण्याकरिता त्यांना धमक्या देत असत. अपिलार्थी यांच्याविरुध्द नांदेड येथील पोलीस चौकीत गुन्हे देखील दाखल झालेले आहेत. याच गुन्हाप्रकरणांत त्यांचा त्यांच्या साथीदाराकडून खून झालेला आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व संबंधितांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणारे अपिलार्थी हेच

आता मयत झाले असल्याने, अपिलार्थीची ही अपिले तथ्यहीन ठरत असल्याने, अपिलार्थीची विचाराधीन दहाही अपिले खारीज करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ६९९/०८, ७००/०८, ७०१/०८, ७०२/०८, ७०३/०८, ७०४/०८, ७०५/०८, ७०६/०८, ७०७/०८ व ७०८/०८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक**

**७०९/०८ व ७१०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७०९ व ७१०
निर्णय दिनांक २६-०६-२००९

१ श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, : अपिलार्थी
रा.ता.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, किनवट,ता.किनवट,जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी श्रेणी-१,
पंचायत समिती,किनवट,जि.नांदेड
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत तोटंबा,मानसिंग नाईक तांडा
ता.किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०४.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकाच स्वरुपाची असल्याने या दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

**अपील क्र.७०९/०८:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती विनास्वाक्षरी व विनादिनांकाची आणि

त्रोटक स्वरुपाची दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झालेली, मजूरांच्या मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती, कामांची छायाचित्रे, कामांना भेटी दिलेल्या अधिकाऱ्यांची नावे व त्यांचे अभिप्राय ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने ती त्वरित मिळावी, अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयांतर्गत मानसिंग नाईक तांडा,ग्राम पंचायत तोटंबा येथे सन २००७ ते २००८ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या डी.आर.डी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००७-०८ मध्ये हरियाली/पाणलोट या कामावर दि.०७.०२.२००८ पर्यंत झालेला खर्च, खर्चाची रक्कम केंव्हा केंव्हा उचलली, ती रक्कम व दिनांक, कामाचे ठिकाण, शेत सर्व्हे नं., कामाचे छायाचित्र, कामावर कोणी कोणी भेटी दिल्या, त्यांचे अभिप्राय, मजूरांची स्वाक्षरीसह हजेरीपत्रके, झालेल्या कामाची सी.सी.पत्रक आणि कामांची छायाचित्रे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, किनवट यांच्याकडे दि.१२.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०३.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यांनी नंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २७.०३.२००८ ही तारीख (या तारखेपर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी कबूल केले होते.) ओलांडून गेल्यानंतर अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि ही माहिती

अपूर्ण व आक्षेपार्ह वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि.१८.०३.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २७.०३.२००८ पर्यंत माहिती देण्याचे कबूल केले होते. तथापि या दिनांकानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्रूटी असल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या त्रूटींची पूर्तता करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती विनामूल्य मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली. त्याचबरोबर त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना प्राप्त झ ालेल्या माहितीमध्ये - कामाची छायाचित्रे, कामास कोणी-कोणी भेटी दिल्या, त्या अधिकाऱ्यांची नावे व त्यांचे अभिप्राय व मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती प्राप्त झाल्या नसून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रतीवर दिनांकाचा उल्लेख नाही व त्यावर गट विकास अधिकाऱ्याची सही नाही, त्यामुळे ही माहिती त्यांना खोटी आहे, असे वाटत आहे. त्याना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्तीची कारवाई व्हावी. अपिलार्थीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही स्वतः अथवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या माहितीमध्ये ते म्हणतात त्याप्रमाणे कामाची छायाचित्रे, कामाला भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, त्यांचे अभिप्राय व मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापावेतो प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी दिलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रतीवर गट विकास अधिकाऱ्याची सही नाही व मोजमापपुस्तिकेवर दिनांक

नाही, त्यामुळे ही माहिती खोटी आहे, असे त्यांना वाटत असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याचस्वरुपात ती अर्जदारास देणे सर्व साधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोजमापपुस्तिकेच्या प्रती जशा उपलब्ध होत्या तशाच प्रतींच्या झेराक्स काढून त्यांनी त्या अपिलार्थीस पुरविल्या आहेत. त्यामुळे दिनांकाअभावी अथवा सहीअभावी ही माहिती खोटी आहे असे मानता येणार नाही. मोजमापपुस्तिकेवर कोणाचीही सही व तारीख नसणे, ही बाब निश्चितपणे गंभीरच म्हटले पाहिजे, म्हणून अपिलार्थीच्या या आक्षेपाची पूर्तता त्यांना गट विकास अधिकारी अथवा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावी लागेल, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, अपिलार्थीस अद्यापपावेतो वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मजूरांच्या हजेरीपत्राच्या प्रती, कामाची छायाचित्रे व कामास भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे व त्यांचे अभिप्राय, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती, देणे भाग आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे, असे जन अपिलीय अधिकारी यांचे मत त्यांनी त्यांच्या दि.

१८.०२.२००८ रोजीच्या आपल्या निर्णयामध्ये व्यक्त केली आहे. त्यांच्या या विधानाशी आयोग सहमत आहे. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०३.२००८ रोजी माहिती देण्याचे आश्वासित केले होते. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल करेपर्यंतच नव्हे तर आज रोजी आयोगाकडे होत असलेल्या सुनावणीच्या वेळेपर्यंतही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती पुरविली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणीतील अशाप्रकारच्या अशोभनीय कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी माहिती मागितली होती त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. एस.डी.वाघ नावाचे अधिकारी कार्यरत होते. या प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस.डी.वाघ (सध्या पंचायत समिती किनवट यांच्या अधिनस्त कार्यरत) यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**अपील क्र.७१०/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्रोटक माहिती दिली, दिलेली माहिती ही विनादिनांकाची व विनास्वाक्षरीची देऊन त्यांची दिशाभूल

केली गेली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील हरियाली व पाणलोट कामाबात मंजूर निधी, कामाचे ठिकाण,कामावरील मजूरांची यादी,मोजमाप पुस्तके इ.कागदपत्रांच्या सत्यप्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा संबंधित कालावधी सन २००६-२००७ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०१.२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडून आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आकारुन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील कागदपत्रांवर तसे अभिप्राय व्यक्त करुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती सशुल्क हस्तगत करुन घेतली.प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्यादिवशी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झ ाल्याने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी असून त्यांना अद्यापपावेतो मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती मिळाल्या नाहीत व त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या मोजमापपुस्तिकेच्या प्रतीवर कोणत्याही अधिकाऱ्याची सही व तारखेचा उल्लेख नाही. या दोन

कारणास्तव त्यांची या प्रकरणी दिशाभूल झाली आहे, असे त्यांना वाटते. अपिलार्थीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ३१.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामावर लावलेल्या मजूरांची यादी व मोजमाप पुस्तिकेच्या प्रती मागितल्या होत्या. त्याप्रमाणे अपिलार्थीस मजूरांची यादी मिळाली आहे. तथापि मजूरांची हजेरीपत्रके मिळाली नाहीत, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, मूळात मजूरांच्या हजेरीची मागणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेली नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी देय होत नाही. अपिलार्थीस मोजमाप पुस्तिकेच्या प्राप्त झालेल्या प्रतीवर कोणत्याही अधिकाऱ्याची सही नाही व यावर कोणत्याही दिनांकाचा उल्लेख नसल्याने अपिलार्थीस यासंदर्भात प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे, असे वाटते. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. जर मूळ मोजमापपुस्तिकेमध्ये कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी नसेल तर किंवा त्यामध्ये कोणत्याही दिनांकाचा उल्लेख नसेल तर त्या मोजमापपुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतीवर संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी व दिनांक उमटणार नाही, हे उघड आहे, त्यामुळे यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांचा या आक्षेपाची तड लावण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठ प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज दाखल करुन आपल्या तक्रारीची तड स्वतंत्रपणे लावून घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता त्यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व युक्तिवादामध्ये मागणी केलेल्या

जास्तीच्या व्याप्तीची मागणी यामध्ये कोणताही फरक न केल्यामुळे त्यांचा अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय हा सदोष आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.७०९/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहे, तर अपील क्र.७१०/०८ फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र. ७०९/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४) अपील क्र.७१०/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार,ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत तोटंबा,मानसिंग नाईक तांडा

ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(रजिस्टर्ड पोस्टाने)

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.डी.वाघ, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्रेणी-१,पंचायत समिती, किनवट, ता. किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६५

निर्णय दिनांक २९-०६-२००९

१ श्री. मुनवर खान सरदार खान, : अपिलार्थी
रा. विद्यानगर, परभणी,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण संचालक (प्राथमिक),
शिक्षण संचालनालय, पुणे - ०१

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक फैजुल उलूम प्राथमिक शाळा, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे. अपील अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर त्यांनी त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडून माहिती घेण्यासाठी अपिलार्थीला सुचविले. तथापि शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २, ५, ७, ८ व ९ शी संबंधित माहिती

उपलब्ध होत नसल्याने ती अपिलार्थीस देता येत नसल्याचे कळविले. या सर्व कारणांनी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष फैजूल उलूम प्राथमिक शाळा यासंदर्भात एकूण दहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी दिनांक १९-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती साक्षांकीत करुन पाठविण्यात येत आहे व उर्वरित माहिती प्राप्त करुन देण्यासाठी अपिलार्थीस त्यांचे कार्यालयास किंवा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांच्या कार्यालयास संपर्कात राहण्याचे सूचित केले. अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीने विभागीय शिक्षण उप संचालक यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होत नसल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांचे वकील हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ५, ७, ८ व ९ या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. त्यांना या मुद्दयातील माहिती प्राप्त झाली नाही हा मुद्दा त्यांना महत्वाचा असून त्यांच्या दृष्टीने त्यांना या मुद्दयावरील माहिती कोणत्याही परिस्थितीत हवी आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, या मुद्दयावरील माहिती उघड केल्याने सर्व संबंधितांना अडचणी येणार असल्यामुळे ती माहिती शिक्षण संचालक यांचे कार्यालय त्यांना हेतूपुरस्सर देत नाही. त्यामुळे ही माहिती त्यांना विनामूल्य देण्यासाठी आयोगाने आदेशित करावे. संबधित जन माहिती अधिकारी यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती लावावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबधित एकूण दहा मुद्दयाव्दारे माहिती अपेक्षिली होती. याबाबत अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेल्या मुद्दयावरील माहिती त्यांना अद्याप पावेतो प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजमितीस आवश्यक असलेली ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची अशी आहे. त्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यावाय नसावा. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांनी त्यांच्या अभिलेख कक्षात / कार्यालयात या माहितीचा कसोशीने शोध घेऊन ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध होऊ न शकल्यास जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, ही माहिती ज्या अभिलेखावर उपलब्ध आहे ते अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील

ज्या कर्मचा-यावर / अधिका-यावर होती त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय / फौजदारी कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

(अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन न देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीसाठी पात्र ठरविले आहे)

(माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यास कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / अधिकारी हे एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत)

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना या प्रकरणाशी संबधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुनवर खान सरदार खान, रा. विद्यानगर, परभणी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६६

निर्णय दिनांक २९-०६-२००९

१ श्री. मुनवर खान सरदार खान, : अपिलार्थी
रा. विद्यानगर, परभणी,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
परभणी

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, फैजुल उलूम प्राथमिक शाळा, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी, त्यांना माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही, त्यांना दिनांक २९-१२-२००७ पर्यंत माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष फैजूल उलूम प्राथमिक शाळा, परभणी संदर्भात एकूण ४७ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि दिनांक २९-१२-२००७ पर्यंत देखील अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष यांचे वकील हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण ४७ मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक १, २, ४, ५, ६, ७, १०, १४, १५, २८, ३१, ३२, ३९, ४० व ४५ या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्दयावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात उपलब्ध असून देखील त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर रु.२५,००० /- इतकी शास्ती लावावी व अपिलार्थीस उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता त्यांनी अपिलार्थीकडून दिनांक १३-०७-२००७ व दिनांक ०६-०८-२००८ च्या पत्राव्दारे माहिती देण्यासाठी मुदत वाढवून घेतली व तदनंतर दि. २२.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे एकूण ३२ मुद्दयांची माहिती त्यांच्या कार्यालयाकडून दिली गेली असून ती माहिती मिळाल्याची पोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मुख्याध्यापक, फैजूल उलूम उर्दू प्राथमिक शाळा यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांच्याकडील दिनांक २९-०८-२००७, दिनांक १०-०९-२००७, दिनांक ०९-१०-२००७ व दिनांक २८-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रुपये ६५२२ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केल होते. मुख्याध्यापकाने सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे उर्वरित माहितीचे शुल्क रुपये ६५२२ /- मुख्याध्यापकाकडे भरण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहितीकरिता ११० रुपये शुल्क भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.

यावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना दिनांक २२-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त पृष्ठांकीत पत्र प्राप्त झाले. या पत्राच्या सोबतची ३२ सहपत्रे त्यांना प्राप्त झालेली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत विस्तृत प्रमाणात अशी होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित होती. त्यामुळे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-

२००७ रोजीचा मूळ अर्ज प्रथमतः त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत तो अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित मुख्याध्यापकाकडे पाठवून देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १६-०६-२००७ रोजीचा मूळ अर्ज संबंधित संस्थेकडे दिनांक ०७-१२-२००७ रोजी म्हणजे अंदाजे साडेपाच महिन्यांनी पाठविला. यापूर्वी त्यांनी दिनांक २२-०८-२००७ रोजी अपिलार्थीस ३२ मुद्दयावरील माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना या मुद्दयावरील प्रत्यक्षतः माहिती प्राप्त झाली नसून फक्त पृष्ठांकीत पत्र प्राप्त झाले आहे. अपिलार्थीस ही माहिती सहपत्रासह दिल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००७ रोजी माहिती पुरविली असल्याचे सिध्द होत नाही. यानंतर अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०३-११-२००७ रोजी निर्णय दिल्यानंतर संबंधित शिक्षण संस्थेने अपिलार्थीस परस्पर पत्रव्यवहार करुन त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शाळेने परस्पर भरण्याचे सूचित केले. शाळा व अपिलार्थी यांच्यात पत्रव्यवहार होत असतांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी संबंधित शाळेकडे असलेली माहिती शाळेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ६५२२ /- इतके शुल्क संबंधित शाळेकडे व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ११० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची मुदत अधिनियमातील तरतुदीप्रमाणे फक्त ३० दिवसांची असते. या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांची मुदत व्यपगत झाल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील तरतुदींना छेद देणारी आहे त्यामुळे आता अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेल्या मूळ अर्जातील माहिती, जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य पुरवावी लागेल. हे पाहता जन माहिती अधिकारी

यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस  त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.  सबब शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. खादवे, सध्या शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षण, अहमदनगर जिल्हा परिषद) व या प्रकरणी त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुनवर खान सरदार खान, रा. विद्यानगर, परभणी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ७२३/०८, ७२४/०८, ७२५/०८, ७२६/०८ व ७२८/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७२३, ७२४, ७२५, ७२६ व ७२८

निर्णय दिनांक २९-०६-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ७२३/२००८

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, भोकर,

तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ अपील क्रमांक ७२४/२००८

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

३ अपील क्रमांक ७२५/२००८

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, बिलोली,

तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

४ <u>अपील क्रमांक ७२६/२००८</u>

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, नांदेड,

तालुका जिल्हा नांदेड

५ <u>अपील क्रमांक ७२८/२००८</u>

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, मुखेड,

तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

६ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपसंचालक,

सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेली एकूण पाच स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या पाचही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जांव्दारे सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-०६ या कालावधीतील "कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम" या योजनेअंतर्गत केलेल्या मजूरी वाटपासंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, भोकर यांनी प्रथमतः दिनांक ०२-११-२००७ व नंतर दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी तथा लागवड

अधिकारी, किनवट यांनी त्यांच्या दिनांक २६-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे निरंक माहिती अपिलार्थीस पुरविली. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या संदर्भात अपिलार्थीस ही माहिती उप संचालक सामाजिक वनीकरण यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, नांदेड यांनी दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस निरंक माहिती पुरविली व जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, मुखेड यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००७ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी सुनावण्या ठेवल्या होत्या. तथापि सुनावणीसाठी अपिलार्थी हे सतत गैरहजर राहिल्याने अपिलार्थीची प्रथम अपिले अनुक्रमे दिनांक ०६-०२-२००८, ०१-०२-२००८, ०६-०२-२००८, ०६-०२-२००८ व २९-०३-२००८ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी पाचही अपील प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, भोकर व बिलोली वगळता उर्वरित सर्व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी विहित मुदतीत निरंक माहिती पुरविल्याचे आयोगास दाखवून दिले. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने माहिती पुरविल्याचे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मजुरांची माहिती उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग यांच्याकडून

घेऊन जाण्याचे सूचित केल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, भोकर यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-११-२००७ रोजी प्रथमत: व नंतर दिनांक ०९-०६-२००८ रोजी अपिलार्थीस घरपोच माहिती दिल्याचे आयोगास दाखवून दिले. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, भोकर यांनी अपिलार्थीस माहितीसाठीच्या प्रती पुरविल्या असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

वरील जन माहिती अधिका-यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या विषयासंदर्भात माहिती मागविली होती त्या विषयाशी संबंधित फक्त दोन जन माहिती अधिकारी आहेत. यापैकी जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, भोकर यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००८ रोजी विलंबाने संपूर्ण माहिती पुरविली आहे व जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत परंतु अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीचा अर्ज केला त्यावेळी त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. ती त्यावेळी उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत उप संचालकांकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस, त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत देणे, त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीस बिलोली वन परिक्षेत्र कार्यालयाकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही. उपसंचालक, सामाजिक वनीकरण व लागवड अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असतांना या प्रकरणी लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मजुरांच्या पेमेंटच्या

संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, बिलोली यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ती उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, लागवड अधिकारी, भोकर व बिलोली यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक ती माहिती अधिनियमाव्दारे माहिती देण्याचा विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना लागवड अधिकारी, भोकर व बिलोली यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ७२३/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ७२४/२००८ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ७२५/२००८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

४. अपील क्रमांक ७२६/२००८ खारीज करण्यात येत आहे.

५. अपील क्रमांक ७२८/२००८ खारीज करण्यात येत आहे.

६. उप संचालक, सामाजिक वनीकरण नांदेड विभाग यांना लागवड अधिकारी, भोकर आणि बिलोली यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

७. लागवड अधिकारी, बिलोली यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनपरिक्षेत्र कार्यालय,

मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७२९

निर्णय दिनांक २९-०६-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांची नांवे व त्यांचे कार्यक्षेत्र तसेच मुख्यालयी राहत नसलेल्या अभियंत्याविषयी काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २८-१२-२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज विलाबांने प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आता त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ केलेली पोचपावती त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे व ही माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती त्यांनी आयोगाकडे

व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने, विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील आता खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३०
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दशरथ एन. सुरडकर,<br>ता. सिल्लोड,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्याने, त्यांनी दि. १८.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले होते. त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १९.०३.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण होती. या संबंधी तहसीलदार, सिल्लोड यांनी दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सर्व दुकानदार यांच्याकडून माहिती मागविली होती व या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस एका महिन्याच्या आत माहिती पुरविण्यासाठी आश्वासित

केले होते. तथापि ही माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वस्त धान्य दुकानदाराकडे पडून असलेल्या लाल गव्हाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे व एका मुद्याद्वारे तालुक्यातील दुकानदारांना वाटप करण्यात येणाऱ्या केरोसिनच्या विक्रीबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी जानेवारी, २००७ ते दि. १७.०१.२००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे, व ती, आवश्यक ते शुल्क भरुन त्यांच्याकडून घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीस हे पत्र प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मध्ये त्यांनी मागितलेल्या स्टॉक रजिस्टर व सेल रजिस्टर इत्यादीची माहिती अपिलार्थीस पुरविण्याचे आश्वासित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पुरविण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस उर्वरित माहिती एक महिन्याचे आत पुरविण्याचे त्यांना आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील लेखी म्हणण्याप्रमाणेच युक्तिवाद केला. अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याचा युक्तिवाद केला. मात्र ही माहिती अपूर्ण व चुकीची कशी आहे, हे अपिलार्थी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत.अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, असा युक्तिवाद केला. तथापि या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. अपिलार्थीस या मुद्यावर निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती दिली हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ३ चे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुढीलप्रमाणे माहिती मागितली आहे.- "----- जर एखाद्या दुकानदाराने आपल्या आदेशाचे उल्लंघन केल्यावर सुध्दा आपण त्या दुकानदाराविरुध्द कोणती कारवाई केली व करणार आहात, याची सुध्दा लेखी स्वरुपात माहिती द्यावी ", यापैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदाराविरुध्द अपिलार्थीने अर्ज करण्याच्या तारखपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी काही

कार्यवाही केली असल्यास, ती माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. तथापि भविष्यकाळात "या दुकानदारावर कोणती कारवाई करणार, याची लेखी स्वरुपात माहिती द्यावी" अशी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती'या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. या मुद्याबाबत आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती संबंधित दुकानदारांकडे उपलब्ध आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे संबंधित दुकानदारांना त्यांच्याकडील दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे संबंधित दुकानदारांकडून आजमितीस प्रत्यक्षात उपलब्ध झाली आहे किंवा कसे हे आयोगास कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाचे व प्रत्यक्षात पुरविण्यात आलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ३ अंशतः व ४ आणि ५ या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापि अप्राप्त असल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस एक महिन्याचे आत देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०३.२००८ रोजी आश्वासित केले होते. तथापि हे आश्वासन जन माहिती अधिकारी यांनी पाळल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वर स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्र. ३ अंशतः, ४ आणि ५ शी संबंधित माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्र.३ अंशतः, मुद्दा क्र.४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ एन. सुरडकर,रमानगर,टिळकनगरच्या बाजुला, नविन रामकृष्ण विद्यालयाजवळ,सिल्लोड,ता. सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३१
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, : अपिलार्थी
मु.गाडीवाट,पो.घारदोन,ता.जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (द.),
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्र.जि.मा. ५९ या रस्त्याचे डांबरीकरण व ४ पूलाच्या कामासंबंधी काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर दि.०३.०५.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०५.२००८ पर्यंत माहिती पुरविण्याचे त्यांना आश्वासित केले. परंतु अपिलार्थीने द्वितीय अपील करेपर्यंत त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरवंडी फाटा प्र.जि.मा. ३८ ते घारदोन निलजगाव रस्ता प्र.जि.मा. ५९ या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या व ४ पूलाच्या सन २००३-२००४ या कालावधीमध्ये झालेल्या कामाशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अंदाजपत्रकांच्या व मोजमापपुस्तिकेच्या प्रती - याचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून आले नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती त्यांनी अर्ज केल्यानंतर सहा महिन्यांनंतर प्राप्त झाली आहे. आपण व्यक्तीशः माहितीची मागणी करुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधल्याचा एखादा पुरावा आपणाकडे उपलब्ध आहे का, असे अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. ही माहिती विलंबाने प्राप्त झाली असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता या अर्जाद्वारे अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी केल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्या माहिती संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करण्यासाठी स्वतः अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेणे, असे 'व्यक्तिशः' या प्रकारामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याशी किती वेळा संपर्क साधला, याचा कोणताही लेखी पुरवा आयोगाकडे सादर केलेला नाही व आजही अशाप्रकारचा कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकत नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,मु.गाडीवाट,पो.घारदोन, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (दक्षिण), पदमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३२
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. दिनेश विठ्ठल घटे, : अपिलार्थी
मु.पो.नाथनगर (द), ता.पैठण,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,पैठण

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने,आयोगाकडे कोणत्याही प्रकारची विशिष्ट अशी विनंती केलेली नाही. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील, 'आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील' या मुद्यासमोर 'अवलंबून प्रमाणपत्र मिळणेबाबत' असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'प्रकल्पग्रस्तांचे नातू यांना सवलत मिळणेबाबत' या विषयावर अपिलार्थीने तहसीलदार,पैठण यांच्याकडे दि. १७.१०.२००७ रोजी सेतू सुविधा केंद्र,तहसील कार्यालय,पैठण येथे अर्ज दाखल केला होता. सदर प्रमाणपत्र त्यांना दि.१७.११.२००७ पर्यंत मिळणे अपेक्षित होते. तथापि दि. २०.०२.२००८ पर्यंत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडून त्यांच्या दि.१७.१०.२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भातील माहितीची मागणी केली आहे. थोडक्यात, अपिलार्थीस त्यांच्या नातवाकरिता तो प्रकल्पग्रस्तांवर अवलंबून असल्याचे प्रमाणपत्र तहसीलदार,पैठण यांच्याकडून अपेक्षित होते. यासंदर्भात त्यांनी दि.१७.१०.२००७ रोजी अर्ज केला होता, हे प्रमाणपत्र मिळण्याची मुदत अर्ज दाखल केल्यापासून एक महिना होती. तथापि हे प्रमाणपत्र अपिलार्थीस विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करुन त्यांना त्यांच्या दि.१७.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही माहिती तहसीलदार पैठण यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांची विनंती मान्य करण्याकरिता मूळ भूसंपादन प्रमाणपत्र तीन दिवसांच्या आत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दि. २९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २८.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अर्जावर त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नसल्याचे कळविले व यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील संपूर्ण संचिका तपासणीकरिता उपलब्ध करुन दिली. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने, "या संचिकेचे अवलोकन करता संचिका पाहून आवश्यक ती माहिती मिळाली" असे अभिप्राय नोंदवून सही केली. या सहीखाली अपिलार्थीने दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. मात्र त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या नातवाकरिता प्रकल्पग्रस्तांच्यावर तो अवलंबून असल्याचे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवे आहे. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीकडून आवश्यक तो पुरावा मूळ स्वरुपात मागितला होता. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंबंधित जी कागदपत्रे सादर केली होती, ती कागदपत्रे त्यांना आक्षेपार्ह वाटली. कारण या कागदपत्रांमध्ये हस्ताक्षरातील फरक व त्याचबरोबर अपिलार्थीचा जो कथित भूखंड संपादित करण्यात आला आहे त्या भूखंडाच्या क्रमांकात फरक असल्याचे त्यांना आढळले होते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणाशी संबंधित मूळ कागदपत्रांची मागणी केली होती. मात्र याबाबत अपिलार्थीने मूळ कागदपत्रे सादर न केल्यामुळे अद्यापपावेतो अपिलार्थीस हवे असलेले अवलंबित प्रमाणपत्र ते देऊ शकले नाहीत. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने पोचसही देखील दिली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वरील विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनेश विठ्ठल घटे,मु.पो.नाथनगर (द.),ता.पैठण,जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३३
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. त्र्यंबक शामलाल बिघोत,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,<br>औरंगाबाद क्र.१,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी<br>समिती,औरंगाबाद क्र.१, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
क्र.१, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १) श्री.राजूसिंह मन्साराम बिघोत,
२) श्री.भागवत उत्तम बिघोत,
३) उत्तमसिंह रुपचंद घुणावत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. मात्र नंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट, चुकीची व ठोबळ स्वरुपाची आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये थोडा बदल करुन त्रयस्थ पक्षाच्या जातीचा दावा वैध ठरविताना दिलेल्या निर्णयाची (टिपणीची) सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्रयस्थ पक्ष श्री. राजुसिह बिघोत, श्री. भागवत बिघोत व श्री. उत्तमसिंग घुणावत यांच्या जातीच्या दाव्यासंबंधी दिलेल्या निर्णयाच्या सत्यप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. ३१.०३.२००८ पूर्वी विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १५.०३.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाच्या जात वैधतेसंदर्भात घेतलेल्या तीन निर्णयाच्या प्रती विनामूल्य पुरविल्या. तथापि या माहितीमध्ये संबंधित त्रयस्थ पक्षाच्या जात वैधतेचा निर्णय घेताना लक्षात घेतलेले पुरावे जोडलेले नसल्याने अपिलार्थीस ही माहिती चुकीची वाटली व त्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे जानेवारी, २००८ मध्ये माहितीसाठीचा मूळ अर्ज केला, त्यावेळी त्यांच्या कार्यालयातील लातूर व अहमदनगर विभाग स्वतंत्र होऊन कार्यालयातील अभिलेख्यांची विभागणी करणे व हे अभिलेखे संबंधितांच्याकडे हस्तांतरित

करण्याचे काम चालू होते. त्यांच्या कार्यालयाचेही या कालावधीत स्थलांतर झाल्याने अपिलार्थीस दि. ०७.०१.२००८ रोजीच्या अर्जावर विहित मुदतीत माहिती देणे त्यांना आवश्यक झाले नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०३.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर तात्काळ दुसऱ्या दिवशी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, विशेषतः अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. १७.०३.२००८ रोजीचे पत्र पाहता, असे आढळून येत आहे की, या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती पुरविल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अभिप्रायापृष्ठयर्थ अपिलार्थीने या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, "- जातीचा दावा वैध वा अवैध आहे, हे पडताळत असताना संबंधित व्यक्तींनी कोणते पुरावे दाखल केले, ते जात सिध्द करण्यासाठी योग्य वा अयोग्य आहेत, त्यासाठी कोणत्या नियमांचा वा निवाडयाचा आधार घेतला व इतर तांत्रिक बाबी त्यांचा वैधानिक विचार करुन संपूर्ण लेखी स्वरुपात समिती जो निर्वाळा देते, त्याला जजमेंट कॉपी वा निर्णयाची प्रत संबोधण्यात येते, या निर्णयाच्या प्रतीची सत्यप्रत", अपिलार्थीच्या या मजकुराचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून रिजंट ऑर्डर अपेक्षित असल्याचे दिसून येते. या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, पूर्वी जात पडताळणी समिती जात वैधतेच्या प्रमाणपत्रासंदर्भात ज्या स्वरुपात निर्णय देत होती, त्याच स्वरुपात त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. दि. ०५.०७.२००८ पूर्वी जात पडताळणी समिती त्यांचे निर्णय म्हणून फक्त अर्जदाराच्या जातीच्या दाखल्यासंदर्भात तो वैध आहे की, अवैध आहे, याच मुद्यावर आदेश देत होती, त्यामध्ये कारणासहीत स्वयंस्पष्ट निर्णय देण्याची पध्दत त्यावेळी प्रचलित नव्हती. अपिलार्थीने ही माहिती दि. ०७.०१.२००८ रोजी म्हणजे दि.०५.०७.२००८ पूर्वीची मागितली आहे. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात अतिरिक्त माहिती मागितली आहे. ती त्यांना त्यांच्या कार्यालयातील टिपणीद्वारे

पुरविली गेली आहे. ही वस्तुस्थिती पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली सर्व उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस दिली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे शीर्षक देखील "निर्णय" असेच आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये फक्त निर्णयाची प्रत मागितली होती. मात्र आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जावर त्यांनी निर्णय (टिपणी प्रत) अशी माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडील अपील अर्जामध्ये मागणी केलेली अतिरिक्त माहिती ही अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस ती त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भाने देय होणार नाही.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि या मुद्यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे आज रोजी झालेल्या युक्तिवादाचे वेळी केलेला खुलासा आयोग ग्राहय धरीत आहे. मात्र येथून पुढे अशाप्रकाराची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्रं.७३३/०८

प्रत,

१. श्री. त्र्यंबक शामलाल बिघोत,रा.एन-२, सी/५८/०६, संघर्षनगर,११ वी योजना, सिडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३४
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन, : अपिलार्थी
रा.कन्नड,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नाशिक विभाग,नाशिक
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नाशिक विभाग,नाशिक

त्रयस्थ पक्ष : १) श्री.सुभाष बुधा परदेशी,
३) श्रीमती वर्षा भगवानसिंग भगत,
४) श्री.जयदीप मदनसिंग राजपूत,
५) श्री. राजेंद्र पदमसिंग राजपूत,
६) श्रीमती उज्ज्वला जयसिंग राजपूत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०२.२००८ रोजी माहिती पुरविण्यात येईल, असे आश्वासित करुनही माहिती न पुरविल्याने आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१. १०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्रयथ पक्ष श्री. सुभाष बुधा परदेशी, श्रीमती वर्षा भगवानसिंग भगत,श्री. जयदिप मदनसिंग राजपुत श्री. राजेंद्र पदमसिंग राजपुत, श्रीमती उर्मिला राजपुत या त्रयस्थ पक्षाच्या जात प्रमाणपत्राविषयी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०१.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीचा निश्चितपणे जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास योग्य वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि- नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन,मु. जवाहर कॉलनी, म्हाडाजवळ,हिवरखेडा रोड, कन्नड, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक विभाग,नाशिक यांना, अपिलार्थीच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३५
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. अमृतलाल शांतीलाल शाह, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, चोपडा,
जि.जळगाव

२. जन अपिलीय अधिकारी,
कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, चोपडा,
जि.जळगाव

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रबंधक,
कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय,
चोपडा,ता.चोपडा,जि.जळगाव

जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य,
कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय,
चोपडा,ता.चोपडा जि.जळगाव

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००८ रोजी फेर नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती पुरविलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे सन १९९१-१९९४ या कालावधीशी संबंधित त्यांच्या महाविद्यालयाविषयी काही माहिती १८ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती दिली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना महाविद्यालयाकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती पुरविण्यात आली असल्याचे नमूद केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण १८ मुद्यांपैकी १४ मुद्यांवर अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविली असून अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्र. २,३,५ व ६ च्या संदर्भातील माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. कारण दि. ०४.०७.२००६ व दि. ०५.०७.२००६ रोजी चोपडा येथील रत्नावती नदीस आलेल्या पूरामुळे ही माहिती नष्ट झाली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी या पूराचे वेळी त्यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,५ व ६ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. या पैकी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.५ व

६ द्वारे त्यांनी, प्रत्येक स्नातकोत्तर भौतिकशास्त्र प्राध्यापकांचे प्रथम व द्वितीय सत्राचे एम.एस्सी फिजीक्स या वर्गाचे सन १९९१-१९९४ या कालावधीतील कार्यभार वितरणाच्या व वेळापत्रकाच्या प्रती मागितल्या होत्या. या कालावधीमध्ये अपिलार्थी हे स्वतः विभाग प्रमुख असल्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. मात्र ती माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे पूरामध्ये नष्ट झाली असण्याची शक्यता असल्याने ती माहिती आता जन माहिती अधिकारी पुरवू शकणार नाहीत, हे उघड आहे. तसेच या कागदपत्रांचे महत्त्व व ही कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी एक वर्षाचा असल्याचेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची प्रत त्यांनी पुणे विद्यापीठाकडे व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे सादर केलेल्या अहवालासह सादर केली असल्याचे उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. या मुद्याचे गांभीर्य लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी संबंधित विद्यापीठाकडे सादर केलेल्या स्थानिक चौकशी अहवालाची प्रत आता हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत संबंधित विद्यापीठाशी संपर्क साधून हस्तगत करुन घ्यावी व तदनंतर त्या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची सत्यप्रत व वरील परिच्छेदात केलेले त्यांच्या अपेक्षित माहितीचे विश्लेषण व उपलब्धता पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना आता हे आदेश निर्गमित होताच जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमृतलाल शांतीलाल शाह, द्वारा श्री. डी.एस.शाह,फ्लॅट नं.९, दुसरा मजला, व्ही. के. मार्केट, देवका अपार्टमेंट, पानदरीबा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, चोपडा, ता. चोपडा,जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, चोपडा,ता.चोपडा,जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३६
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अतुल नेमिनाथ जंगमे,<br>मु.पो.काक्रंबा, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,तुळजापूर,जि.उस्मानाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तलाठी,सजा काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती दिली नाही व कोर्टकामासाठी आवश्यक अशी सही शिक्क्यानिशी माहिती दिली नाही, धमकी देऊन खोटे पंचनामे केले गेले, पेजेस व पैसे भरण्याविषयी कोणतीही माहिती दिली नाही, तहसीलदार यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही व रेकॉर्ड पाहण्याची तसदीसुध्दा न घेतल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मौ. काक्रंबा ता.तुळजापूर येथील ग.नं.७२७/७२८ मध्ये झालेल्या फेरफारासंदर्भात काही  माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग.नं.७२७/७२८ यातील झालेले फेरबदल कशाच्या आधारे झाले, त्या कागदपत्राच्या नकला, फेरफार करतेवेळी संबंधित वारसदाराचे संमतीपत्र व काढलेल्या नोटीसच्या नकला - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने हा अर्ज तहसीलदार, तुळजापूर यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने दि. २७.०२.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्याप्रकरणी कळविले, त्याप्रमाणे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तुळजापूर यांच्याकडे दि. १७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मंजूर करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली होती. या

प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी म्हणून तलाठी,सजा काक्रंबा,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद नियुक्ती झालेली आहे. या अर्जानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, असे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावरुन दिसून येते. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती वेळेत प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहिती मागितल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व अपिलार्थीवर असते. अपिलार्थीने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना हवी असलेली माहिती संबंधित तलाठी यांचयाकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी निश्चितपणे कोणते प्रयत्न केले आहेत, याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. हे पाहता, अपिलार्थीचा द्वितीय अपील अर्जातील त्यांना माहिती वेळेत दिली गेली नाही, हा मुद्दा आयोग अग्राह्य धरत आहे. या अर्जातील मुद्दा क्र.२ वर अपिलार्थीने कोर्ट कामासाठी आवश्यक अशी सही शिक्का असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने ही माहिती साक्षांकित किंवा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यासह मागितली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस सही शिक्क्यानिशी माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक नव्हते, सबब अपिलार्थीच्या अपील अर्जातील मुद्दा क्र.२ आयोग खारीज करीत आहे. या अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने संबंधित तलाठयाने धमकी देऊन खोटा पंचनामा केला आहे, असे नमूद केले आहे. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे या संदर्भात देखील अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही सबळ पुरावा सादर केला नाही व आयोगास हा मुद्दा पटवून देण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा देखील आयोग अग्राह्य धरत आहे. अपिलार्थीस पेजेस व पैसे भरण्याविषयी कोणतीही माहिती दिली नाही, असा अपिलार्थीने त्यांच्या अपील

अर्जामध्ये ४ था मुद्दा उपस्थित केला आहे. या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिली असल्याने व सर्व मागितलेल्या माहितीचे एकूण शुल्क किती होती, हे जाणून घेण्याची जबाबदारी या प्रकरणी अपिलार्थीची असूनही त्यांनी ती त्यांनी योग्य प्रकारे पार पाडल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सिध्द होत नसल्याने अपिलार्थी यांचा हा मुद्दा देखील आयोग अग्राहय धरत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जातील मुद्दा क्र.५ व ६ च्या संदर्भात देखील अपिलार्थीने कोणताही ठोस पुरावा आयोगाकडे सादर केला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी अंतिमतः निश्चितपणे कोणती माहिती प्राप्त झाली हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधित सर्व व्यक्तींची वा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अतुल नेमिनाथ जंगमे, मु.पो.काक्रंबा, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा काक्रंबा, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३७
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. आप्पाराव भिमराव मोरताटे (वाडीकर), परभणी. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी, जि.परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,ग्रामपंचायत,पारवा, ता.परभणी,जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीचा अर्ज देऊनही संबंधित ग्रामसेवक हे माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याने त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार दंड लावून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे, - "मौजे पारवा, मौ.पेगरगव्हाण व मौ.भारस्वाडा

ता.जि.परभणी  या ग्रामपंचायती संदर्भात त्यांनी १२ वा वित्त आयोग व संपूर्ण ग्रामीण वित्त योजना,स्तर ३० टक्के पंचायत समिती योजनेत  सन २००५ ते २००६ या वर्षात झालेली कामे, या कामांकरिता ॲडव्हान्स पेमेंटची तरतुद आहे काय,ॲडव्हान्स पेमेंट दिलेले आहे काय, दिले असल्यास किती दिले,कोणास दिले,कोणत्या तारखेस दिले, कोणत्या अधिकाऱ्याने दिले, त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनामासह माहिती, जी कामे झाली, ती पूर्ण झाली आहेत काय? कामे चांगल्या दर्जाची झाली आहेत काय? यावर वरिष्ठ स्तरापासून ते शेवटच्या स्तरापर्यंत कोणते कर्मचारी व इंजिनियर होते त्यांच्या नावासहीत माहिती, कार्यरत ग्रामसेवक श्री. सोळंके हे त्याच गावचे आहेत व त्याच गावात त्यांची नियुक्ती आहे, असे चालते काय?नियमावली व जी.आर.ची प्रत, पं.स.स्तर ३० टक्के बँक पासबुक सन २००५ ते २००६, ग्रामसभा,प्रोसिडींग बुक, मासिक सभा प्रोसिडींग बुक,स्त्रोत १ व २ कामाचे पासबुक, निधीचे पासबुक व मोजमाप पुस्तिकेसह माहिती, पी.आर.सी.ने काय आदेश दिला त्या आदेशाच्या प्रती." - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,परभणी यांना उद्देशून केला होता.त्यांच्याकडून हा अर्ज संबंधित ग्रामपंचायतीकडे दि. १८.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अंतिमतः प्राप्त झाला. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांच्याकडे दि. २४.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. थोडक्यात, अपिलार्थीने दि. २६.०६.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्याकडे माहिती मागवूनही त्यांना जिल्हा परिषदेतील कोणत्याही अधिकाऱ्याकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली नाही. सर्व संबंधितांकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, परभणी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०९.१०.२००७ रोजी मौ.पारवाची संपूर्ण माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केलेली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस पारवा गावासंबंधी माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित गावे पेगरगव्हाण व भारसवाडा यासंबंधी त्यांना आयोगाने असे अवगत केले की, या संदर्भात संबंधितांकडे माहिती तयार असून ते आता पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्र.२ अंशतः "या कामाकरिता ॲडव्हान्स पेमेंटची तरतुद आहे काय?", मुद्दा क्र. ३ अंशतः "झालेली कामे चांगल्या दर्जाची झाली आहेत काय?" व मुद्दा क्र. ४ पूर्ण, याबाबतची माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी ही माहिती विसंगत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात अपिलार्थीने पी.आर.सी.ने काय आदेश दिले, त्या आदेशाच्या प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली, तथापि हा आदेश पी.आर.सी.ने कधी दिला, याचा कुठलाही उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ मधील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील त्यांना देय असलेली

मौ.पेगरगव्हाण व मौ.भारस्वाड या ग्रामपंचायतीच्या संबंधीची माहिती ही, त्यांना जन माहिती अधिकारी पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील परिच्छेदात नमूद केलेली व अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित ग्रामसेवकाने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ग्रामसेवक, पारवा,पेगरगव्हाण व भारस्वाडा यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आप्पाराव भिमराव मोरताटे (वाडीकर),रा.राजनगर,कादाबाद प्लॉट, सरकारी दवाखान्यासमोर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,पारवा, ता.परभणी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३८
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. सतिश विष्णूपंत टाकळकर, : अपिलार्थी
रा.आनंदनगर,पूर्णा,जि.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद, पूर्णा (जं),
जि. परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पूर्णा (जं),
जि.परभणी.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याधिकारी,
नगर परिषद, पूर्णा (जं),
जि. परभणी

जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीही माहिती दिली नसल्याने, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पूर्णा नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.२४ दि. २०.०४.२००७ ची प्रमाणित प्रत, जिल्हाधिकारी,परभणी यांच्या दि.१८.०६.२००७ च्या खासदार विकास निधी अंतर्गत सानेगुरुजी सार्वजनिक वाचनालय इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशाच्या प्रमाणित प्रती आणि सदर पत्राची पूर्तता झाली नसल्यास, विलंबाची कारणे, - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी एप्रिल, २००७ व नोव्हेंबर, २००७ असा होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्याधिकारी, नगर परिषद,पूर्णा यांच्याकडे केला होता. तथापि त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार परत मुख्याधिकारी,नगरपरिषद,पूर्णा जि.परभणी यांच्याकडे दि. १८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर मुख्याधिकारी, नगरपरिषद,पूर्णा यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज केला त्यावेळी उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांची जन अपिलीय अधिकारी यांनी नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे मुख्याधिकारी, नगरपरिषद,पूर्णा यांनी अपिलार्थीचा दि.१८.१२.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज उपआयुक्त (सामान्य प्रशासन) यांच्याकडे पाठवून देणे त्यांना आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. थोडक्यात, मुख्याधिकारी, नगरपरिषद,पूर्णा यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती दिली नाही व त्यांच्या या संदर्भातील प्रथम अपील अर्ज कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडे कधीही पाठविला नाही. त्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळासाठी वंचित राहिले. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २१.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोच असलेली पोचपावती आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस दि. २१.०५.२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, पूर्णा नगर परिषदेने ठराव क्र. २४ दि. २०.०४.२००७ द्वारे 'बांधा,वापरा हस्तांतरित करा (बी.ओ.टी.)' या तत्त्वावर सानेगुरुजी सार्वजनिक वाचनालयाच्या इमारत बांधकामाचा ठराव पारित झाला होता. तथापि जिल्हाधिकारी यांच्या दि.२०.०४.२००७ रोजीच्या या संदर्भातील आदेशही त्यांना प्राप्त झाले होते. तथापि वाचनालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रश्न काही कारणाने मागे पडला व या प्रकरणी पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे इमारत बांधकामाच्या अंदाजपाकाची व नकाशाची प्रत मूळात तयारच केली गेली नाही. त्यामुळे ही माहिती ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील एकूण तीन मुद्यांपैकी मुद्दा क्र.३ मध्ये अपिलार्थीने जिल्हाधिकारी, परभणी यांच्या पत्राची पूर्तता झाली नसल्यास विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर, ती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे, त्या स्वरुपातच अर्जदारास देण्यासंदर्भात

अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही निर्णयाची अथवा कृतीची कारणे अर्जदाराने त्यांच्याकडे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी या निर्णयासंदर्भात अर्जदारास खुलासे करणे अशाप्रकारच्या प्रक्रिया या अधिनियमामध्ये मूळात अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भातील ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित दोन मुद्यांवरील देय माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०५.२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर, दिली असल्याने अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,पूर्णा श्री. अतुल गायकवाड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची अक्षम्य उपेक्षा केली आहे. एवढेच त्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहिीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र.२ अंशतः "या कामाकरिता ॲडव्हान्स पेमेंटची तरतुद आहे काय?", मुद्दा क्र. ३ अंशतः "झालेली कामे चांगल्या दर्जाची झाली आहेत काय?" व मुद्दा क्र. ४ पूर्ण, याबाबतची माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी ही माहिती विसंगत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात अपिलार्थीने पी.आर.सी.ने काय आदेश दिले, त्या आदेशाच्या प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली, तथापि हा आदेश पी.आर.सी.ने कधी दिला किंवा पी.आर.सी.च्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस अपेक्षित आहे, याचा कुठलाही उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्ज केल्यानसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ मधील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस देय असलेली

मौ.पेगरगव्हाण व मौ.भारस्वाड यासंबंधीची माहिती ही, त्यांना पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील परिच्छेदात नमूद केलेली अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित ग्रामसेवकाने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल ग्रामसेवक, पारवा,पेगरगव्हाण व भारस्वाडा यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आप्पाराव भिमराव मोरताडे (वाडीकर),रा.राजनगर,काद्राबाद प्लॉट, सरकारी दवाखान्यासमोर, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,पारवा, ता.परभणी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,परभणी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७३९
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. दत्तु ईराप्पा दिंडे, : अपिलार्थी
रा.आडुळ,ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग,अंबड,जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या आदेशावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००६ ते २५.१०.२००७ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत रोहयो

अंतर्गत पाझर तलावाच्या केलेल्या कामाच्या हजेरीपत्रकाच्या व मजूर उपस्थिती अहवालाच्या प्रतींची व्यक्तिशः मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२९,७२८/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी या शुल्काचा तपशील कळविला नव्हता. त्यामुळे अपिलार्थीने परत त्यांच्या दि. १५.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला असता, तो अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.कोणतीही माहिती प्राप्त न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न केली गेल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेल्या वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत स्वरुप असलेली माहिती मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२९,७२८/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे अर्जदारास माहितीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील उदा. अर्जदारास देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची अंदाजित संख्या, माहिती पुरविण्यासाठी लागणारा प्रतिपृष्ठ दर, शुल्काचा भरणा कोणत्या शीर्षाखाली व कोठे करावा, याचा तपशील हा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कळविणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना अनिवार्य आहे. हा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी प्रथमतः तर कळविला नाहीच. परंतु अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १५.११.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे हा तपशील मागूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तो पुरविला नाही, हे विशेष. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काच्या तपशीलाशिवाय त्यांनी अपिलार्थीस पाठविलेले दि. ०५.११.२००७ रोजीचे पत्र अवैध सिध्द होत असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती तीस दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०३.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतरही सशुल्क माहिती देण्यासाठी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीस प्रथमतः चुकीचा प्रतिसाद देणे व नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी

सूचित करुनही अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही न करणे, अशाप्रकारच्या त्यांच्या वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),महाराष्ट्र राज्य,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तु ईराप्पा दिंडे,रा.आडुळ,ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग,अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),प्रादेशिक कार्यालय,बंगला नं.१२,पुणे-६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२९
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

१. श्री. सुनिल पंढरी शिरसाट, : अपिलार्थी
मु.पो.घोडेगाव,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद,औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,गंगापूर,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०५.२००८ रोजी फेरनोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवण्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना दि. ३० मे, २००३, दि.३० मे,२००४ व दि.३० मे, २००५ मध्ये देय असलेल्या तीन वार्षिक वेतनवाढी अद्यापपर्यंत का मिळाल्या नाहीत व कधी मिळणार, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीचा माहितीचा हा मूळ अर्ज गट शिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी

यांच्याकडे दि. ०४.११.२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या देय वेतनवाढीसंदर्भात आवश्यक तो खुलासा केला. हे पत्र अपिलार्थीस दि. २१.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले आहे. अपिलार्थीच्या विरुध्द विभागीय चौकशीच्या संदर्भातील एका प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीची वार्षिक वेतनवाढ थांबविण्याचे आदेशित केले असल्याने अपिलार्थीस त्यांना अपेक्षित देय वेतनवाढ मंजूर झाली नसल्याचे अपिलार्थीस त्यांनी या पत्राद्वारे कळविले आहे. तथापि या पत्राने समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असूनही त्यांनी त्यांच्या दि. २०.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो खुलासा केलेला आहे. आता अपिलार्थीच्या देय वेतनवाढी नोव्हेंबर, २००८ मध्ये मंजूर करण्यात आल्या असून या संदर्भात अपिलार्थीस देय असलेली रक्कम देखील त्यांना आता प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या वेतनवाढी स्थगित करण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.१२.२००६

रोजीच्या पत्राद्वारे कळविली होती. वास्तविक पाहता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाची कारणे अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कळविणे अभिप्रेत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात मागणी केलेली माहिती तयार आहे, त्याच स्वरुपात त्यांना ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या एखाद्या निर्णयाबाबत त्यांच्याकडून निर्णयाची कारणे विचारणे अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. त्यामुळे या प्रकरणी मूळातच अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मूळ माहितीचे स्वरुप अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल पंढरी शिरसाट,मु.पो.घोडेगाव, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३०
निर्णय दिनांक ३०-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,<br>रा.परळी वैजनाथ,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,<br>परळी वैजनाथ, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,<br>परळी वैजनाथ, जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी व अपूर्ण असल्याने आणि ती माहिती महाविद्यालयाने लेटरपॅडवर न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला होता. तथापि या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत न घेता अपिलार्थीस सत्य माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००७ रोजी दिलेल्या एकतर्फी निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई आदेशित करण्याची व जन माहिती अधिकारी यांनी सत्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वत:विषयी व त्रयस्थ पक्ष श्रीमती देशपांडे यांच्यासंबंधी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कधी प्रतिसाद दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००७ रोजी निर्णय दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. मात्र या सुनावणीस अपिलार्थी हे प्रत्यक्षत: उपस्थित न राहता त्यांनी आपला लेखी युक्तिवाद जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.०९.२००७ रोजी सादर केला होता. अपिलार्थीचा लेखी युक्तिवाद लक्षात घेऊन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०९.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे खारीज केला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी देखील उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच विषयावर वेळोवेळी एकाच प्रकारची माहिती मागवित आहेत. आयोगाने यापूर्वी अपिलार्थीच्या याच विषयी केलेल्या वेगवेगळया द्वितीय अपील अर्जांवर आवश्यक ते निर्णय देखील दिलेले आहेत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २९.०९.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता

हा निर्णय त्यांनी अपिलार्थीचा लेखी युक्तिवाद लक्षात घेऊनच दिल्याचे दिसून येते. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली नसल्याचा अपिलार्थीने निष्कर्ष काढला आहे. तथापि या निष्कर्षापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने आयोगास कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. याचबरोबर आज रोजी आयोगासमोर सुनावणीमध्ये त्यांचा युक्तिवाद मांडण्यासाठी अपिलार्थी हे स्वतः किंवा त्याचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही. हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,द्वारा-कनकदंडे निवास,सरकारवाडा,अंबावेस,परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.